# रिकामीक -- कविता

-- चं. प्र. देशपांडे.



मनाची फक्त इवलीशी
काडेपेटी खरी
बाकीचे रामभरोसे
असे केल्याने प्रत्येक
पक्ष्याचे एकेक पीस
पाहात बसावे लागते
आणि झाडाचे एकेक पान

बाह्य जगात रममाण
होता यावे आणि सुखांची
रेलचेल व्हावी अनभिषिक्त
याची ही सोय
एकही मेगाब्लॉक न घेता
सतत शॉर्ट सर्किटचा मारा
सहन करत अनुभवी होण्याची
उदात्त रचना

द्वैत आणि अद्वैत दोन्ही
महत्त्वाचे असल्याची
स्वयांसिद्ध मखलाशी
करत इतरांहून जणू वेगळे
अधिक मौल्यवान जगणे

ही शुभ्र थाप उघडी पडणारच
आज ना उद्या
हे माहीत असण्याची
भयग्रस्त अवस्था
प्रत्येक पान किडल्यासारखी
--- ००० ---

अनवधानाने सिनेमा बघणे
आता परवडणार नाही – आता
त्यातल्या तलवारी सरळ बाहेर
आपल्यावर तळपणार, चालणार
हे नक्की आहे

गाव की छोरी म्हणून निरागस
प्रेमाने विळखा घालणारी
आता ठरू शकते विषारी नागीण
तिचा तसा हेतू नसूनही
आपल्या सुखाचे माप ओलांडून

रंगीबेरंगी प्रकाशात निळा धूर
फुफ्फुसांत जाताना
आपले विजय काळवंडवत जातो
मानसिक कॅन्सरचे चित्र म्हणून
रात्रीच्या आकाशात
गिचमिड विजा भेगाळतात

तरीही त्याच दिशेने
जाणाऱ्या पावलांचे क्रूरपणे
फ्रॅक्चरच करावे लागेल आता मृत्यू
टाळण्यासाठी त्याग म्हणून

निरागसतेला प्रतिसाद म्हणून
आता पांढऱ्या निशाणाचे
लोटांगणच घालावे लागेल
--- ००० ---

मला माहीत आहे
हा अनुभव तुमच्या ओळखीचा नाही
माझी गेलेली सहजता परत
मिळवण्यासाठीचे माझे प्रयत्न
म्हणजे स्वतःचाच लचका तोडून
उरलेल्या स्वतःला त्या सहजतेत स्थापित
करण्याचे प्राणप्रयास विद्ध करत
राहणारे सतत प्रचंड ताणमय भयग्रस्त

ते टाळण्यासाठी मी ऐकतो कौशिकीचे
याद पियाकी आये -- तिच्या
सहज आत्मविश्वासाचे कारण स्पष्ट --
ती मग्न तिच्या जगात --
जणू तिला हुकूम चालवायची गरजच नाही
जणू ती फक्त आहे तिथे आणि गाणे
आपोआप पाझरतेय या जगात तिने न घडवता

मी माझा प्रश्न विसरत तर नाहीच
उलट तिच्या सहजतेने आणि अशक्य ते
आपोआप उमटताना पाहून
चकित होत राहतो तीच माझी बैरी
कोयलिया असल्याप्रमाणे सुंदर दुष्ट

माझ्या अशा प्राणसंकट अवस्थेत
काय तिच्या त्या ओघवत्या
प्रेमाचा अर्थ – मी आहे तसाच राहात
वा अधिकच बिघडत जात असेन तर --
तिच्या स्वरांना मी घाबरत असेन तर –
--- ००० ---

अंधारातून घरसामान घेऊन ट्रकने जात असताना
एक वाघ आडवा गेला डोळे चमकवून तर कुणी म्हणाले
हा शुभशकून असतो – माझे मन व्यग्र स्वतःच्या अपमानांचे
काल्पनिक प्रसंग रचण्यात अव्याहत – भाषाच सगळी कल्पनेवर
अवलंबून असल्याचे समजलेले असूनही – ज्या अवस्थेत भाषा
नाही लागत, तिचे कुणीसे केलेले वर्णन मला काल्पनिकच --

आपण काही साधे छान सांगायला जावे तर समोरचा सदोदित
निराश, कडवट माणूस हसतो, टिंगल करतो त्याच्या सहज
सत्यातून जणू पोहता पोहता प्रत्येक वेळी सुरा मारून
खून होणे अटळच असते – त्याचा राग येऊन आपण
नखे काढावीत की त्याच्या कल्पनेबद्दल दयाशील राहून
सरळ शरण जात माफीच मागावी आपल्या मानसिक
प्रमादाबद्दल – हा विचार येणे हाच फक्त सर्वाधिक
शक्य असलेला समजुतदारपणा – असे वातावरण --

कामांची रंगरंगोटी, कामांची यादी, कामांचे पदर,
कामांचे अपेक्षित परिणाम, कामांनी उजळणारे चेहरे,
कामांनी वाढणारी शत्रुत्वे, परिश्रम आणि श्रमपरिहार --

प्रत्येक गोष्टीच्या तळातून साधक-बाधक दिसत राहणे,
सारखीच नाराजी व्यक्त केली जाणे, छोटी बालके
नुसती अज्ञानी असल्याने त्यांचे अस्तित्वच विसरणे
अशा मार्गांनीही आयुष्य प्रगत होत आलेलेच आहे --

सहानुभूती, शहाणपणा, दुःखाच्या पलीकडे जाणे, जगण्यातली
गूढता, नियोजन आणि द्रष्टेपणा तसेच धूर्तपणा, मुत्सद्दीपणा,
मुरब्बीपणा, पोशिंदेपणा -- सगळे जात राहते गाढवाच्या नरकात --
--- ००० ---

मी लगाम नाही सोडत

माझ्याच भोजनगृहात

बसून मी सर्रास बातम्या

पसरवतो माझ्या

आकर्षक लकबींच्या

कशाचेच काहीच

होणार नाही

असे होत नसते

मला भूक लागते

याचा अर्थच

कुठेतरी पाऊस

विकला जात असतो

वाट पाहावी लागते

जगातले आवाज

जाळ्यात सापडण्याची

माझ्या विचारांच्या

हट्टीपणाच तर

असतो हा

वारा आणि मी

असे द्वंद्व पुढे ढकलण्याचा

लगाम सोडले तर

जगच निसटून जाईल

हे नक्की माहीत असल्याने

मला भयग्रस्त राहणे आवडते

--- ००० ---

तू जवळ आहेस
असे वाटण्याचा तो क्षण
फक्त
माझ्याजवळच होता

आकाशातले सगळे तारे
जरी खाली आले असते
तरी कधी तजेलदार
कधी उत्साहवर्धक
तर कधी म्लान किंवा
कंटाळवाणेही वाटले
असते कधीही

हे तुझ्या लक्षात
आले नसावे किंबहुना
तुझ्या डोळ्यांची माझ्या
डोळ्यांना पडलेली भुरळ
तुला दिसलीही नसावी

हे ओळखून मी तडक
स्पष्ट सांगितलेही होते तुला
की बाबा असे असे घडले
म्हणून

आजही आठवतो
तो क्षण आणि
विशेष म्हणजे सांगूनही
तू न घेतलेली हरकत –
--- ००० ---

बुडता बुडता पटकन
तोल सावरून किनारा पकडला
तर तो किनारा नव्हता
ती तू होतीस

सर्व ड्रॉवर्स मोकळे करून
तुला सर्व प्रांत सांगितले
तुझ्या आधिपत्याखालीच
चालेल आता राज्य
माझ्या पंचेंद्रियांचे
हे तुला सांगून
मी परागंदा झालो

मला असे हरवून जाणेच
हवे होते तुझे
वस्त्रालंकार फेडून
अंधाऱ्या जिन्यातून
धडपडत जाणारे

या चोऱ्याच होत्या

माझ्या मनाचे सगळे कप्पे म्हणजे
माझ्या शर्टावरच्या चौकटी --
आणि शर्ट तर काढून
फेकून दिलेला

तूच ठरव आता तुला कसे जगायचेय
मला फरक नाही पडणार
--- ००० ---

या आयुष्यात आहे हे एकच
आयुष्य जगायचेय
हे ठरले की भाषेला येते
एक अटळ दडपण आणि इतर
सर्व वस्तुमात्र होते शत्रू --
तरीही एकटेपणाचे उमाळे
भाषेला सक्ती करतात
बंधुभाव जपण्याची
निर्मनुष्यतेच्या सावलीत

त्या सावलीतच
फुटतात धुमारे
संबंधांच्या घटनांचे
आणि किळसवाणा
चिकट द्रव बनून
साठत राहतात
मधेच उगवलेल्या
एखाद्या विकृत
गुलाबासह

त्या गुलाबावरच मन
शिंपडत राहते
पाणी गोड
भोवती इतर सर्व
किडत असताना

भाषा फक्त एक
निमित्त असते जगण्याचे
--- ००० ---

बाष्पयुक्त गारवा
निरुद्देश कसा असेल
त्यानेच तर मला प्रश्नमय
अनावर विचारांच्या शिंका

मी म्हणूच नाही शकत --
मी राहीन निसर्गाबाहेर
माझे कार्यालय, माझा रस्ता
आणि माझी प्रेयसी यांसह

प्रत्येक दगडाखालून
डोके बाहेर काढून
आकाशाकडे बघणारी
एकेक लहानथोर व्यक्ती

प्रत्येकाला संपादित
करून हवेय
आपापले पोहणे
मर्यादित अंधारात

सगळे ठाम मतांचे
बाजीगर नाक खुपसणारे
जणू हितैषी म्हणून इतर
प्रत्येकाच्या  खिडकीत

मला ना धड मत
ना माझ्याकडे सर्व
दुःखितांचे अंधार
संपवण्याचे स्वप्न        --- ००० ---

आता मला नवीन
काहीच नाही वाटत
अर्थ विचारणेच कधीचे
बंद केल्यापासून
द्वेषाच्या पाली
आता सहज विश्वासाने
बागडतात माझ्या
अंगाखांद्यावर

माझी हॉटेल्स आता
ठरून गेलेली आहेत
तिथले वेटर्सही
आता खेळतात
माझ्या पालींबरोबर

आकाश आम्हा मित्रांचेच समजून
त्याखाली आम्ही विजयाचे
मनसुबे उगाळतो सर्व
शत्रूंना शिव्या देत

भीती असतेच मनात
असा खूप काळ
वाया जाण्याची
पण इलाज नाही

शत्रू घाबरतात, चिडतात,
खिन्न, सावध राहतात -- हेच
मला माझे पूर्ण जगणे वाटते
--- ००० ---

माझ्यात सगळ्या शक्यता आहेत
सगळे दगड माझ्यावर चाल
करत धुवांधार येऊ शकतात
किंवा
पूर्ण आकाश माझ्यासाठी होऊ शकते
मऊशार
मी स्खलनशील म्हणजे हिंसक नाहीय
अनावर प्रेमाने बाधित
चलजिन्याप्रमाणे मी
पोचवत राहतो
पांढरे गुलाब वर वर

पानांच्या रंगांच्या
अनिश्चिततेवर नसते अवलंबून
माझे जगणे जे असंख्य
क्षणी सर्वस्व अर्पण करत
मान्य होत असते
लाटांचे उधाणते समुद्र होत

इथे रद्द असतात
पुस्तकातले कायदे
जरी मला माहीत असते
त्यांची हिंसक ताकद

माझ्या मर्यादांसह
मी फेकला जाऊ शकतो
एक अनभिषिक्त सम्राट म्हणून
तरीही, मी शिक्षापात्र असतोच --
--- ००० ---

माझ्या घराचा पाया
सांगोवांगीच्या संदेशांनी
भरलाय हे कळल्यावर हे

बदलावे कसे ते
विचारण्यासाठी मी एका
जुन्या टांगेवाल्याकडे गेलो
आता त्याच्याकडे तो नसूनही
त्याने भिंतीवर अडकवलेला
चाबूक फक्त दाखवला
माझ्या काळजाला

जणू विद्ध करण्यासाठीच
जन्मला होता तो माझ्या आयुष्यात
त्याच्या दाढीतली धूळ झटकत

भर दुपारी सुनसान रस्त्यावर
माझे पूर्वज माझ्या पराभूत
विचारांचे कावळे होऊन

मला दिलासा न देता
उलटसुलट विचारांच्या माझ्याच
वादांत ढकलत होते मला

याच घरात आहे असेच
राहावे लागणार
हे ओळखून मग मी सरळ
झालो पोथिनिष्ठ

--- ००० ---

कधी फुलपाखरू
कधी दुर्गंधी
कधी रक्त
कधी गोलाई
करते उद्युक्त
कवितेला

मनात उमटलेली
यांची चित्रे
कधी गिळंकृत
करतात कवितेला
आणि करतात
पुकारा त्यांच्या
विश्वबाह्य अस्तित्वाचा

तसे होत नाही
तेव्हा सर्व चित्रे
असतात निमित्ते
आणि विश्वाचा भाग
-- असे नसून वा असून जगणे
या दोन्हींतली निरर्थता कळते
वेगवेगळी ज्यात

कविता म्हणजे
विचार नव्हे तर
त्याच्या अवतीभोवतीची
अमर्याद मोकळीक
विचाराची निरर्थता कळणारी
--- ००० ---

उद्घाटनाला आलेले बुलडोझर
नम्र रुबाबात कल्पना देतात
त्यांच्या उन्मत्त आत्मविश्वासाची
एका उद्धट स्मितहास्यातून

त्यांचे शुभ्र दात खोटे असतात
दिसणारे सुबक – मूळचे समूळ
उखडून गेलेले त्यांच्या
खऱ्या-खोट्या निष्ठांसह

मनात आणले तर काहीही
जमीनदोस्त करता आले पाहिजे
ते आपण केलेय असे न वाटता
उलट आपण तर त्याच्या विरोधात

असल्याप्रमाणे उपकृत
सर्वांकडून या जगात
आपले काहीच नसल्याप्रमाणे
गडगंज गरिबी उपभोगत

खाता खाता त्यांची नजर पडते
लहान मुलांवर
सादर आणि याचकपणे पाहणाऱ्या
त्यांच्या लोखंडी मवाळपणाकडे

ते बेफिकीर प्रेमाने हसतात आणि
ती मुले नसून मोठी माणसेच आहेत
असे दाखवत सराईत नवलाईने ते
उद्याऐवजी आजच त्यांचे क्रूर गालगुच्चे घेतात --- ००० ---

एका खोल हौदात असलेल्या
असंख्य विषारी सर्पांप्रमाणे
माझे मन आणू पाहतेय
भविष्यातला हवासा क्षण आत्ताच
आणि हिरवानिळा पडतोय वर्तमान

सोललेले बटाटे होऊन
पांढरेफटक पडतेय
माझे ब्लड-प्रेशर
आणि न संपणारा हँगओव्हर
होत हिंसकपणे बहरतेय
माझी कल्पनाशक्ती

हवे असलेलेच नको वाटतेय
साईड इफेक्ट म्हणून येणारा
दुर्दम्य अंत वगळण्यासाठी
मन करतेय कासावीस धडपड

आपणच स्वीकारलेले हे आयुष्य
आता होतेय ओझे तीव्र गतिहीन सूर्य
ओढावा लागण्याचे अटळ

स्वातंत्र्याचेच होतेय आता अटळ
बंधन एक जखमी करणारे  पाते
पण तरीही आता एक मूल्य म्हणून
स्वेच्छेचा गौरव करावाच लागेल
आपण गुलाम नसल्याचे सत्य
मानत राहण्यासाठी दगडी
--- ००० ---

मी सिगरेट नाही ओढत
पण ती असते जगात
मी बरेच काही नाही पाहात
पण ते असते
कधीतरी अचानक
पाहतो मी
आवरणाखालचे जग
तेही पूर्ण नसतेच

असूच नाही शकत
माझ्या मद्दड
आणि गोंधळलेल्या
आकलनात
कोणत्याही इडलीसांबारचे
सारसर्वस्व पूर्ण

परंतु आकाश खोलून
अर्धवटच का असे ना
मी पाहतो जेव्हा
माझ्याच मनाचे पाताळयंत्र
माझ्या क्षितिजाच्या टोकावर

तेव्हा अनपेक्षितपणे
माझ्या सदा सतर्क मनाची
अविरत कृतिशीलता मला स्पष्ट दिसते
आणि तोच पूर्णत्वाचा क्षण ठरून
मन अचानक गायब होते
माझ्या देखत
--- ००० ---

संबंध असणारच

हे आपल्याला कळते

तुमचा पूजेचा दगड वेगळा

माझा वेगळा असला तरी

किंवा खरे तर त्यामुळेच

कोणतेही कुत्रे वा माणूस

आपल्या दगडावर मुतल्यास

त्याचा आपण मर्डरच करू

आपण सहजीवनासाठी पोटनियम नामक

सलूनमधल्या वैचारिक कात्रीने

आपापली मने सहिष्णू करत राहू

कशाला हवाय कॉमन इतिहास

सरळ वेगवेगळे साचे करू तयार

आपापले संभोगबिंदू गौरवण्यासाठी

परीक्षा रद्द आणि सार्वजनिक ठिकाणी

काढायचीच नाहीत नावे

आपापल्या स्फूर्तिदात्यांची कारण तलवारी

म्यान केलेले लढवय्येच हवे आहेत

आज आपापल्या पूज्य पुतळ्यांसाठी

माझे मनच वेगळे आहे

तुमच्या मनाहून

इतिहास वेगळे असण्याचा नाहीचाय प्रश्न

आपली मने व्यक्तिगत असण्याचा आहे

तरीही सध्या इतिहासावरच भांडत राहू नाइलाजाने

--- ००० ---

( उगीच एक क्रीडा म्हणून -- )

कसा मी दैवयोगाने तुझ्याशी बांधला गेलो
तुझ्या दैवात होतो मी मला मी पारखा झालो

तुझ्या दृष्टीत दिसले जे मनाला ठार करणारे
मला समजूनही पुरता तुझ्या नसण्यात गुरफटलो

बळी मी एकटाच होतो की तुझाही अंत होता हा
पुनर्जन्मात भासाच्या खऱ्याने विद्ध होत गेलो

हो उघड आता तरी व्याकूळ मन हे प्रार्थते
होकार कल्पित मी तुझा सत्यात खोटा जाहलो

मीलनाची आस आता विफल तर होणार नाही
माहिती तरी आहे तुला का मी तुझ्या असण्यात आलो

सूर्यास आता मागणे की रात्र विरही नष्ट होवो
स्वप्न माझे किरण होवो अन  तुझ्या स्वप्नात उजळो

आजवरचे खेळ सारे विस्मृतीने ग्रासले
आज आता फूल होऊन मी तुझ्या केसांत रमलो

अंत आता जवळ आला क्षणही तू टाळू नको
सुटकेस तुझिया अधिर होऊन मीच येथे थांबलो

तूच प्रिया, तूच देवी, तार माझे विश्व सारे
तुला नकळता मी तुझ्याशी तीव्रतेने झोंबलो
--- ००० ---

माझा निर्णय होत नाही तेव्हा
मी हातरुमाल चुरगळत बसतो
आणि शेवटी कपबशा फोडून
जगाचे नकाशे तपासतो
कारण मला कोणतीच
कारणमीमांसा खरी वाटत नाही

माझ्या भोवतीच्या जगाबाबतही
मी शंका घेतो कारण दारू प्यायल्यावर
मेंदूतली रसायने बदलतात
आणि रस्त्यातून पळत चाललेली भटकी कुत्री
जिने चढून जातात पंचवीसाव्या मजल्यावर
उडी मारण्यासाठी तिथून पण तिथले वेटर्स
त्यांना गोड बोलून दारू पाजतात

एका खेपेत सगळी कामे व्हावीत म्हणून
आखलेले नकाशे जगात भांडणे लावतात
सर्व राजदूत सभा घेऊन शेवटी
जगाला अर्थ द्यायचे ठरवतात

हव्या त्या सर्व गोष्टी मिळतीलच
असे नसल्याचे तत्त्वज्ञान घेऊन
क्रांती नाही करता येत
म्हणूनच सर्व पादत्राणे नेमक्या
एकाच कंपनीची असावी लागतात

साधे राहावे, माज करू नये
हाच याचा सारांश
--- ००० ---

मेंदूत विचार तयारच कसा होतो
मुळात हे वाचल्यामुळे
त्याचा टाय, कोट, बूट
हे सगळेच निरर्थक झाले
तेही सगळे मेंदूचाच
भाग असणार
या विचाराने त्याला
कर्तृत्वहीन वाटू लागले

कम्युनिझम खरे तर
त्याला आवडत नसे पण तिखट
खाण्यामुळे तर तसले विचार येत नसतील
मेंदूत या विचाराने तो घायाळ झाला

एकही वावगा शब्द न बोलणारा तो
अचानक घुमा झाला
लोकांना खटकणे हेही
त्यांचे नसणारच कर्तृत्व
या विचाराने त्याने
सेंटचा वापरच बंद केला

उत्तर तरी कसले शोधणार
या प्रश्नाने त्याचे विद्ध होणे
हेही त्याला परस्पर घडणारे
वाटू लागले – हे वाटणेही

आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटनाही
आठवून तरी उपयोग काय – असे झाले
--- ००० ---

कुणाचीही खोडी न काढता

आपण फलाटावर उभे असलो

तरी येणाऱ्या गाडीमुळे

एकटेपणा कसा जाणार

-- जे आहे तेच खरे धरून

चालावेच लागते

कारण आपली कल्पनाही

असते फक्त एक

पाळलेले मांजर

मांजर सारखे एकटेपणाची

भीती घालते

म्हणून आपण मोर्च्यात

सामील होतो

काळे चष्मे घालून

कायमच

घोळक्यात राहण्याचे

आपल्याला व्यसनच जडते

तसाच त्याचा अभिमानही जडतो

सगळ्या भाईबंदांबरोबर

सुरक्षित राहणेच महत्त्वाचे होऊन

एकटेपणा होतो बेशुद्ध

आणि जगणे होऊन बसते फक्त

एक सामूहिक आंदोलन

यातच मांजर साथ सोडून निघून जाते

ज्यामुळे संघर्षमय सुरक्षितता स्थिरावते

--- ००० ---

१.

तुमच्या आजूबाजूच्या
हवेचा पोत पाहून खरे तर
तुमचा आवाज कसा उमटायला हवा
न्यायासाठी
हे ठरलेले असूनही
तुम्ही ऊस चघळत बसलेले दिसता
किंवा संवेदनशील कलासक्ती म्हणून
तुम्ही कादंबरी वाचत बसता
याचा अर्थच तुम्ही तुमच्या
आपमतलबी उद्दिष्टांत
पडून राहू इच्छिता
असंवेदनशीलपणे

तुम्ही एखादा ढग असता
तर तुम्हाला कुणी
काही म्हटले नसते
किंवा झाड असता तरीही

पण, तुम्हाला माणसाची बुद्धी आहे
योग्यायोग्य समजते --
तुम्ही घाबरट आहात किंवा

तुमच्याही बऱ्याच कृती
गटारात गेलेल्या आहेत
मग तर तुम्ही निर्लज्ज
आणि बेफिकीर असाल
-- विनाहेतू शांत कुणी असूच नाही शकत

म्हणून तर येतो न्यायाचा प्रश्न –

--- ००० ---

२.

समोरचा सिगरेट पिणारा माणूस

ही एक प्रतिमा असते तुमच्या मनात

ज्या बगळ्यांचे मासे संपवले माणसांनी

त्यांना बुद्धी असती तर मोठी

न्याययंत्रणा उभारून

त्यांनीही केले असते

असंख्य सूडनियम

घातक काय काय आहे

त्या त्या गोष्टींच्या याद्या

करतच राहावे लागते

सिगरेट उत्पादकांचा सूड

कसा घेणार माहीत असून

तुम्हीच नादी लागला असाल तर

कायदा असतो बुद्धिप्रामाण्यवादी

तो काही भानामती नसतो

क्षणात न्याय करायला

खून का बदला खून

झाल्यावर खून झालेल्या दोघांनाही

नंतरचे काहीच कळत नाही

इतरच खुश वा नाराज होतात

वकील म्हणतो, बघा तुम्ही

उद्या कसे पांढरे होतील ते

डोळे त्यांचे – तुमचा हात
तोडल्याबद्दल आई आठवेल त्यांना

--- ००० ---

३.

मी आहे असंख्य ठिकाणी
असंख्य रूपांत प्रगटणारा
परमेश्वर ढोंगी –
तुम्ही काय वेगळे आहात

नुकसान झालेय ते मानसिक
तुमचे स्वतःच्या आणि इतरांच्या
मनांत

राजा जर पाचशे राण्या
बाळगत असेल तर बलात्कार
कसे थांबणार त्या पाप्यांना स्त्री
मिळत नाही वा ते खादाडच आहेत
यात त्या पीडित व्यक्तीचा काय दोष

आम्ही अमुक जातीचे आहोत
आम्ही विसरत नाही पिढ्या न पिढ्या
हिसाब बराबर होगा

जे गेले ते गेले
बगळे संधीची वाट पाहात
खूप वर्षे तोच अन्याय सहत राहतात
निकाल लागतो तेव्हा
कुणी कुणाचा सूड घेतला ते कळतच नाही

--- ००० ---

आयुष्याच्या सर्व बाजूंनी भिंती
असतात हे माहीत नसले तरी
जे आहे ते तेवढेच माणुसकीयुक्त
कापसासारखे शिकवलेले असते
असेच मनाचे सत्य होते
आजार आणि जखमा हे जणू
आकाशाचे भाग म्हणूनच
अटळ होते पालेभाजीबरोबर
वाकडे झालेले ताट असावे तसे

हे वाढत चालले होते की त्रासाची
सहनशक्ती धीर सोडू लागली होती
हे कळेना आणि कधीच न पाहिलेल्या
लेण्यांची वर्णने लिहिण्याचा छंद
आवडू लागला -- हेच
आयुष्याचे रूप असल्याप्रमाणे

रडू येई
स्वप्ने मुळातच छोटी असत
बाहेरच्या प्रचंड
सणासुदीच्या उत्साहात
खिडकीशी मी पारोसा पडून
असे होकार-नकाराच्या
दरम्यान

आत्मकीवेत लिबलिबताना
सुद्धा मी सकारात्मकतेने कविता लिही
निरर्थकतेच्या -- इतरांना दिलासा म्हणून
--- ००० ---

उदबत्त्यांसारखी पेटलेली
उद्गारचिन्हे सक्ती करत जातात
सगळ्याच इमारतींचे
प्रतीकात्मक अर्थ लावण्याची

विचारांचे बाण कधीच
अचूक न लागताही
एक खात्री निर्माण करतात
युद्धभूमीवरची सर्व प्रेते
जिवंत होण्याची

आसक्तीमुळे भरकटलेले मन
आख्खा बगीचा करू बघते
गिळंकृत हस्तमैथुनाप्रमाणे
वांझ आकाशात
थकत-भागत

वादासाठी मान्य केलेले
गळीच मारले जातात
सर्व विंचू
आणि सारवासारव म्हणून
विजयाचे महत्त्वच
वाटत नसल्याप्रमाणे
नम्र होतात सगळेच साप

हे सगळे निश्चित आणि खरे
वाटत राहते जोवर हमखास एखादे झुरळ
तडफडत मरताना नाही दिसत
--- ००० ---

निःशंक असणे हेच सत्य
या बोलीवरच मी
जगायला सुरुवात केली
प्रकाशाचे झाड आणि
सावलीची उष्णता स्वीकारली
-- मी डोळे उघडताच असंख्य दगडांखालून
कुत्री, मांजरी, हत्ती, वाघ, सिंह
बाहेर येऊन आपापली वैशिष्ट्ये
धारण करतात – हे मला समजले

सत्याव्यतिरिक्त इतर कोणताही
विचार न करणे हे त्यातच
अंतर्भूत होते कारण कोणताही विचार
हा आकाशाच्या सद्भावनेखालीच
करता येणार होता

सर्व वस्तू, माणसे आणि त्यांची नावे
यांची मला पावसाळ्यासारखी सवय झाली
-- याचे त्रासही स्वीकारणे हे
मूळ करारातच असल्याने
धर्मवादी असूनही
इहवाद सोडला नाही

इतर कोणतेही प्रश्न
ही ग्रेट लोकांची कामे ठरवून
शंका घेणाऱ्यांची टर उडवली --
' ग्रेटबीट व्हायचेय काय '
असे म्हणत त्यांना चेपणे चालू ठेवले
--- ००० ---

ज्यालात्याला सुचतात उपाय
साधारणपणे रेल्वे अपघात झाल्यावर --
हिरवे पोपट या दिशेने जायच्या ऐवजी
त्यांच्यांतले पदार्थ इथेच शिजवले गेले
असते तर असे घडलेच नसते – वाले
एकाच्याही बोलण्यात हे नाही येत
की बाबा मी दुःखात राहिलो
त्यामुळे माझे लक्ष गेले नाही
हेही मी मान्य करतो
आहे त्या कपड्यांनिशी

काय काय नकोय ते सर्व
सर्व हुशारांना समजते --
ते म्हणतात पूजासाहित्य
आणि मटण एकत्र पुरले पाहिजेत
म्हणजे सर्वांचेच
न्यूनगंड जातील --
साधा जगण्याचा आत्मविश्वास
मिळाला सर्वांना की झाले --
आपोआप दुय्यमत्व
टाकले जाईल
मातीशी ईमान राखत

सर्वांना इतके कळतेय हे पाहून सर्वच
चकित होतात आणि आता लौकरच प्रश्नहीन
जगात जगण्याचा एक वेगळाच आत्मविश्वास
आपल्याला शिकावा लागणार की काय
या काळजीने काहीसे काळवंडतात
--- ००० ---

शब्दांचे होतात रंग
समुद्राच्या दुःखावरून
उडालेल्या पक्ष्यांचे डोळे
चमकतात माझ्या अंधारात

भावनांच्या लाटा
हिंसक असल्या तरीही
होतात निरर्थक
फक्त असण्यात

निर्मनुष्य मनात
उमटतात
निर्घृण स्मृतींचे निनाद
माझे नसलेले

किनाऱ्यावर थांबलेली
उत्तान नर्तकी
होते त्या अंधाराला वश
समुद्राला न जुमानता

यावर समुद्राची नसते
काहीच प्रतिक्रिया
तिचे न जुमानणे
न दिसल्याने

नर्तकीचे मन
होते माझे मन
चमकणारे निर्घृण आता
माझ्या नसलेल्या अंधारात --- ००० ---

त्या मूर्खाने एकदाच
केली होती माझ्या शब्दांची कुचेष्टा
आणि तरीही तेव्हापासून माझ्या
कंगव्याचे दाते
तुटले ते तुटलेलेच राहिले
किरकोळीत रक्त पिऊन
संतुष्ट व्हावे
असे थोडेच होते माझे उद्दिष्ट

तरीही रस्त्याच्या वळणावर
अचानक एखादा जुना
शत्रू भेटावा आणि त्याला टाळून
सरळ आपण कॉफीशॉपमध्ये शिरावे
तसे विना-अपराध मी
माझ्या टोप्या बदलत राहिलो

कुणी माझे स्वागत केले
तरीही मी कसनुसे हसून
गुंडाळत राहिलो माझी मैफल
ज्यामुळे माझा नम्रपणा
झाला प्रसिद्ध

रफू करण्याचा माझा प्रत्येक प्रयत्न
बळ देत राहिला
माझ्या गरिबीला
-- श्रीमंत होण्याची आकांक्षा
सोडल्याशिवाय निकराने
माझे रक्त जणू थांबणारच नव्हते
--- ००० ---

सूर्योदयाऐवजी पूर्वेकडून
धुराचे लोट उठले
उंच उंच होत
आभाळ भरून
आक्रमत येऊ लागले

त्याच वेळी पश्चिमेकडून अचानक
वारा आणि पाऊस आला

या सगळ्या कधीच न घडणाऱ्या
अशा माहीत नसलेल्या गोष्टींनी
पक्षी, कुत्री यांचे ओरडणे
मूर्तिमंत भय होऊन
मने कापू लागले

दिशाहीन सैरावैरा
पळत सुटलेली माणसे
आप्तस्वकीयही विसरून
बाकीचे नंतर पाहू
असे म्हणत धापा टाकत
डोळे विस्फारत ओरडत राहिली

हीच असावी प्रलयाची वेळ
आता काहीच नाही करता येणार
अशा विचारांत काहीजण अंताला
तयार होत असतानाच
छिन्नभिन्न आभाळातून जवळ
जवळ येऊ लागला एक प्रचंड ग्रहतुकडा
--- ००० ---

त्या विस्तवाचा तो
महामूर्खपणाच म्हणावा लागेल
ज्याने भराभर सगळी घरे
रिकामी करायला लावली
हातरुमाल असूनही
लोकांना देशोधडीला लावले
उष्टे-खरकटे खाणारी कुत्री मारून
चांदण्यांना खेळणी म्हणून
विहिरींत भिरकावली

खरे तर हा
सुखाचा असणार होता मोसम
सर्व स्त्री–पुरुष मैदानात जमले होते
एकूणात सर्व मिळून सर्व
अवयव होते सतत प्रवासात
केवळ भावनांवर जगावे
विचार नकोच काही काळ
अशा आज्ञेमुळे
सर्व झाडांनी भयभीत होऊन
थरथरत राहणेच पसंत केले होते

उपाय नकोच होता
अद्वातद्वा धावणाऱ्या
रक्तावर

मनांना राख फासणे
हा फक्त एक जुलुमाचा रामराम होता
हव्याशा अत्युत्कट कारंज्यांपूर्वीचा
--- ००० ---

हद्द झाली !

पूर्ण स्टेशन मीच बांधून द्यायचे ठरले !

म्हटले, कशाबद्दल ?

तर धरणाचे दरवाजे उघडून

त्यांनी रूळच पाण्यात बुडवून टाकले !

मला आततायीपणा नाही आवडत

तरीही, माझे अपमान का होतात ?

रुग्णसेवेसाठी मी नोकरीवर

पाणी सोडून भणंग झालो

तरीही, उसने घेतलेले जगाचे अर्थ

सांगणारेच श्रेष्ठ ठरत राहिले !

अवाजवी असे मला काहीच नकोय

पण, माझ्या मनात साठलेली दुःखे

खोटी कशी म्हणता येतील ?

की तुम्ही म्हणताय म्हणून

मी समर्थन करायचे

प्रत्येक आत्महत्येचे ?

मला आता कंटाळा आलाय

बसेस वेळेवर येत नाहीत त्या नाहीतच !

हीही माझ्याच उसवलेल्या

स्वेटरची समस्या ?

तुम्हालाही नाही कळत काही

आय नो ! माझा स्वभाव

जरा गरीब पडतो, इतकेच !

--- ००० ---

तुम्ही द्याल ते खाऊन
तुमच्यापुढे शेपूट हलवायची
हे तुमच्या कुत्र्याला कळलेच नसते
तर तुम्हाला प्रमोशन मिळाले नसते
हे तुम्हाला पटत नाही
तुम्ही तुमची सर्टिफिकेटस, अनुभव
आणि काम यांच्यावर भर देता
कागदच नसते तर हीच सर्टिफिकेटस
कातड्यावर लिहिली असती
हे मात्र तुम्हाला पटते

तुमचा स्पर्धक बॉसशी भांडला होता
ते कळल्याने बॉसच्या पत्नीने
त्या स्पर्धकाच्या पत्नीशी संबंध तोडले होते
हे तुम्हाला निरर्थक वाटते

तुमच्या जन्माच्याच दिवशी
तुमचे वडील बरे होऊन
इस्पितळातून घरी परतले होते
त्यामुळे तुम्हाला आईचे दूध भरपूर मिळाले
हे नाही तुम्हाला दिसणार

तुमच्यामुळे तुमच्या
आईवडिलांचा घटस्फोट वाचला होता
हे नंतर का असे ना सांगितलेच होते
ना तुम्हाला तुमच्या आईने

तुमच्या वडिलांच्या मते ती लाडावलेली हट्टी होती
--- ००० ---

मी जेव्हा प्रखर
आत्मकेंद्री प्रतिक्रिया देतो
तेव्हा मला खचून सर्दी होते
ज्योक नाही – खरेच

माझे आत्मकेंद्र माझ्या नाकाच्या
वा फुफ्फुसांच्या मुळावर येते
इथेच अपराध आणि इथेच शिक्षा
हा कायदा समजल्याने
मी सुदृढांकडे अचंब्याने पाहतो
खरे तर आत्मकेंद्रच नसते तर
ते आणि मी वेगळे कसे राहिलो असतो

त्यांच्या आत्मकेंद्रांचे गूढ
मला कसे उकलणार
ते तर नेहमी गिर्यारोहण
वा परदेश वाऱ्या करताना दिसतात

शिवाय त्यांना काय आवडते
काय नाही हे ते अत्यंत
समरसतेने सांगतात

अमुक ठिकाणचा बटाटेवडा ग्रेट
निव्वळ तेवढ्यासाठी जा
ते मला म्हणतात – मी म्हणतो
फक्त खाण्यासाठी मी नाही हो जात
एवढ्या लांब आणि लगेच मला
सर्दी होते
--- ००० ---

माझे एकट्याचे मन

असे काही नसते

मी जेव्हा टाकतो माझे मन

तेव्हा जगातली सर्व मने

टाकली जातात

त्यामुळे, जरी कुणी एखादा वा अनेक

मला बेफिकीर म्हणाले तरी

खरे तर

कुणीच कुणाला काही म्हणत नाही

वस्तू, माणसे सगळी असतात

एका मोकळ्या निरर्थतेत

त्या क्षणी कुणी कुणाचा

अपमानही नाही करू शकत

जगणे थांबत नाही

पण मी असतो पूर्ण

खऱ्या जगात सर्वांसह

ज्यांत माझे

द्वेष्टेही असू शकतात

सगळी झाडे मला दिसतात

पण त्यांना हे नसते माहीत की

मीच आहे तो नसलेला

त्यांची मने टाकणारा

मनांसह असण्याचा

त्यांचा भ्रम न मोडता

--- ००० ---

माझी कविता वाचून
माझ्याबद्दल काही ठरवू नका --
कविता खरी असली तरी
मी नेहमीच खोटा असतो --
तुम्हाला मी दिसतो-भेटतो
तेव्हा तरी मी खूपच
घाबरलेला असतो
त्यामुळे मी हमखास ढोंग
करतो निर्भयतेचे

माझा खरेपणा
मला लपवायचा असतो
कारण तो माझा नसतोच
मग मी का ढोंग करावे
तो माझा असल्याचे --
माझ्या खोटेपणातले
अनेक दुर्गुण मी लपवतो
ते वेगळे – मला हीच भीती असते
की ते माझे दुर्गुण
जर उघडे पडले
तर न जाणो तुमच्या लेखी
माझा खरेपणाही खोटा पडायचा

माझी कविता खरे तर
आता मलाही तुम्हाला वाटते
तशीच खोटी वाटते --
विशेषतः माझ्या दुर्गुणांमुळे
अशक्य वाटणारी
--- ००० ---

एक तर हेतू आणि अर्थ
ठरवूनच टाकायचे किंवा
सवयीत इतके बुडून जायचे की
त्यांची गरजच नष्ट व्हावी --
तिसरा प्रकार काही कवींचा --
गोंधळसंवर्धन पुरस्कर्त्यांचा
-- या तिन्हींत सगळेच सेफ होते
कारण आता प्रत्येक वस्तू प्रत्येकाला
स्वतंत्र दिसते – जेवढ्या वस्तू तेवढे
जगण्याचे प्रकार हे स्वीकारता येते
स्थिरस्थावर

झाड हे घारीला
बसायला उपयोगी असते
पण त्या दोन्हींचा
काहीच संबंध नसतो

मादीशी रत होणारा नर
स्वतंत्रपणे त्याचे टोक गाठतो
मादीच्या वाट्याला ते टोक
येणे वा न येणे हे तिचे जगणे असते

हे विचारांचे जग असते
प्रत्येकाचे विचार वेगळे
असल्याने प्रत्येकजण वेगळा
असतो सर्वांपासून अलग
-- मधेच सगळे एकत्र जमून --
माणसे, झाडे, घारी समरस होऊ पाहतात
--- ००० ---

## स्पर्श

माझे हात
तुझ्या असण्याचे पडदे खोलतात
तुला अधिकच नग्नता नेसवतात
तुझ्या देहाचे देह उघडे करत जातात
माझे हात
तुझ्या देहासाठी एक वेगळाच देह शोधून काढतात

-- ऑक्टाव्हिओ पाझ.
पाझच्या ' **ऍक्रॉस** ' या कवितेतल्या काही ओळी –

माझे डोळे मिटून
ते मी उघडतो तुझ्या डोळ्यांत

सदोदित जाग्या असणाऱ्या
स्वतःच्या रत्नशय्येवर :
तुझी ओली जीभ

तुझ्या धमन्यांच्या उद्यानांत
खूप झरे आहेत

रक्ताच्या मुखवट्यासह
मी तुझे विचार ओलांडतो शून्यपणे
स्मृतिभ्रंश नेतो मला
जगण्याच्या उरलेल्या दुसऱ्या बाजूला

-- ऑक्टाव्हिओ पाझ
--- ००० ---

ना कधी नदीकाठी राहिलो
ना कधी शहरात समरसलो
ना निसर्ग ना इमारती ना वस्तू
काहीच नाही होणार प्रतिमा
माझ्या कवितेत

गरिबी मान्य केली
स्वस्तोम नाही माजवले
भावना दडपून टाकल्या
स्वतःचे काहीच फार
ओळखीचे नाही केले

रुक्ष अहंकार
बोचरा ठेवला माझा
सदोदित अंतर राखणारा
अश्रूंपासून

ज्या घडल्या घटना
त्यांच्या मागचे
माझे मन
कधीच उघडे नाही केले
जणू सगळी फक्त
चालरीतच चाललीय

माझी कोणतीच सुखदुःखे
कुठेच पोचली नाहीत नीट
माझे जाणेही असेच दडपून
मी जाईन निघून नकळत
--- ००० ---

मला नाही पटत पण तो खात्रीने सांगतो
त्याचे जगणे अनेक रूपांत चालु असल्याचे
कधी तो वक्तमधला राजकुमार असतो
राजकारणात न पडणारा तर कधी तो
असतो इंदिरा गांधी वा रवींद्रनाथ टागोर
त्यामुळे त्याला प्रसिद्धीची काळजीच नसते

हळूच उलगडलेली बूटपॉलिश करणारी मुले
त्याच्या बंगल्याच्या व्हरांड्यात चित्रे
काढत बसतात बियर पिणाऱ्या ट्रकड्रायव्हर्सची
रात्रभर त्याचा डोळा नाही लागत त्यामुळे
कशासाठी आपण इतकी धावाधाव करतोय
असे त्याला वाटत राहते मुखवटा उतरवताना
अमिताभचा नुक्ताच दात घासून आलेल्या

आजारी पडून चालणारच नाही कारण
हा डोलारा धाड धाड धाड करत कोसळला
तर गतप्राण होतील असंख्य शिक्षक
पेट्रोल पंपांवर शिकवणारे जुगारांचे डाव

त्यापेक्षा तो ठरवतो की सरळ उठून
जावे पिकनिकला त्याच्या एकमेव मैत्रिणीसह
जी तो स्वतःच असतो अनेकदा मादक आणि आवाहक

मुख्य म्हणजे कुणाला हरवायचा प्रश्नच नसतो
जे उपलब्ध जग आहे ते तो पुरेपूर वापरतो
त्याच्या आधीचे आणि नंतरचेही सगळे वेटर्स
त्याचा मान राखणारेच असतात जरी तो मधूनमधून होतो बँडवादक निरक्षर
--- ००० ---

डिप्रेशनची सरासरी वाढल्यामुळे
राजकीय उलथापालथ झाली
असा सारांश सिमला बैठकीत निघाला
तेव्हा संध्याकाळचे
सात वाजलेले होते
आणि सूर्यप्रकाशाच्या
ॲलर्जीवरच्या गोळ्यांमुळे
खूप माणसे झोपी गेलेली होती

होऊ दे काहीही -- ते तर होणारच
पण कशामुळे काय झाले
याचा मागोवा घेत राहणे
महत्त्वाचे होते विरोधी पक्षांच्याही
गरजेचे होते मुख्य म्हणजे
कळत तर राहायलाच हवे ना
सिगरेटच्या धुरात रस्ता
वाहून गेला ही नुसती बातमी
कशी पचवणार निरीक्षक आणि विश्लेषक

इतिहास कळला की आयुष्य
ताब्यात राहते ही सर्वांचीच श्रद्धा होती
जरी मेंदू भिन्न भिन्न असल्याने
सर्वांचे पाळीव प्राणी वेगवेगळे
आणि वेगवेगळ्या जातींचे होते

सर्व कळत सतत खात्रीशीर
जगण्यासाठी सर्वांकडे बुलडोझर होते
मतभेदांचे अडथळे जमीनदोस्त करणारे
--- ००० ---

संध्याकाळचा पाऊस पाहताना आज
तशाही ओल्या वातावरणात धगधगताना
पाहिलेली एक जुनी चिता आठवते
पहिला पांढरा केस सापडताच
दचकून आकाशाकडे पाहावे तशी

आपल्या मनातून ओसंडू शकणारे
आसक्तीचे फुसांडते प्रवाह
ज्या ज्या इमारतींना स्पर्शून गेले
त्यांना त्यांना कधीच नाही विसरता येणार
शेकडो वर्षे पुराण्या वृक्षांचे हे जंगल घनदाट
त्यांच्या मनांचे सर्व स्वातंत्र्य
हिरावून घेणारे – हे माहीत असल्याने
आता चालीत शांतता असते

हा काय प्रमोशन करत बोर्ड
झळकवायचा सिनेमा थोडाच असतो
नुसता साधा एक कप चहा समजून
ओलांडायचे असते सामाजिक क्षितिज
फरफरत जाणाऱ्या कापराप्रमाणे

तीच तीच हत्या पुन्हा पुन्हा होऊ शकते
असे हे एकच मानवी सत्य
सर्व भ्रमांचा नाश करणारे
सकाळ होताच अंधारात गडप होणारे

या हृदय कुरतडणाऱ्या पक्ष्यापासून सुटकेचे सुरू होतात
निकराने विचार अधिकच उत्तेजक गुंतवणारे जखमा करत
--- ००० ---

हळूहळू बदलत गेले --

सगळी उदघाटने

माझ्या हस्तेच होऊ लागली

खरे तर मी माझ्या त्याच त्याच मीला कंटाळलो होतो

माझी चिडचिड होत होती

एकदा प्रतिमा रोवली गेली डोक्यात की

पत्नीही तीच तीच होते कंटाळवाणी

चिडचिड निर्माण करणारी

पण आता हे उदघाटनांचे बरे जमले

रोज नवी माणसे, नव्या फिती

आणि छान कपड्यांत सगळ्या व्यक्ती

ज्या मी नाहीत वा माझी पत्नीही

-- हे तरी का घडू शकले तर माझे

माझ्या भूतकाळातले अतोनात कष्ट आणि उत्साह

इतरांच्या दृष्टीने तीच माझी प्रतिमा आहे

अतोनात कष्ट आणि उत्साह

पण प्रत्येक वेळी ते इतर नवे असतात

मी तोच असलो तरी

हल्ली मला वाटते की याच्या

मुळाशी जायला हवे – असू शकते का

एखादी प्रतिमा सतत बदलणारी

कायम फ्रेश आणि तरीही ओळखीची

त्यासाठी मला आधी माझा कंटाळा

आणि नावीन्याची गरज – हेच तपासावे लागतील

तेच माझ्या प्रतिमेची सुरुवात समजून

--- ००० ---

तुझ्या असलेल्या दृश्यात
मी आणखी एक दृश्य मिसळतो
माझ्या भूतकाळात
वाट पाहात थांबलेले ...
भाषेचा वापर नको आणि ओळख नको
असेच ठरले ना आपल्यात
त्यामुळे अत्युच्च कोटीची
स्वप्ने लावली मी
तुझ्या मनःपटलावर

तुझ्या सहवासात
प्रत्येक क्षण उलगडत होता
विश्वरूप होत
अलग अलग विचारांची असूनही
एकच दुनिया वसवत
आपल्यासाठी

तुझे अनावृत जगणे
मला समजत होते म्हणजेच स्पर्शत होते
मी म्हणत होतो
माझ्या ऐवजी तुझाच भूतकाळ
घेऊ आज चवीला तर
तुझी हरकत नव्हतीच

माझ्या बोलण्याने भाषेला छिद्र पडले
म्हणजे वर्तमानाला
पण तुला ऐकू नव्हते येत
बिनभाषेचे तुझे वचन अबाधित होते
--- ००० ---

या ना त्या हजार प्रकारांनी
असंख्यांच्या छळांचे असंख्य मार्ग
निर्माण करणाऱ्या राक्षसाच्या
अभेद्य प्राणाचे रहस्य होते
इथून हजारो किलोमीटर दूर
असणाऱ्या राज्यातल्या
एका विहिरीतल्या भिंतीवरच्या
सरड्यात बेगुमान जगणाऱ्या
-- असे कुणी म्हणत
-- ते बघू नंतर – आधी इथले
कुपोषण घालवू, खून थांबवू
-- असेच म्हणत राहात बाकीचे सगळे

जन्माला येताना कुणी
संपादक, पत्रकार, निरीक्षक वा विश्लेषक
बरोबर आणू नयेत हेच खरे
-- ते सगळेच सत्यवादी असूनही
त्यांच्यांत टोकाचे मतभेद होत
आणि प्रश्न अधिकच जटिल होत

असा कुणी राक्षस नाही राज्य नाही सरडा नाही
-- उगीच प्रश्न लांबणीवर नका टाकू
अन्यथा लौकरच आम्ही सशस्त्र उठाव करू
-- लोक म्हणत – इथे जे आहे त्यातच
मुळात जाऊन धाडसाने ही रचना
उलथवायला हवी – असे ते म्हणत

खरे काय ते ठरवतच मार्ग काढले जात
--- ००० ---

ते नारळाचे झाड
रात्रीही तिथेच असे
अंधारात अस्पष्ट
माझा सवंगडी झालेले
मी आजारी खिडकीतून बघत
त्याच्याकडे आणि ते लहरत वाऱ्यात
कधीही माझ्या विचारात
नसणारे असे ते

मी
एका बाबांचे दर्शन घेऊन
येऊन पडलेला अंगारा फासून
माझे स्वप्न बरबटवून
तेव्हाही ते तिथेच तसेच
नारळ धारण केलेले
निरोगी

तसाच पडून मी
अभ्यास करे दुःखाचा
माझ्या कॉटसमोरच्या
भिंतीवर उमटलेल्या
झेंड्याचा आणि विमानाचा
तेव्हाही पाहिले तर
काहीच कीव नसे त्याच्या झावळ्यांत

काही दिवस कळलेच नाही ते गेले कुठे ते
नंतर तिथे एक इमारत दिसू लागली
तिला तर वाऱ्यात लहरताही येत नव्हते – पण, ते गर्विष्ठ होते
--- ००० ---

हे निव्वळ

तिच्यामुळे घडते

एरवी तीही

इकडेतिकडे

खरचटत फिरते

पण अचानक

माझ्यासमोर येताच

विपरीत घडते

माझ्या मनात

असतो एक दगड

तो अचानक

विरघळून नष्ट होतो

म्हणजे रूपांतरीत

नाही होत

नष्टच होतो

जणू कल्पितच

असावा असा

आता जे जग

आहे तेच मला

कल्पित दिसू लागते

कसलाच कशालाच

पायाच नसलेले

तीही तशीच दिसते

कल्पित – पायाहीन

पण समाधानी दिसते

--- ००० ---

सर्व वस्तूंच्या आवरणाखाली
असते एक भाषा
एकूणच मानवाला प्रस्तुत
ती ओळखून
आपापल्या भाषेतही
ती विस्तारता येते

अंधाराचे राजकारण
हे कधीच सूडाचे नसते
ते तसे वाटणे
हे आपल्या मर्यादित
भाषेमुळे घडते
अन्यथा फक्त
कोणतीही वाफ
संगीतात पकडली
तर सहज होणार असते
कोणत्याही दोन वस्तूंच्या
स्पर्शांचे मीलन

वस्तूंत रंगून गेल्याने
त्यांच्या मागचे
त्यांच्या अभावाचे जग
जणू पावसात वाहून जाते आणि वस्तूंचे जग
प्रेयसी मिठीत
आल्याप्रमाणे
अप्रस्तुत करते सर्व दाहक दुःखांना
त्याच्या दारुण दबावाखाली
-- खरे तर चव आणि नाद एकच असतात –
--- ००० ---

अरे, प्रेयसी म्हणजे काल्पनिक रे मित्रा
उगीचच माझी प्रतिमा दुरुस्त करून बिघडवू नकोस

तू तरी कुठे खरा आहेस – मला तर फक्त
तुझी सद्गुणी प्रतिमाच माहीत आहे

माझ्या आधीपासून हे विश्व होतेच
तरीही, सूर्योदयाला मी कायद्याचे पुस्तक वाचतो

बघ, दोन्ही कल्पना म्हणजेच प्रेयसी खरीच
हे झाले चालु तुझ्या मनात मला धिक्कारत

तू प्रेमाचा विषयच काढत नाहीस कुठे
तुझी प्रतिमा जपण्यासाठी सुरकुतत जातोस

प्रेयसीला असे नाही चालत – ती शोधत असते
हक्काने तिच्याकडे पाहणारा, खात्रीने बोलणारा

ती नकारही देऊ शकते – मग तूही नाद सोडावास
पण तिच्या प्रतिमेसमोर तुझी बनावट प्रतिमा नको

प्रतिमांचे खेळ खरे थोडेच असतात – फक्त ते
खरी इजा न करता सन्मानाने चालायला हवेत

तुला तुझी प्रतिमा आणि आप्तस्वकीय
यांचेच महत्त्व असेल तर ते प्रेयसीला नाही चालत

तीही तिच्या प्रतिमेचा डाव खेळतच असते
तिला धोका चालतो पण प्रतिमा खरीच लागते --- ००० ---

ट्रॅफिक जॅमच्या कोंदट मनःस्थितीत
मी रिक्षा सोडली ती नेमकी
शुभगाठ या विवाहसंस्थेच्या
ऑफीससमोर
जिथे काही वर्षांपूर्वी
मी पहिली कविता लिहिली होती
तिथल्याच एका काळ्या
खुर्चीवर बसून विमनस्कतेची

तेव्हापासून माझे हेच मत आहे
की कविता खूप मोठ्या ओळींची नसावी
आणि फार मोठीही नसावी
भावनिक घटनांच्या तपशीलांनी
भरलेली काठोकाठ
कोंदट मनःस्थितीसारखी

रस्ता मोकळा होईपर्यंत
मिसळपाव खायचे ठरवले
तेव्हा लगेचच मनावर
तरंगू लागला
माझ्या यशाचा तवंग

त्याच ट्रॅफिकचा लचका तोडून
त्याने मी समजून घेत होतो
परिस्थितीचे भवितव्य

नकळत तो सोडला जाताच परिस्थितीच नष्ट झाली
मोकळेपणात विचारा ऐवजी अचानक शांतता आली
--- ००० ---

नाही तरी आगा ना पीछा
हा सगळा भ्रमच असेल तर
माझ्या एकट्यासाठीच कशावरून नसेल ?
मी समजतो की
डाळीचे भाव वाढले
म्हणून कुत्री चेकाळतात

पण त्याच वेळी मला
हेही वाटते की असेच
इतर सगळ्यांनाही वाटत नसेल का
-- हा विचार माझ्या मनात
येण्यासाठीच हे इतर सगळे
असावेत

एकदा भ्रमच म्हटल्यावर
किती लोकांसाठी किती भ्रम
याला काहीच अर्थ नाही
खुनांच्या बातम्या ऐकून
मी सुन्न होत असलो तरीही
त्याचप्रमाणे इतरही दिसतात
आणि खून करणारा आणि
करून घेणारा – त्यांना काय
वाटत असावे या माझ्या विचारांशी
त्यांचे मॅचिंगच असणार बहुतेक

डाळी आणि कडधान्ये प्रथिनांसाठी आवश्यक
असे मी म्हणावे यसाठीच ते कुणीतरी
शोधून प्रसिद्ध केले असे मला वाटत असणार
--- ००० --- ------------------------------------------------------------------------------------------------

माझ्या मनात प्रवाही काहीच
राहिलेले नाहीय – मनपर्णीच
आहे नुसती अगडबंब
स्फोटासारखी
उचकटत जाणारी
माझी स्वस्थ नखे आणि स्वप्ने

मला अपेक्षाच नसते
सूर्यावरून उडालेले पक्षी
माझ्या खांद्यावर
येऊन बसण्याची
मला आश्रयदाता समजून
कारण माझ्या घट्ट
स्थिरपणामुळे
माझ्या जिवंतपणाबाबतच
मी साशंक असतो

दगडाला मन नसते
हे मी गृहीत धरत असल्याने
मला त्याच्याबद्दल
आत्मीयता असते आणि आदरही
त्याला माझ्या मनाबद्दल
विचार करावा लागत नसल्याने

माझ्या मनात मनपर्णी
वाढत राहिल्याने मी जिवंत
असल्याचे मला कळते अन्यथा मला
मी दगडच असणे आवडले असते
--- ००० ---

त्याच्या उपयोगासाठी त्याने
एक ठरवूनच टाकले होते –
सावली म्हणजे शांतता

आपले मन चालुच नसेल तर
हे काही घडलेच नाही असे होईल
मग असलेली दुःखे आणि अन्याय
कसे नष्ट होतील

त्याचा मित्र म्हणे -- तुझ्या गळ्यावर सुरा
ठेवला तर ही सगळी तुझी चैन बंद पडेल --
नोकरी असल्याने तुला पंख फुटतात
आणि तुला जगात नसलेल्या वस्तू
दिसत राहतात – तुझी बायको
तुला संभाळून घेत राहते
म्हणून तू तुझा मेंदू वारेमाप
उधळत राहतोस -- खरे तर फक्त
उन्हातल्या लोकांना सावली मिळायला हवीय

अरे वा ! म्हणजे शांतताच तर हवीय !
मग मी योग्य मार्गावर आहे असे म्हणून
धोका तर घ्यावाच लागेल असेही म्हणून
त्याने सरळ एक पालच पकडली

यात प्रगती वगैरे काही नसणार
एक तर सावली असणार वा नसणार
असे म्हणत तीच पाल त्याने सदहेतूने
त्या मित्राच्या खिशात टाकली –
--- ००० ---

नुसतीच अनिश्चितता कशी चालेल
म्हणून त्यांनी सर्व जरुरीच्या वस्तू
तयार ठेवल्या आणि मग मोर्चा वळवला
जग अधिकच खात्रिशीर आणि सुरक्षित
करण्याकडे मनच निःशंक करत

तरीही जवळचे स्त्रीपुरुषही
एकमेकांच्या मनांबरहुकूम
आकार घेईनात – वेगळेच निश्चित होत राहिले
निश्चित म्हणून निवडलेले व्यवहारही
परिणाम आणि वेळा चुकवू लागले

ज्यांना ज्यांना समोरच्या ढगाचा आकार
सशासारखा दिसेल त्या त्या सर्वांनी
सोबत दही घेऊन उंदीरगावाला जमावे
असे सांगण्यात आले
आणि ज्यांना तो ढग म्हणजे
वडाचे झाड वाटत असेल
त्यांच्यापासून सावध राहावे आणि त्यांना
शत्रूच मानावे निश्चितपणे
असे ठरले

निश्चिततेची अधिकच खात्री होण्यासाठी
कुणी खूप अभ्यासपूर्वक विचार मांडून
ठामच मांडले की शेवटी विजय
ढगात ससा दिसलेल्यांचाच होईल

अनिश्चिततेचा मागमूस राहिला नाही
--- ००० ---

तसे तर भाषा म्हणजे
फक्त आवाज जरी ते
व्याकरण आणि तर्कयुक्त
आणि व्यक्तिगत
मनाचे द्योतक

भाषेतून भाषेबाहेरचे
बोलण्यात काय अर्थ आहे
अनुभवसिद्ध भाषाच फक्त
संवादसाधन

पण, ती प्रत्येकाची वेगळी असल्याने
माणसे एकमेकांना म्हणतात की
तुमच्याशी संवाद अशक्य आहे

फक्त आवाजांत कसे सामावणार
पूर्ण विश्व
आणि कान तर विश्वानेच दिले आहेत
भाषेबाहेरून

सुख-दुःख भोगणारे मन
कशी वापरणार भाषा
त्यांच्या बाहेरची

त्यामुळे, एकूणात, खरे तर
भाषापंडितांना आणि बहिऱ्यांना
भाषा नेहमीच परकी राहते
विश्वबाह्य
--- ००० ---

मोहात पडल्यानंतर

नोकरीच्या वेळात सापडलेली पिसे

तुझ्या डोळ्यांत खुपसून मला काय मिळणार आहे ?

रक्त वाहात असले तर माणूस

जिवंत असल्याचे कळते

आणि पहाटेच्या वेळी

उत्तेजक जखमा होतात – हेच पुरेसे आहे

उगीचच कुणी कुणाचे

संभोग मोडत नाही

असतेच कुठेतरी

भूतकाळात पडलेले

एखादे रक्तरंजित स्वप्न

मुंबईची गर्दी जर सांसर्गिक

रोगी झाली त्वचा गळणारी

तर किळस येणे बंद होऊन

त्यातल्या त्यात

प्रेमाचे क्षण शोधतील

घामट इंद्रिये

शेवट असा काही नसतोच

असते ते फक्त बळी पडणे

आणि निर्भर्त्सून घेणे

अनैतिक वागणुकीसाठी

कातरून पडलेल्या कानांचा खच

हेच तुझ्या संगीताचे सहृदय श्रोते

--- ००० ---

ओतून दिलेल्या किटलीसारखी
वाट फुटेल तिकडे धावणारी रात्र
जन्मवेळेपासूनची लोकगीते म्हणत
खड्डे पाडत जाते
तिला थांबवू न शकणाऱ्या मनाला

मनाला हवा असतो अर्थ
प्रकाशाच्या नावाने निघणाऱ्या
जीर्ण धांदोट्यांचा
ज्या असतात मनाचेच भाग

जन्मतः दिसलेले जगच
चालु असते अव्याहतपणे
कितीही स्वप्नांनी आच्छादले तरीही
स्वछळाचे खेळ न थांबवणारे

लैंगिकतेशिवाय दुसरे काही नाहीच
असे बुभुक्षित वारे उठवत राहतात
चक्रीवादळे पूर्ण विस्कटत
मनातल्या मादीचे अस्तित्व

हे काही उत्तर नाही असू शकत
अधिकाधिक आजारी होत चाललेल्या
सर्व भिंतींवर काळवंडणाऱ्या

वेगळे काही घडूच नाही शकत -- ही
स्वतःचीच शापवाणी ऐकून मात्र
बुद्धिमान मन पेकाळून पडते
--- ००० ---

मन सदोदित असते
कोणत्या ना कोणत्या सुधारगृहात
वयाचा नसतो प्रश्न वा प्रक्षोभाच्या वेळच्या
वेडाचाही – पडद्यामागचे सर्व धंदे
उरकून तोंड पुसत बडीशेपेच्या वासात
काढतात इतर मने त्या मनाची धिंड
उघड्या पडलेल्या त्याच्या गुन्ह्यासाठी

त्यांतली काही तर
त्याच्याच मालावर
डल्ला मारून आलेली असतात
विसंबण्यायोग्य नसलेल्या

आपण निष्पाप वा भोळे नसून
गुन्हेगार आहोत
असे वाटणे हेच त्या मनाला
कमी अपमानास्पद वाटते
विचारांच्या उलट्या थोपवत

सत्यबित्य काही नसते
असतात फक्त विचार
हे मनोमन मान्य करून
ते मन निकाल मान्य करते

शिसारी आणणारा वडा जुन्या तेलाच्या
उग्र वासाचा आणि समोरच्या इमारतीतल्या
सुंदर तरुणीचा ढळता पदर यांवर त्या मनाची
वैचारिक गुजराण होत राहते
--- ००० ---

हात पाय आणि कंबर आणि मान
सगळीकडून पिरगाळून काढावे लागते
माझे अस्तित्व जेव्हा लोणी बॉयलर
चांदणी आणि टाय आणि माणसे
यांना ओळखून टिकवायचे असतात
सगळे संपर्क उकळत्या पाण्यात
शांतपणे हात घातल्यासारखे

या सर्वांऐवजी काय काय
असू शकले असते याची कल्पना
मी करूच नाही शकत कारण
माझे मन सतत चिकटलेले असते
झाडांना फ्रिझला आणि एसटीला

मला चाळाच आहे मते बनवण्याचा
जणू मी आहे एक पर्यवेक्षक
सर्वांवर नजर ठेवणारा आणि त्यांचे
मूल्यमापन करणारा स्वतः
वेदनामय पिरगाळला जात

सकाळच्या वेळी उसवलेला सूर्योदय
मी स्वेटर म्हणून विकतो आणि होतो
सर्वांचे पोट भरल्याशिवाय
न जेवणारा काल्पनिक राजा वर्षानुवर्षे
मृत स्मृतींच्या मांसाचे कारखाने
चालवत अनभिषिक्त निर्लज्जपणाने

मी अदम्य न्यायी जणू विश्वाबाहेर असणारा
--- ००० ---

हसतमुख असण्यासाठी
दौडत यावे लागतात
घोड्यांऐवजी धोंडे
तरच शक्य असते
पावसाच्या पाण्यातली
हिंसक जीवनद्रव्ये
आपल्या भावनांना खाऊ घालणे

कुणाला वाटू शकते की
खूप मेहनतीने आत्मसात होतील
डासांचा नाश करायची कौशल्ये
पण त्याच वेळी बागेच्या प्रवेशदाराशी
उभी असलेली वेश्या
करू शकते किंमत
तुमच्या अस्मितेची

तुम्ही नाद सोडावा हेच बरे
कारण पिढ्या न पिढ्या तुम्ही
बाजारात उभे राहून
फक्त सवयीने ओरडत
आला आहात तुमच्या विचारांचा ब्रँड
उंचावत तुमचा संयुक्त लोगो
मिशी आणि स्तन यांचा

तुम्हाला जिंकायचेच असल्याने तुम्हाला
कंटाळा आल्याचे कळत नाही
तुमची सर्व कृत्ये म्हणजे फक्त तुमच्या
रटाळ मनोवस्थांचे अटळ उद्रेकच
--- ००० ---

तो फक्त एक रेसचा घोडा आहे
पळण्याचा खूप रियाझ करणारा
त्याला कसे माहीत असणार की
तू एक तर विजयी वा पराभूत
असू शकतोस ते किंबहुना
तू आहेस या जगात त्याच्यामुळे विद्ध
याचीही त्याला दखल नसणार
तू त्याचा द्वेष करत असलास तरी
त्याच्या लेखी तू फक्त एक पुस्तक
त्याचे आणि त्याच्या भाईबंदांची चरित्रे
देणारे आणि लौकरच चोळामोळा होणारे

कित्येक रोखपाल मोजतात
तुझे उपरोध तुझे संताप
तुला मौल्यवान वाटणारी
तुझी भुकेकंगाल सत्ये
त्यांनाही शेवटी सर्व हिशोब
पूर्ण करून भावनांचा
मगच जाता येते त्यांच्या त्यांच्या पत्न्यांकडे

सत्ता बिघडवतेच माणसाला हे तूच
म्हणत असूनही तुला कशाला हवीय ती
युगानुयुगांचा सूड घेण्याची
तुझी इच्छा हीच फक्त चालु नसते जगात
झाडांना पक्ष्यांना काही वेगळे वाटत असते
नद्यांवर धरणे होतात विनापायलट
विमाने उडू लागतात घोडे बदलतात
पण तुझे चालु दे – जमूनही जाईल सूडाचे
--- ००० ---

धूर खूप आहे आकाशात
उनाड मन म्हणतेय की
रात्रींचे अनुभव लागणारच
समतोल जगायला

झाडांच्या खोडांवर स्वतःची
नावे कोरणारे जातीय लोक
प्रदूषणमुक्त विचारांचे
पाणी आणू इच्छितात
पंचतारांकित उच्चस्तरीय
बैठकीत गरिबांचे हित
हेच लक्ष्य अशी घोषणा देत

जमीन विरोध नाही करत
विष आपोआप भिनते
सर्व डोळ्यांत जसे
सर्वच श्रीमंत मोतीबिंदू

आपापल्या केशरचना
आणि आपापल्या आवडींची
मुरलेली सर्व
भूतकाळाधारित लोणची
हीच समानता आणतील
ही सर्वांचीच श्रद्धा असते
वैज्ञानिक

भल्याबुऱ्याचे निर्णय
वैज्ञानिक लोकशाहीने होतात
--- ००० ---

सगळेच निश्चय डळमळीत करणारे
प्रेमाचे पेरू
थेट मनातच शिरून करतात कारवाई
दगडांवर फेकावा शेंदूर
तसेच फासतात हास्याचे अडवेतिडवे
हक्काचे सादप्रतिसाद

वस्त्रे तर गळून पडतातच पण शरीरही
होते फितूर अनवधानाने
पराभूत होत

मी अधिकारी, मी आक्रमक
हे पडते बाजूला
ओलेत्या स्पर्शांची जादू
जणू थोपवत थोपवत

न दिलेले हक्क घेतले जातात
रहदारी हे सर्व पाहात असूनही
बेभानपणे
लाज सोडली जाते भर चौकात

कुणी मधे नाही पडणार
कुणी म्हणणारही नाही
त्या बेमुर्वत बटांना
की आवरा तुमचे आवाहक आव्हान

कुणी कुणाला भरीला पाडले
हे इतक्या उंचीवरून सूर्याला कसे कळणार
--- ००० ---

मी तुला अनेकदा सांगितले
मला तुझे आयुष्य जगायचे नाहीय
माझेच ठीक आहे ते कसेही
असले तरी बारा गावचे निरर्थक

तुझे पॉश संताप मला झेपणार नाहीत
लघवीच्या जागा ठरलेल्या
असण्याची मला सवय नाहीय

हेवा वाटतोच मला नो डाऊट तुझा
तुझे कपडे पाहूनही माझे विचार
एक तर थरथरतात किंवा गारठतात
नेमका त्याच वेळी तू सिगरेट ओढत
असलास तरी मला ती ऊब नाही मिळत

इतक्या प्रेयस्या असणे म्हणजे
किती ही प्रतारणा असे विचार
करत मी मत्सरग्रस्त होतो
जरी मी स्त्रियांचीच बाजू घेऊन
तुझ्याच हातात निखारे ठेवायला
उत्सुक असतो

चांगले वागणे म्हणजे काय
हे माझे ठरलेले असले तरी
त्याविरुद्ध वागायला माझी ना नसते
पण गुप्त राहायला हवी माझी टूथपेस्ट

तुझ्या ऐवजी मी असणे मला चालु शकेल
--- ००० ---

घटना म्हणजे स्मृती, नोंदी आणि अर्थ
घटना मानसिक असतात
समोर काहीच नसते

मने नसतात घटनांशिवाय
त्यामुळे सर्वांना त्या निकरावर
अनुकूलच घडाव्या लागतात

घटना म्हणजेच विषमता, हिंसा,
अत्याचार आणि अन्याय
तेच तर मुख्य कार्य मनांचे

अन्यायाच्या भीतीने  किंवा
हिंसेच्या भीतीने
एकोपे करतात अनेक गट

अपमान, निराशा, सूडभावना
म्हणजे फक्त अस्तित्वात नसलेल्या
घटनांचे मानसिक अवशेष

शौर्याने निराकरण, प्रेमाने दिलजमाई
विश्वासघाताने खच्चीकरण
हे सर्व घटनांप्रमाणेच खोटे

मूल्य म्हणजे जर प्रेम असेल तर
जगण्यात स्मृती लागतीलच पण
घटना नकोत

--- ००० ---

त्यांना महत्त्वाचे वाटल्याने
ते सत्यनारायणांना चिकटून राहिले
त्यांनी डोळे लालबुंद वटारले
आमची गाऱ्हाणीच राहतील अग्रभागी
म्हणून त्यांनी घोषणा दिल्या
स्वतःलाच जखमा करून घेतल्या
सतत त्यांच्या आवाजांनी
इतरांचे कपडे फाटत राहतील
अशी तजवीज केली

येणाऱ्या सर्व पिढ्या
त्यांच्या आदर्श आणि नैतिक आणि न्याय्य
उदात्ततेत गुरफटत राहतील
आणि फक्त राजकीय
गटारांतूनच चालत राहतील
याची त्यांनी आटोकाट काळजी घेतली

त्यांच्या बर्फाच्छादीत स्वप्नांचे
प्रत्यक्षात अवतरणे गृहीत असले तरी
ते घडेल तेव्हा घडेल पण तोवर
सर्व मॉल्स आणि अभ्यास बंदच ठेवावेत आणि
कुणीही सूर्योदयाचे गोडवे गाऊ नयेत
अशी पीडितांच्या हक्काने
त्यांनी काटेरी कुंपणेच घातली

माणसाला दुःखातच जगावे लागणार का
हा प्रश्नही त्यांनी मूर्ख आणि घटनाबाह्य ठरवला
आणि मोर्च्यांत ओरडत ते विजयी होत राहिले
--- ००० ---

कुत्र्याची लाळ हेही एक दृश्यच असते
ते मात्र क्षुद्र आणि मोगऱ्यावर
पाय पडल्याने झालेले दुःख मात्र
पुण्यप्रद – असे नाही चालणार
तुमची पांघरुणे तुम्ही संभाळा
ट्रिपला गेलेल्या झुरळांची
कौतुके सांगून बोअर नका करू

मी या खोलीत आलो तेव्हा
इथे कुणीच नव्हते आणि काहीच नव्हते
नंतर भरले गेले इथे असंख्य अर्थ
त्यामुळे नंतर आलेल्यांकडे
लक्षच गेले नाही

सफरचंद खाणारा पडदा
कायमच झाकत राहिला
काही अश्लील आणि अनैतिक गोष्टी
पण खरे तर कशालाच काहीच
म्हणायची गरज नव्हती
रस्त्यावर दूध ओतणारे बंदकरी
वेगळे का ठरावेत जर
सगळ्यांनाच मादक द्रव्यांची
व्यसने असतील तर

मन निश्चित करत गेल्यामुळे
अर्थही निश्चित होत गेले
आता बसा बोंबलत आणि
बळी पडत
--- ००० ---

ढग हा एकच नसतो
प्रत्येकाची कल्पना वेगवेगळी असते
त्यामुळे खरे तर ढग असंख्य असतात पण
तरीही ढगाला सर्वांचीच मान्यता असते

हेच तर जग
उगीचच कोण कशाला कपडे
उतरवायच्या भानगडीत पडेल
यातच योग्य ती खरेदी व्हायला हवी
आणि जागतिक शांतताही
नांदायला हवी
असेच सर्वजण म्हणतात
जरी गडगडाट होतो
आणि विजा चमकतात

सर्वांचेच असे समान असल्यामुळे
वेगवेगळ्या शस्त्रांचे बहर येत राहातात
आपल्या एकाच मनालाही हे जग वेळोवेळी
वेगवेगळे दिसते हे माहीत असूनही
उदबत्तीचा योग्य सुगंध
सापडला की झाले असेच सर्वांना वाटत असते

जगाचे सातत्य रोज दिसत असल्याने
प्रेयसीचे सातत्यही गृहीत धरले जाते
ते तुटण्याच्या भीतीसह

ढग आणि जग जसे वाटताहेत तसे मनाने घट्ट
धरून ठेवले जातात जणू मृत्यूच्या विरोधात
--- ००० ---

माझ्या मनाचे फुलपाखरू
समजून असते आपोआप नकळत
कोणत्या वेळी कोणता भाग वापरायचा
मेंदूचा ते
कधीकधी त्याच्याच फडफडण्यातून
मेंदूवरचा एक नवीनच प्रदेश
त्याला दिसतो आणि ते
अधिकच समाधानी आणि निश्चिंत होते
की बरे झाले बाबा – हेही माहीत झाले

ते रोमँटिकही होते कधी कधी
भ्रमिष्टही होते तरीही वावडेच असते
त्याचे कवितेशी --
असंबद्ध गोष्टींना मेंदू नाकारतो --
फुलपाखराला वाटते
हा मेंदूबाहेरचा तर प्रदेश नसेल --
मेंदू निश्चिंत असतो --
आज ना उद्या संपेलच
कवितेचा काळ --
मेंदूला कदापि ओळखीचे नसलेले
असे शब्दसाहचर्य अदभूत घेऊन
कविता घेते वेध
फुलपाखराच्या एकूणच जगण्याचा

स्वतःची सुखदुःखे गौण ठरल्याचे वाटून
ते कावरेबावरे होते पण कविता क्रूर नसते

ती तर समस्ताचाच आवाका घेते -- सर्वांसह
--- ००० ---

प्रत्येकाची पत्नी इस्पितळातच असते
आणि सतत बरी होण्याच्या प्रयत्नात असते
हे त्याचे अभेद्य गृहीतक होते
तो सहजच त्याप्रमाणे वागताना
कोणत्याही मांजरीच्या मिशा कुरवाळे
आणि तिला स्टोऱ्या सांगे
टारझनच्या आणि मारुतीच्या
पण मनात ब्रम्हचर्याचा तीव्र विरोध बाळगत

स्वतःच्या मनात प्रवेश करताना मात्र
तो नाराज असे कारण त्याच्या मनातली त्याची पत्नी
साधी भाजी चिरतानाही त्याला आनंदी दिसे !
ती कधीही त्याला  त्याच्या ऑफीसच्या
इमारतीचा रंग कुठला आहे हेही विचारत नसे !
अशा न घडणाऱ्या अनेक गोष्टींनीही तो खट्टू असे
त्याच्या खिशाला परवडणारे अपमान सोसत
तो इतरत्र मानाने राहायचा प्रयत्न करी
हातात सतत विजेरी घेऊन दिवसाढवळ्याही
कोणतेही विमान चुकू नये म्हणून

असा काही प्रकार नाहीच आहे असे दाखवत तो
दागिन्यांनी सजून आलेल्या त्याच्या पत्नीलाही तिचे मत
विचारत नसे की मांजरी साधारण कधी फिस्कारते
वा नरडीकडे झेपावते तिला तिच्या गगनचुंबी
भावनांना आवाहन होणे नको असल्याने

कोणतीही पत्नी आधी एक स्त्री असते आणि कोणत्याही
पतीप्रमाणेच प्रेमळ असते – हाच त्याला दिलासा व प्रॉब्लेम वाटे
--- ००० ---

काम चालु

तोंडात तंबाखूची भरगच्च लाळ

किंचित बधीरतेत

नकळत काम चालु

गच्च साठलेल्या लाळेसारखे विचार

सुटकेचे आदर्शांचे न्यायाचे

जणू पाण्यातल्या पाण्यात

गुंग झालेले मासे

एका काचपेटीत शोभा म्हणून

एकच नर वा मादी ठेवल्याने

होणाऱ्या हालांपेक्षा ते बरे

त्या हॉटेलात खूप लोक

येत-जात असतात

त्यांच्या कपड्यांचे सुगंध

मने भारून टाकतात

मालक ओवाळतो धूप

गच्च धुरात त्याचे

विसरतात प्रश्न ( पण )

कमाई चालु राहते

असे परस्पर जगणे

कधीही चांगलेच

फक्त आपला कंट्रोल हवा

--- ००० ---

सेमिनारला जमलेले विद्वान
त्यांची पुस्तके खाजवत
म्हणतात की प्रत्येक काळात
व्यक्तिगणिक
मानवी मूल्ये वेगवेगळी
असतात – त्यामुळे
मानवी मूल्य असे
काही नसतेच

त्यांच्या खरखरीत
दाढ्यांवरून
ओघळतात मुंग्या
ज्या सतत असतात
एकमेकींशी युद्धाच्या
तयारीत सरक्त तोंडांनी

हे सर्वांनाच पटल्याने
सेमिनारची जागाच
चुकल्याचे कळते
शिवाय थंडीऐवजी
उन्हाळा असता तर
काहीतरी टिकाऊ
सापडले असते
हेही सर्वांना पटते

इतका क्लिष्ट सेमिनारही
काही निष्कर्ष काढतोच
हे पाहून दिपतात अशिक्षित मुंग्या
--- ००० ---

आपल्या आयुष्यात आलेल्या
या रस्त्यांनी आपले कपडे फाडले
आता सहनशीलपणे बेफिकीर राहू
आणि त्रयस्थ त्यांच्यांतल्या
घडामोडींकडे दुर्लक्ष करत

असे करणे हे
त्यांच्यामुळेच घडत असल्याने
आपण अधिकच अपमानित होत
न्याय नाकारल्याप्रमाणे
मनाने मौन राहत

पण तो होतो एक मूड
नाराजीचा
कुटुंबासाठी खाल्लेल्या खस्ता
हाडे समजून बघ्या कुत्र्यांनी
चघळायला घ्याव्यात तसा

असे नकोच परिणामात राहणे
म्हणून आपण उघडतो
बाटलीचे बूच आणि ओततो ग्लासात
नियतीचे मूत

वाचलेले पाहिलेले अनुभवलेले
मनाचे पापुद्रे ओले होऊ लागतात
पाझरत्या रक्ताने अटळ अशा
एकाकीपणाच्या किळसवाण्या आपलाच
गळा दाबून घेत हळूहळू घुसमटत
--- ००० ---

त्याला विश्वासघाताचा अधिक अपमान वाटतो की
तो फसवला गेला यातल्या बावळटपणाचा
याचा विचार करत
तो डोंगर च्या डोंगर चढून जाई
तिथून दुर्बिणीतून पाहताना तो म्हणे
कुछ फर्क नही पडता

त्याच्या ऑफीसच्या खालच्या दुकानांत
धुमधडक्यात खरेदी चालु असे
ब्रेसियर्स, सेंटस आणि चमक्यांची
हे सर्व सामान कुठे कुठे जाईल
आणि निष्कारण या जगात
रक्तलांच्छित होत राहतील
बिचारे निष्पाप पुरुष
असे त्याच्या मनात येई

त्याला एक कळून चुकले होते
आपण पराभव मानण्यातच
खरे तर आपला पराभव असतो
खूप दारू प्यावी आणि मग
त्या भावनेची गरजच वाटू नये
हे शक्य आहे असे त्याला वाटे

कदाचित तसे काही घडलेही नसेल
या विचाराने तो हादरून जाई
प्रत्येक गोष्ट अशी अनेक शक्यतांनी
युक्त असेल तर खरे तर कोणतीच भावना
यायला नकोय मनात – सिगरेट विझवत तो म्हणे
--- ००० ---

फक्त काही रस्ते आणि इमारती
तर असतात मीच
अवडंबर माजवतो
जास्त झाल्याप्रमाणे जागरण

शर्टाच्या बाह्या जेव्हा
नद्यांसारख्या फडफडतात
तेव्हाच खरे तर
मला जाग यायला हवी
तर घडते उलटच

माझ्याच खनपटीला बसून
आकाशातले उडते सर्प
मलाच पटवून देत बसतात अमुक
माझ्या शतपटीने विद्वान आहेत
म्हणून त्यांचे दुर्मीळ आदेश

काय म्हणून मी प्राशन करावे
काडेपेट्यांतून आणलेले
विश्वाचे रहस्य
हितचिंतकांनी माझ्यासाठी

मला नाही वेळ
माझ्या पापण्या कातरायला
तुम्ही कोणतीही शिक्षा करा
तसा काय फरक आहे आपल्यांत
तुमच्या हातांत आहेत तुमचे झेंडे
आणि मी माझा विसरलोय इतकेच
--- ००० ---

विकतचे श्राद्ध घेतल्यासारखा
जन्म झाला तेव्हा
कशाचेच आश्चर्य वाटू नये
असा मद्दडपणा होता
झाडांची चिरगुटे
आकाशाला सहज
निष्प्रभ करतील असेच वाटत होते

डोळ्यांसमोर खेळणारी
ग्रहताऱ्यांची खरी चक्रे
शिक्षण देत राहिली
सगळे खरे धरून
जिंकत राहण्याचे

पहिले यश मिळाल्यावर
पहिला ससा मारण्याचे
मी मागे वळून पाहिले नाही

इतर लोक चकित होऊन
आणि भिऊनही सरळ
त्यांचे डोळेच काढून
माझ्यापुढे ठेवू लागले

तरीही उद्धटपणा
माझ्या स्वभावातच नव्हता
नुसते थोडे गवत उपटून
त्या जखमी जमिनीवर
मी माझा नम्रपणा खुपसला
--- ००० ---

रक्ताच्या प्रवाहाविरुद्ध
मन साकळते तिथेच
दुःखाची सुरुवात होते
हे मनाला कळताच ते
अधिकच घट्ट आणि निग्रही होत
स्वतःच्या साकळलेपणाविरुद्ध
लढा पुकारते आणि दुःखाचा प्रसंग
अधिकच तीव्र होत जातो

काळाची गती आपण
नियंत्रित करू शकतो
हा मनाचा उद्दामपणा
त्याला भोवतो
काळाला ना देणे ना घेणे
मनाला ही टक्कर प्रचंड उग्र

आकाशही असते गतिमान
मनाच्या मनाविरुद्ध
कोणतीही घटना
नोंदवायला मनाईच असते
घटनांची मालकी बाळगणे
म्हणजे आकाशाशी पंगा घेणे
जरी आकाशाला नसते मन

रक्त आणि आकाश आणि काळ
यांना वेगवेगळ्या गतींत
चालवू पाहते मन
छिन्नविच्छिन्न होत
--- ००० ---

माझ्यात ग्रथित आहे सगळे रेकॉर्ड
योग्य बटणे दाबाल तर मी उत्तरेही देईन
सूर्यासारखा टाकेन समसमान प्रकाश
सर्व तऱ्हेच्या रोग्यांवर

हे मी कवितेबद्दल बोलतोय
रोज दोन तास पूजा ही भानगडच राहू नये
किंवा गणपतीला लाल फूल
न मिळाल्यामुळे रडारड वा संताप

एकदाच काय तो निकाल लागायला हवा
कोणताही दगड वेडा होण्याचे मूळ कारणच
उघडे पडायला हवे झुळझुळत्या पाण्यासारखे
कॅन्सर होता – आता नाही
असे व्हायला हवे
माझ्याकडे आहे अमर्याद म्हणून तुम्ही
तो अभ्यासाचा विषय करू नये

कोणत्याही एकाच कवितेत
प्राणपणाने संपायला हवे
आदरणीय पक्षी होऊन
असंख्य माद्या फळवण्याचे षडयंत्र

भरकटलेल्या रात्रीला
लाथ मारायचा पाय
म्हणजे असावी ही
बेहद्द बेफिकीर कविता
कोसळवणारी जे जे स्थिर ते ते
--- ००० ---

हे आकाश, ही पृथ्वी
सारे घट्ट धरून ठेवावेसे वाटते
पण याचा पायाच चुकीचा असल्याचे समजते
तेव्हा तो निकराचा प्रश्न येतो
एक तर त्या पायाची फळे भोगा
नाही तर
त्याच पायावर जगण्याची इच्छा सोडा

ओळखीच्या जगात
एकटे पडून वेडे होण्याची खात्री
आणि आपलीही ओळख टाकणे
ही अनोळखी जगाची अट

शरीरावरचे तणाव आणि व्याधी
असणे आणि नसणे क्षणात दिसणारे
आणि तरीही
ताण नको असणे
ही एक निवड नाही होऊ शकत

स्थिर देशसाठी हवे एक केंद्र
घराण्याचे वा हुकूमशहाचे वा एखाद्या
वेडा होत जाणाऱ्या नेत्याचे
विध्वंसाशिवाय सुरक्षितता कशी वाटणार

हीच अथांग सर्वव्यापी ॲब्सर्डिटी
इस पार या उस पार वाली
तरीही म्हणतात काही की ॲब्सर्डिटी
आता कालबाह्य झालीय – गधडे
--- ००० ---

आदर्श काय आहे
हिरवे अनुप्रास की लडखडत्या
वेलांट्यांच्या मांडवांखालुन
पार झालेली सनसनाटी लग्ने

अमुक सीझनमध्ये इतके हजार किमी
पार करून इथे येऊन उतरणारे
पिवळे-लाल पक्षी
म्हणजेच सर्व विचारांची समर्थने असतील
तर ब च्या डोक्यात अ च्या खुनाचे विचार
का घोंघावतात

चंद्र गाळून घेतला तेव्हा
शुद्ध प्रेम मिळाले कोणत्याही वयात
उत्तेजित करणारे आणि मुख्य म्हणजे
मनाच्या आवाजाची गणिते सोडवून देणारे

कितीही उत्पादन केले तरी शेवटी
जांभळे अन्न आणि निळी लैंगिकता
यांपलिकडे जाऊच नाही शकत
विद्यापीठांचीही मजल

ना विचारांनी ना स्नायूंनी
आवाक्यात येणारे हे शेंदरी आकाश
सूर्यास्तापूर्वीच म्हणते
तुम्ही बाळगायलाच हवी खात्री
अन्यथा जगणार कसे
म्हणा – जो जे वांछील तो ते लाहो
--- ००० ---

जी जी गावे मी सोडली

ती ती बटणे ऑफ केली

माणसांच्याही आठवणी

सोडून दिल्या पण

काळाच्या ओघात

काळ हीच आपली

जगाला देणगी असल्याप्रमाणे

माझा एक कायमचा मूड

मला चिकटून असल्याचे समजले

खेड्यातून शहरात

शहरातून खेड्यात

जा-ये करताना निराशेतून अचानक

कधीतरी उडालेल्या स्फोटात

प्रवासच आभासी असल्याचे दिसले

पाणी आणायला गेलेल्याची

गाडी निघून जावी तसे झाले

काही हरवल्याचे दुःखही

वाटले नाही कारण

तो चिकटलेला मूड

सोबत राहिला नव्हता

हे खास म्हणून कसे सांगणार

मूडात असताना असलेली गच्च सर्दी

मूडात नसताना क्षणात जाते

हे दिसले -- हे मात्र विशेष होते

मग एवढेच सांगायचे ठरवले

--- ००० ---

विमानप्रवासाचा अनुभव झालाय माझा
अक्कलकोट आणि शिर्डी आणि वारीही झालीय
आता काश्मीरला जाऊन सौंदर्यदृष्टी फुलवून घेणार
मग पिरांदेल्लो वाचून प्रगल्भता मिळवणार
आणि किशोरी ऐकून नादब्रम्ह
ढसाळ, सुर्वे, प्रज्ञा पवार आणि गज्वी
वाचून जरा समाजभानही वाढवणार
तसेच मला धारावीच्या झोपडपट्टीत
जगायचा अनुभव घ्यायचाय
आणि आफ्रिकेतल्या जंगलाचाही
आणि वेश्यावस्तीत काही काळ घालवल्याशिवाय
मी माणूस कसा होणार
एकजण म्हणाला
नुसते एवढे कसे पुरेल
प्रयोगशाळेत तासंतास काम करून
शोध कसे लागतात हेही बघायला हवे
तेवढ्यात एक मित्र म्हणाला
वाहतूक धंद्यासारखा धोक्याचा
आणि कष्टाचा धंदाच नाही
ते न समजता अधुरेच राहाल
लाखे म्हणाले रेल्वे
त्यात सगळे असते
गिरीश म्हणाला मराठीतल्या
विद्वानांचा वावदूकपणा हा एक मोठा प्रांत आहे

या सगळ्यांमुळे मेंदूत कोणकोणती रसायने तयार होतात हे अभ्यासून
योग्य प्रमाणांत ती ती रसायने असलेली एक कॅप्सूल काढावी
असे आता ठरले आहे –
--- ००० ---

जे जसे घडायला हवे होते
ते तसे न घडल्याने
प्रदूषणाचे धुके झाले मन
जणू असे होणे हे
नैसर्गिक नॉर्मलच असते

विमानसेवा बंद केल्या
वाहनबंदी केली
शाळा बंद केल्या
सर्व पाळीव प्राणीमुलेमाणसे
म्लान झाली नॉर्मलपणे

सूर्यप्रकाश आपोआप
कसे काही घडवू शकेल
आरोग्यपूर्ण रोज
निर्माण होणारा अमर्याद
कचरा असाच जळत राहिला तर

मनाचे काहीच नाही नष्ट होत
मनाने
उलट सर्व परिश्रमांच्या थकव्याने
घराच्या भिंतीही काळ्या पडतात

मनच म्हणतेय वेळ लागेल
यातून बाहेर पडायला
आणि मनच म्हणतेय
क्षणात काही घडायला हवे
अन्यथा शेवट लांब नाही
--- ००० ---

पाहताक्षणी तिचे डोळे
सखोल आवडल्याचे सांगितले
न बोलता
खुली वीजच पोचवणारे

नंतर सरळ
वेळ नकोच घालवायला म्हणून
प्रेमाचेच सांगितले
आणि प्रेम म्हणजे आवडणेच
हेही स्पष्ट केले
हरकत नाहीच म्हणाली
पण वेळच नाही
हे सांगतानाही तिचे डोळे
मोहक मोहक मोहक वाटले

तिच्या जगात
असणारच मी कुठेतरी
तिच्या वेळेच्या अभावातही
हलकेच दबा धरून
हे तिला निदान जाणवत राहावे
एवढे माझे वाटणे तरी
तिला नक्कीच पोचत असणार

माझ्या स्वप्नात मी तिच्या स्वप्नात जातो

तिच्या डोळ्यांमुळे
मला ती दिसत राहते
जाणवत तिचे वेळेअभावी दुर्लक्ष करणे
--- ००० ---

मला इहवादी करणारी अजिंक्य
शक्ती म्हणजे माझी प्रेयसी
तीच असते इथला कण न कण
इथले मानापमान आणि सुखदुःखेही

हे जग मला धरून ठेवते
मृत्यूपल्याडच्या शांततेतला
माझा विहार थांबवून
खेचते क्षणोक्षणी मला
माझ्या असण्यात

ती मला भ्रष्ट करते
मला खुजा करते
आकर्षणात माझे सत्य
पराभूत करते

पण, जे जग खोटेच आहे
त्याची सत्यता ती सिद्ध
करते सर्वांगाने शृंगारिक
माझे मनच फक्त
सत्य असल्याचे भासवत

माझे बालपण आणि तरुणपण
खरेच घडून गेले इथे आणि
माझ्या गुणदोषांसह
मी आहे इथला किंग
असे होते तीव्र माझे जगणे
-- तिला अमर्याद आत्मविश्वास असतो
--- ००० ---

नुसते हे समोरचे
पंचिंग मशीन खरोखरचे
आहे असे म्हटले तरी
आख्ख्वे विश्व मान्य करावे लागते
मग स्वप्नातल्या काळोखालाही
अस्तित्व द्यावेच लागते

मग हे सगळे
कसे असायला हवे होते
आज काय करणे तातडीचे आहे
यावर सर्व झाडे पक्षी मांजरे कुत्री
तुटून पडतात

एकच विलोभनीय स्वप्न
सर्वांसाठी ठरवताना सगळेच
विचार करतात
आणि विचार त्यांच्या
चिंध्या करत राहतात

त्यातच त्या पंचिंग मशीनला
हातपाय फुटतात
जिभा फुटतात
आणि सर्व गोंगाटाहून
अधिक मोठ्याने ते ओरडू लागते

सारांश – जगायचे तर असू द्या सगळे
पण, विचारांनो, काही नाही असे जगा
आहे म्हणाल तर मराल
--- ००० ---

झाड आणि इमारत
यांत तुलना नाही होणार
वेगळ्याच आकाशात
मग्न अशा त्या दोन
मनातल्या प्रतिमा आहेत

तसाच मीही वेगळा असल्याने
ते खटकून
माझ्यावर हल्ला होऊ शकतो
तुलना केल्यामुळे

पण कम्युनिस्ट सगळे
एकसारखे होतात तात्पुरते
आणि सरळच एकसारख्या
दिसणाऱ्या सर्व बगळ्यांना
म्हणतात आता कोर्टात भेटू

बगळे हसतात
आपापल्या घरी जाताना
आत्मविश्वासाने आपापल्या
आवडत्या भाज्या मटण चिकन
मासे घेताना पाण्याशी वैर न करता

गुणवत्तेत आलेल्यांची
यादी लागते एकसारख्या
तीतून शिकारी वगळलेले असतात
शिक्षा म्हणून तिरस्काराने
वेगळेपणा हीच शिक्षा न मानता
--- ००० ---

मला भेटलेल्या व्यक्तीचा आवाज
दिसणे आणि भावना यांचे झाले दवबिंदू
आणि ते ज्या फुलांवरून ओघळले
त्या फुलांचे ठसे उमटले माझ्या मनात

आणि आले लक्षात घरातल्या वस्तू
माणसे आणि पडद्यांचे रंग तसेच
घरासमोरचे नारळाचे झाड आणि रस्ते
आणि इतर खूप माणसे आणि माझा भूतकाळ
या सगळ्यांचेच होताहेत परिणाम
माझ्या जगण्यावर आणि
एकूणच माझे स्वतःचेही

या सर्वांतून मी करतो परिणाम
जे जे समोर येईल त्या त्या सर्व
अस्तित्वावर आणि अपरोक्षपणे इतर
असंख्य गोष्टींवर मला माहीतही नसलेल्या

हेच मला आश्वासक वाटते
किती परिणाम दिलेघेतले यांची मोजदाद
अशक्य असलेले आणि सकाळ
झाल्यावर बाहेर पडणाऱ्या
पक्ष्यांप्रमाणे स्वयंचलित

माझ्या मतांचे मी आग्रह धरतो
अनेक वादांत जिंकतोहरतो
माझेच जगत आणि परिणाम करत
नारळाच्या झाडावर माझ्या नजरेतून
--- ००० ---

हे नकळतच आपोआप घडते
मी गाढ झोप लागूच नाही देत मला
जगावरचा हातच सुटण्याच्या भीतीने
माझा आपोआप निसर्गावर
भरोसा नसल्याने

मी एक पोहता न येणारा माणूस आहे
उंचावरून खाली पाहिल्यास
तळपायात मुंग्या येणारा

माझ्या मनात खूप वारुळे आहेत
मुंग्यांची आणि सापांची
आता सवयीने मीच आहे ती सर्व
जे माझे जगणे जे मला हवेसे

मला माहीत आहे नीट
झोप न होणे हा नक्कीच एक
कूर्मगती विषप्रयोगच आहे
माझ्यावरचा जो आहे
मीच केलेला घातक

यांत समतोल साधण्यासाठी
मी मध्येच घेतो एक झोपेची गोळी
शरीराची गरज भागावी म्हणून
मला जगत राहता येण्यासाठी

तिच्यामुळे मला गाढ झोप लागते
पण तेवढा धोका तर पत्करावा लागणारच
--- ००० ---

हत्ती एवढ्या ऊंचीचा

एक पांढरा बैल

नाकातोंडाबरगड्यांतून

वायरी आणि लोखंडी सळ्या

बाहेर पडलेला

का चिडला होता का

चाल करून येत होता

हे कळत नव्हते

आम्ही तिघेचौघे पळत होतो

शेवटी अनेक गल्ल्याबोळ

पार करून त्याला

पूर्ण चुकवून आम्ही एका बागेत पोचलो

आता तो आम्हाला शोधू शकला नसता

पण आम्हाला स्वप्नात हेही कळू नये

की ते स्वप्न होते आणि कोणत्याही क्षणी

अचानक तो समोर आला असता

वायरींनी जखडून सळ्यांनी भोसकण्यासाठी

नाकातोंडात भीती जाऊन

बुडत असल्यासारख्या अवस्थेत

पुन्हा सापडू शकलो असतो आम्ही

आणि खरेच आला तो आता

अधिकच मोठा आणि अधिकच वेगवान

फुसांडत आमच्याच मागे आणि आम्ही

प्राणभयाने वेगात – पण स्वप्न आमच्याच

अधीन असल्याने आम्ही बचावत जात राहिलो

--- ००० ---

कुठेही काहीही टाकल्यासारखे
जग उंदरांच्या झुंडीसारखे अस्ताव्यस्त
सरसर सरसर धाब्यावरून
चाललेले समुद्र माझ्या
जाडीमुळे तुटलेल्या बटणासारखे
घरंगळत नामजपात घोळलेले कारले
जसे

मीच उद्दामपणे पाखडलेले
माझ्या मनातले स्मृतिकण
आता वाढत्या ट्रॅफिकमुळे
वाटेल त्या तरुणींना झोंबणारे
अप्रतिहत

तेच म्हणाले होते की
आता बास झाले रटाळ जगणे
आता काही करमणुकीचे बघा
पण मला ते न पटल्याने
मी धाडले होते दूत
राजाला जिवंत पकडण्यासाठी
सत्वर

न जाणो यातूनच उलगडेल
काही एरवी न सापडणारे
दगा देणारे गूढ स्वतःच्या जगण्याचे
शुभ्र

काहीही चालेल जसे अप्रतिहत सत्वर शुभ्र

--- ००० ---

उद्विग्न पहाटे जागे होताना
सुजलेले तुझे डोळे म्हणजे असते
तुझे बुद्धिप्रामाण्य आणि चीन आणि अमेरिका
यांच्यासाठी असतात तुझ्या झोळीत
जगाच्या सर्व प्रश्नांवर विवेकशील तोडगे

मुंगूस दिसल्यावर दिवस शुभ जातो
असे वाटणाऱ्यांना तू हसतोस
ते योग्यच असते पण तू एक
सतत हर्ट होणारा आणि सतत
हर्ट करणारा असा एक हिंसक
साप का असतोस ?

तरुण पिढीला आता हवाय
मुबलक सेक्स आणि बेशुद्धपणा
शुद्धीवर असणे म्हणजे
डोळे सुजवून घेणे ?

तुझा आत्मविश्वास हा एक
मनोविकार समजून
तुला शॉक ट्रीटमेंट
का देऊ नये ?

त्यापेक्षा आत्ममग्न गप्प बस
रोज संध्याकाळी दिवा लावून
श्यामच्या आईला नमन कर
कशाला कुणाला
निरुपयोगी दोष देत बसतोस ?
--- ००० ---

दिवसाच्या पदपथावर चुकून
खाली पडल्याने
भिर्भिरलेली माझी चिल्लर
गोळा करून येतो मी घरी
आणि रात्र होताच करू लागतो प्रेम
तुझ्यावर तुझ्या अनुपस्थितीत
तुझ्या सहभागासह

आता रात्रीकडे ना हत्यारे आहेत
ना किंचाळणाऱ्या हडळी

तुझ्या आवाजाशिवाय
मऊसूत माझे मन
तुझ्या सुगंधाशिवाय
तुझ्या केसांत चांदण्या होऊन
विलसणारे माझे प्रदीर्घ क्षण
आणि माझे हात जणू
तुझ्यासह रिक्तहस्त

मी होतो निशाचर
निर्मनुष्य रस्ते पार करत
पोचतो तुझ्यापर्यंत

काय हवेय – तू विचारतेस
माझे एकमार्गी विचार
म्हणतात तूच
तूच ओळख आणि दे सगळेच
तुझ्या अनुपस्थितीत
--- ००० ---

सरहद्दी पार करण्याचा
प्रश्नच नव्हता ज्यांनी
सामूहिक कृती अपरिहार्य
मानल्या त्यांच्या नोकऱ्या टिकणे
हेच असणार होते
मानवी मूल्य

याच जगात
सत्यातून सत्याचेच लिहिणाराही
आहे हे मला माहीत असले तरी
फक्त आहे त्या असत्यात काम करणे
एवढेच माझ्या अंगाखांद्यावर
खेळू शकणार होते

आदिस्फोट वगैरे काही नाही
विश्व होतेच आणि राहील
अनादिअनंत असे जर शास्त्रज्ञच
म्हणत असतील तर याचा अर्थ
काहीच नाहीय असाच होणार

पण माझा तर्कावर फारच
मर्यादित विश्वास आहे
एकाच उपलब्ध परिस्थितीतून
अनेक संघर्षमय आदर्शांना
मार्ग सापडतात जणू जटायूकडून

जटायूच का हे नका विचारू
उत्तरेच नसलेले खूप आहे जगात
--- ००० ---

आयुष्यात वळणे येतातच
ते सर्व मिळूनच शेवटी
निघतो काही सारांश
सुपरस्टार होऊन खोट्या
तपशीलांनी लाखोंची आयुष्ये
भरून टाकण्यापेक्षा
आपले आपण चंद्रावर वादळे
होत असतील का किंवा चांदण्या
खाली पडल्या तर काय होईल
असे विचार करणे बरे

प्रसिद्धीची हाव जात नाही
दुःखाचा त्रास होतो आणि प्रेयसी
खुशही राहायला हवी
या सगळ्या मानसिक कृतींनी
कुणीही थकणारच
खूप प्रचंड थका आणि दारू
पिऊन झोपा उद्याचा सूर्य पुन्हा
तुमचाच असेल तोच तसाच

पावसाच्या सरी सगळ्या
वेगवेगळ्या असतात का
हे साधे कुतूहल तुम्ही दडपता
कारण तुम्हाला वेळ नाहीय कारण
तुम्हाला बांधायचेय क्रिकेटचे स्टेडियम

फुकटात मिळालेय ते जाऊ द्या
फुकट – येड्यांचा बाजार नुसता
--- ००० --- ---------------------------------------------------------------------------

नुसतेच पर्याय शोधत आलेला होता
माणूस तो फक्त दगडांच्या जाती जाणणारा
जेव्हा जेव्हा आले मोहर त्याच्या विचारांना
तेव्हा तेव्हा त्याला गरज पडली
जीवरक्षक द्रव्यांची आणि वस्तूंची
त्याच्या मानेवर सतत असणारे
भीतीच्या सरड्याचे पाय
त्याच्या शरीरात उमटवत राहिले
थंडगार भविष्यासह अभावात्मक
नुसत्याच काल्पनिक संभोगांचे तरंग --
तो नेहमीच विद्ध होत राहिला नसानसांतून

पण हे नव्हते सत्य त्याच्या त्या अपवादक्षणात
प्रेमाच्या शुक्र उंचवट्यावरून विहरताना
त्याचे पुरुष होणे हे अचानक धबधब्यासारखे
कोसळले आयुष्यात एका चोरट्या लांडोरीच्या
नुसतेच असण्याच्या आभासाने जवळ

पुढे अनेक जातींच्या दगडांची
माती होत गेली रंगीबेरंगी नाइलाजाने
सगळीकडे बोर्डच लागलेले असल्याने की
हात न लावता लांबून पाहावे

या जगाला खरे तर कुणीच मालक
नसूनही तो जगाचा आश्रितच राहिला
स्वतःच्या मालकीने युक्तच होते सगळे
वस्तुमात्र वस्त्रगाळ आशांचे दिवास्वप्न
आतल्या आत दगड सोलणारे
--- ००० ---

तुमच्या आकाशाचे
माझ्या आकाशाशी वैर
त्यातून उडणाऱ्या ठिणग्या
आपल्या मेंदूंच्या स्वाभाविक अवस्था
त्यांतून उडत राहतात ठिणग्या
ऑफिसांत आणि चित्रपटगृहांत
आणि तिथून पुस्तकांत

पुस्तकांतून पुन्हा आकाशात
उडून त्या कोसळतात जमिनीवर
आणि सर्व नवजात अर्भकांवर
जाळून टाकत त्यांच्या मेंदूंचे
अनोळखीपण

आता त्यांना नव्याने काही
सांगावेच नाही लागणार
त्यांची जनुकेच उगाळतील
त्यांची अटळ नियती

ती मुले हसतील
खेळतीलही बागांतून
पावसात भिजतील
पण ठिणग्या तेवत ठेवत

आता लोक म्हणतील
या ठिणग्या नसून समस्या आहेत
कुणाच्या ठिणग्या कुणाच्या सोडवतील
कशा ते शांतपणे ठरवायला हवे
--- ००० ---

खरे तर या समोरच्या
पडद्याला काय वाटतेय हा प्रश्नच येऊ नये
पण तरीही त्यातच माझे मन असल्याने
अजूनही माझ्या नियतीला फुटत राहतात
अनभिषिक्त उष्ण धुमारे

त्या पडद्याची नक्षी
तशी माझ्या माहितीची आहे
माझ्या भूतकाळात तिच्या
उपभोगाचे बरेच तुकडे आहेत
त्यावरूनच करतो
मी पलिकडचे अंदाज
जे जे वाटते मला सहज उपलब्ध

अजून तरी
विटलेले नाहीत माझे क्षण
माझ्या जुन्या खिडकीला
अजूनही आहे
किलर प्रेरणा

एका साध्याशा झुळुकीने
नष्ट होतो हा पडदा
हे माहीत असल्याने
मी तो धरून ठेवतो
माझ्या अधाशी बोटांनी

मी पडद्याच्या दोन्ही बाजूंना विहरतो
असण्याच्या आणि नसण्याच्या
--- ००० ---

उताणा किडा भिरभिरता आठवणींत

मरणाच्या आढ्याकडे पाहात

त्याचे अंग जमिनीला परके

काचेहून नाजुक पण चमकते

कधी काळी उगवला होता सूड

भोगला होता त्यासाठी कारावास

डोंगर पालथे घातले होते

विचारांच्या मागे धावत

एका चुंबनासाठी

कुकरचा गॅस चालुच ठेवला होता

आपले स्थान काय या इतक्या

चित्रांत हे विचारले नव्हते

रडून सुजलेले डोळे

वापरले होते बाहेर अनुकंपेसाठी

तरीही दुःख का होते

हा विचार कुरतडत राहिलाच

आता तरी मन थांबावे

म्हणून नम्रपणा आला

अंगावर ऊन पडताच आपोआप

शांत गार वाटले शेवटचे --- ००० ---

उद्विग्न दुपारचे धागेदोरे
पकडून चढत गेलेला ताप
संध्याकाळी मलुल झाला
रडतखडत तेव्हा उद्भवला
नैसर्गिक म्हणजे काय
हा प्रश्न पांढरा शुभ्र

हसत हसत सहज उच्चारलेले
शब्द झाले प्रतिमा आहे त्याहून
अधिक अर्थ व्यक्त करणाऱ्या
हवेहून विरळ पण किरणाहून गूढ

वाटेल तेव्हा नाही सापडणार
जे काल माहीत झाले ते
माहीत झालेय म्हणून
प्रत्येक वेळचा पाऊस
वेगळ्या इमारतींच्या
आणाणार आठवणी
हे विसरून चालणारच नाही

विरह हे दुःख असेल
तर शारीरिक आठवण
म्हणजे एक जखमच
म्हणावी लागेल हवीशी

म्हणून फक्त एकच समजावे
भूतकाळाने भविष्य मारले तरी
वर्तमान अप्राप्यच राहते
--- ००० ---

निरूपण म्हणून
रस्त्यारस्त्याचे विश्लेषण करणारे लोक
हकनाक घसरतात एकांतात
प्रत्यक्षाच्या शेवाळ्यात
जरी अंगाला लावूनच
नाही घेत ते वाया गेलेले अन्न

एका धूसर खोलीत बसून राहतात ते
सगळे गेल्यावर ध्यानस्थ
भोवतीच्या आठवणी
हव्या तशा घरंगळू देत

त्यांना विचारणारे कुणीच नसते
कारण मुळात ते कुणाच्या फंदात
पडतच नाहीत
सिगरेटस आणि तासातासाने चहा
एवढ्यावर खेचून नेतात ते
जगाची चालचलन

संकट म्हणजे एकच असते
उंदीर वा पाल अंगावर येणे
यावर पालीला शुभ मानणे
आणि उंदराला देवाचा प्रसाद
हे भागच असते त्यांना टिकण्यासाठी

धर्मातले ते तज्ञ असतात
दुःख न होण्यासाठी माज पिऊन
ते धुंदबधीर पडून राहतात
--- ००० ---

मन वितळताच जे वितळते
ते सत्य कसे असेल
पण मन असू शकते याचा अर्थच
तेही सत्य असणार

राजकीय मंचावर
नाचणारे घोडे एवढे घोडे
झाले तरी शाळेतच राहिले
जुनकट विटून हिंसक झालेल्या

त्याचेच स्तोम माजवण्यासाठी
सर्व बुद्धिमान कावळे
सक्तीच करू लागले
इहवादात डुंबून राहण्याची

स्वरक्त पिण्याची आस
लागलेले जग खरेच मनासह
कधीही वेडे होण्याच्या बेतात

पढवून घट्टच केले दगड
की निसर्गही नसतो
राजकारणाशिवाय
मेंदूंना ग्लानी येऊन
त्यांनी अधिकच उत्साहाने
चाल करावी म्हणून

आयुष्यभरचे विद्यार्थी होण्यासारखे
स्थिर खात्रीचे काहीच नाही
--- ००० ---

नाही तरी काही कळतच नाही
या फुलाला आग लावण्याचे
माझे प्रयत्न फुकटच
पिठाची पिशवी जणू रस्त्यात फुटते

माझी परवानगी थोडीच लागतेय
जगात हे हे असे असे असायला
हजारो वस्तू जीवजंतू माझ्यासह

मी म्हणतो की मला राजधानीच
पकडायचीय काही वर्षांपूर्वी कुणीतरी
घडवलेली माझे ऑफीस समजून

जगात व्यग्र काहीच नसते
माझ्याशिवाय माझ्या
असण्यामुळेच सहानुभूती, करुणा
आणि प्रेमाची शक्यता
माझ्या पूर्वजांचे आनुवंशिक
सॉफ्टवेयर म्हणून

मी थकून जातो मला
आत्महत्येचे विचार येतात
माझा समुपदेशक नाग
त्याच्या लवलवत्या जिभेने
माझी समजूत घालतो

हे मला पटल्यामुळे पुन्हा मला नॉर्मल होत
जगावेसे वाटते काहीही कसेही असले तरी
--- ००० ---

मला खूप सावल्या आहेत
त्यांतल्या काही दुःखी असतात
उरलेल्या साठलेल्या पाण्यात
डुबक्या मारून मारून मुटकून
पडून राहतात सेक्सी नशेत

उगीचच पडलेल्या उन्हात
माझे अस्तित्व आठवणी काढते
लहानपणी मी गर्दीत हरवल्याच्या
अजून मला सूर्यही
ओळखता येत नसताना

सोकावलेले चवींना बगळे नेहमीच
असतात माझ्या खिशांत त्यांना
मी माझ्या भविष्याची आशा भरवतो

माझे रूटीन संपल्यावर
मी दोन तास बागेत असतो
माझ्या अपमानांना खेळवत
मानवनिर्मित हिरव्या हत्तीजवळ

तिथून मला दूरवर समुद्र दिसतो
माझ्या अगणित विचारांचा
मला निश्चिंत ठेवणारा
माझ्या हेकटपणात

या सर्वांची मला सवय झालीय
माझ्या जाणिवेसारखीच
--- ००० ---

एक होता एझ्रा पाउंड
तो एक कवी होता
तो युद्धविरोधी होता – छान, छान !
त्याने अमेरिका-इंग्लंडना विरोध केला
वा, वा ! भांडवलशाहीला विरोध !
त्याने फॅसिस्टांना पाठिंबा दिला !
शी, शी !
अमेरिकनांनी त्याला अटक केली
देशद्रोहाखाली !
नंतर त्याला सोडले पण
बेड्यांच्या इस्पितळात ठेवले --
म्हणजे वेडाही असेल तो !

आधुनिकतेचा तो उद्गाता होता
प्रतिमावाद त्यानेच आणला
कमीत कमी शब्द आणि बिनचूकपणा
हे त्याचे विशेष होते

माणूस नीट नव्हता पण --
मी कशाला हवाय
मी नसतोच माझ्या कवितेत
असतात ती वेगवेगळी पात्रे
मी नीट पाहिलेली – तो म्हणे

करा आता यावर त्याच्या कवितेचे मूल्यमापन

हेमिंग्वे म्हणाला की साहित्यकला असेपर्यंत पाउंड असणारच
पण हेमिंग्वेने आत्महत्या केली – जगणे झेपले नसावे त्याला ! बहुतेक !
--- ००० ---

आपण एकत्र जगणे
म्हणजे एक आभासी समाज असणे
जसे माझ्या मनातले ढग
तुझ्या परिणामांसह

तू आहेस तर खरीच
एखाद्या नीतिकल्पनेसारखी
जी आपणच घडवतो मोडतो
सनसनाटी भोगत

मीही आहे समाविष्ट
तू म्हणतेस तुझ्या भांगात
कुणालाही नकळत
तरीही तुला सतत जाणवत

आपण समाज झालोय
आता आपल्याला एकमेकांच्या
भावना जपाव्या लागतील
एकमेकांच्या हिंसेपासून वाचण्यासाठी

हा जसा सेक्सचा अनुभव
तसाच सुरक्षिततेचा
बंधनाचा आणि अनैतिक
मुक्तीचा साळढाळ सक्तीचाही

आता घटना कायदे शिक्षा धूळधाण
झुगारत आपल्याला आपापल्या रात्री
आभासी सजवाव्या लागतील अस्मितेने
कुणाच्या ना कुणाच्या विरोधात --- ००० ---

उचंबळून आली तुझी आठवण
पुन्हा साग्रसंगीत ओलेत्या मोहजालात
आकाशातून फुटावे ताजे रोपटे जणू
उलटे करत या क्षणाचे माझे जगणे

तू उत्तुंग तीव्र हवीशी धून
निळसर की हिरवी की लाल
न समजणारी कोमात
नेत अजरामर विस्मृतीत

इथे कुणीच नाही
अवयव हेच सर्वस्व
स्त्रीत्व पुरुषत्व
लुप्त

तुझा प्रतिसाद इतका पूर्ण
की जणू अपेक्षेचा कणही नव्हता
माझ्या मनात
नग्न

तुझे आयुष्यात येणे म्हणजे
असंख्य वाहनांची गती
असंख्य भुंगे फुलांवर
झोंबणारे

माझ्या सगळ्या चुका माफ करून
मला गिळंकृत कर तुझ्या उष्णतेत
मग देऊन टाक तुलामला एकत्र
मला

--- ००० ---

चित्रासारखेच शब्द
अमूर्त पण रंगांसारखे मनदर्शक
इतस्ततः विखुरलेले बेशिस्त
ओळख न देणारे कशाचीच
वाफेच्या झऱ्याकाठीच जणू गडद

घटना नाही ना माणूस ना निसर्गही
असे कोणते असेल हे पाणी
ज्यातली प्रतिबिंबे
खोटी असल्याचे कळेल
फारच अस्पष्ट दिसणारी

एका निर्मनुष्य खोलीत हे एक बाकडे
आहे नुसतेच की कुणितरी कुणाचीतरी
वाट पाहून निघून गेले आहे

काय अर्थ असावा या
काळ्या पोकळीचा
पाण्यासारख्या थरथरत्या
भयग्रस्त इच्छेसारख्या
विझवून पडलेल्या जणू
थोटकासह किंचित धुराच्या

कदाचित आता पुन्हा
इथे कुणीच येणार नाही
असाच पडून राहील हा जणू खिडकीबाहेरच्या
झाडाकडे पाहात कोपऱ्यातला हिरवा ठिपका
तारुण्याचा अर्थ असल्यासारखा अस्पष्ट
--- ००० ---

एक विचार भिरभिरत आला
आणि कवटी फोडून पसार झाला
पडलेले टाके सांधणारे नव्हते
तर रक्त आणि प्राणवायू
तसेच क्रोध आणि विजय
यांतले अंतर खोलवर फाडणारे होते

सगळ्यांनाच जिंकायची खात्री
असल्याने सगळीच शस्त्रे
निर्भय झालेली होती

आपापली भडक स्थिरता
युद्धभूमी करत
वीजप्रवाह खंडित करत
अंधारमय होत होते
प्रत्येक घराचे मनोगत

आता फक्त वाट पाहायची होती
अंतिम समारंभाची ज्यात
झेंडे उंचावत म्हणणार होत्या
सर्व माता अंगाईगीते
त्यांच्या जखमी बालकांसाठी

अपेक्षित घटना घडणे
हेच असणार होते सार्थक
बदला घेऊन प्रस्थापित करणारे
शक्तिस्तोत्र जे उच्चारले गेले होते याआधीही
अशाच आनंदाने मनाला सत्य समजून
--- ००० ---

माणसे भाबडी असतात की
जाणूनबुजून सात्त्विक की जाणीवपूर्वक
थोडी वा फार ढोंगी याचा अंदाज
त्यांच्या आरामखुर्च्यांच्या
संतापांच्या प्रकारांवरून
करायचा प्रयत्न करायचा म्हणजे

चुकून झालेल्या स्पर्शांनीही
उद्दीपित होणाऱ्या लिंगांचे
भवितव्य जोखणेच ते

इतक्या वेगवेगळ्या तापमानांतल्या
सर्वांच्याच प्रामाणिकपणाच्या तुळशी
दारूत बुडवून खा की
योन्यांवर ठेवा सजावट म्हणून
तरी निष्पाप आणि पवित्रच राहणार
जणू त्यांच्या वैचारिक मंजिऱ्या

संभावित हिंसा धडधडीत
समंजस सामोपचार
आणि मान्यताप्राप्त परिपक्व निर्दोषत्व
यांनीच तर विणलेय
हे आक्रमक दहशतीचे सभ्य वस्त्र

सगळेच वाट पाहतायत
सत्याची लॉटरी फुटायची
शेवटी बेंबीत बुच मारले जाते
ही परंपरा माहीत असून अपरंपार
--- ००० ---

विचारच नका करू
तुम्ही कुणाच्या विरोधात असा वा नसा
तुमचे नुसते असणे बास आहे
अन्यायग्रस्त चेहऱ्यांनी त्यांनी तुमच्याकडे
पाहायला क्रोधमिश्रित आणि खात्रीने

तुमच्या चपलेत आलेला खडा
तुम्ही पाय झटकून काढाल पण
घशात अडकलेला रस्ता कसा टाळणार
त्यांना दिसणारा प्रत्यक्षात
असो वा नसो

हे हसण्यावारी नाही नेता येणार
हा तर जिवाशी खेळ
तुमच्याच खिशात हिंसा आहे
असे म्हणून खात्रीने ते
तिचा स्फोटही घडवू शकतात

पेपरवेट फिरवत शीळ वाजवत
तुम्ही निष्काळजी असल्याचेही
नका दर्शवू तुमचे जाणीवपूर्वक शौर्य
शेवटी याच जगात काय ते घडणार
इथे कुणीच नाहीय निष्पाप

पसारा आवरा आणि जरा शहाणे व्हा
समझोत्याचे स्मित ठेवा चेहऱ्यावर
आणि म्हणा, " सगळेच कानांवर हात ठेवत असले
तरी त्या फूटपाड्यांमुळे आपल्यांत फूट नको ! "
--- ००० ---

हसत्या वेदनेतून तरी घेईल
का कधी कुणी
विश्वरहस्याचा शोध
उगीचच आल्यासारखा
घेईल का कुणी एखादा पेग
प्लास्टिकच्या विचारातून
खराखुरा मानून

बागेतले कागद कपटे
म्हणजे निरुपयोगी झालेल्या
कंटाळलेल्या भावना आता कुणाला
वश होण्याची ताकदच संपलेल्या

स्त्रिया खेळतायत फुटबॉल
म्हणून नेटमध्ये दबा धरून
बसलेले संगणक माऊस
विसंबतात म्हाताऱ्या स्मृतीवरच
जी शरीराच्या कणाकणाला
देत असते हसती वेदना

बिलंदरच म्हणावे लागेल आकांक्षांनी
हे ठिणग्यांचे धार लावणे भूतकाळाला
आणि कोडकौतुकच करावे लागेल
भिंतीभिंतीवर पडलेल्या थुंकीच्या
डागांचे लाल न-चित्रकला म्हणून
एका उसळत्या जगाच्या
आत्महत्येच्या दिशेने
डोक्याला पांढरी हसती वेदना बांधून
--- ००० ---

निकॅनोर पारा ची कविता

## तरुण कवी

हवे ते लिहा हो
तुम्हाला आवडेल त्या कोणत्याही शैलीत
खूपच रक्त वाहून गेलेय पुलाखालुन
एकच मार्ग बरोबर असतो
असे मानत राहण्यात

कवितेत काहीही चालते

पण अर्थात एक आहे बुवा अट
कोरे पान आहे तसे राहू नये
अबोल
--- ००० ---

झोप इतके बंद करू पाहते जग
की भीतीच वाटावी
आकाशच नष्ट होण्याची --
तेवढ्यात एक मित्र येतो
खांदे हलवतो
तोंडावर पाणी मारतो आस्थेचे --
माझ्याबरोबर त्याला
गप्पा मारत फर्निचरच्या
चहा प्यायचा असतो
धूळ झटकत उजाळा देणारा

मला स्वप्नातला सूर्यही चालणार असतो
झोपमोड न करणारा पण
उघड नको असते ताजेही वर्तमानपत्र
शांतपणे ओरखडे ओढणारे स्वभावतःच

मोर आणि एल आय सी ऑफीस
असा संघर्ष असल्याप्रमाणे
मला बाजू नाही घेता येत त्याची वा माझी --
उपस्थित तो मित्र मला
न्यायाची चाडच नसल्याचा
माझ्यावर आरोप करतो
आणि मला तर फक्त झोपायचे असते

पुन्हा कधीतरी उत्साह येईलही माझ्यात
पण सध्या मला झोपेतल्या झोपेत
आकाश न हरवता ही वेळ फक्त
पार पाडायची असते त्या मित्राला दुखवूनही
--- ००० ---

आपले विरहांत वाट पाहणे
असे की जणू आता अवतरणार आहे
अंतिम सत्यच आपल्या हृदयांच्या ठोकळ्यांत
जे असेल अंतिम सुखही
आपल्या समगोंधळ मनांना हवेसे --
त्यामुळे तर आहोत आपण
एकमेकांना धरून

दरम्यानच्या काळात
आपण लिहू विराण्या या विश्वासाने
की त्या इथे स्वर्ग आणतील

मुस्काडे फोडली गेल्याने
नाराजीत असलेली आणि तरीही
गाणारी फुलपाखरे आहोत आपण
लैंगिकतेपेक्षा सावध प्रतीक्षा
अधिक मौल्यवान मानणारी

सगळ्यांचे सगळे डाव
ओळखून आहोत आपण
आपले डाव अधिकाधिक सक्षम करत --
स्मशानांना बहाल करू आपण कधी ना कधी
आपल्या सर्व अडथळ्यांची प्रेते

शिकारीचा शेवट दृष्टिपथात असला तरी
काळाचा नाही निश्चित अंदाज --
पूर्ततेच्या दुंदुभी वाजतीलच --
तोवर एकमेकांना धरून राहू
--- ००० ---

शेवटची चिंधी
टाकायची वेळ आली तेव्हा
प्रचंड हट्टीपणा गोळा झाला
पूर्ण विश्वाची कट्टरता
हिंसकपणे झाली माझे मन

माझ्याच हातून व्हायला हवे
सगळे भले – माझी अनुकंपा
माझी कणव हेच सर्व तळपायला हवे
माझ्या सत्कारांनी दुमदुमून जायला हवी
पृथ्वी – कित्ती चांगला माणूस
असा माझा अभिनिवेष
मान्य व्हायला हवा सर्वांना
नम्रपणे नमून

म्हणून मीच आणून ठेवले हारतुरे
मीच लावल्या पताका आणि
न्यायभावनेने उद्रेकू लागलो
इतरांच्या वागण्यासाठी शिस्त

त्या चिंधीला शरण जाऊन
मी पुन्हा जमवले सगळे वस्तुमात्र
माझ्या साध्या जगण्याचे वैभव
-- चांगलेच तर जगतोय
म्हणून खूपचजण उतराई राहिले

माझे अपयश फक्त मलाच समजलेले होते
त्याचा संताप अधिकच तीव्रपणे मी शोषकांवर काढला
--- ००० ---

उजेड पडला म्हणजे
पूर्ण मनासारखे झाले असे नाही
जाता जाता उडत उडत
कुणीही काहीही म्हणेल
त्याचा अर्थ मी
स्वतःला विसरलो असे नाही

मन उगवले तेव्हाच
एक तीव्र मतही हजर झाले
आज हे जे रुक्ष बरड दिसतेय
पूर्ण स्टेशन
तिथूनच एक दिवस सुटेल गाडी
असे मानणारे आम्ही एकत्र आलो
-- मुळात हे स्टेशन आलेच कुठून
हा प्रश्न अवैज्ञानिक असल्याने आम्ही
तो विचारणाऱ्याचा गळा आवळला

मन असेस्तोवर सवयीने
प्रेमातही खोट निघणार
हे मी मनाने ओळखूनच होतो
मग हे विसरून
रममाण होण्यासाठी
आम्ही खूप
शृंगारशिस्त तयार केली

एकेक विसरणे आणि
एकेक दुरुस्त करणे
हे वैज्ञानिक असल्याने पटत होते
--- ००० ---

तुझ्यासाठीच हा महाल
तू आलीस की काळाला लागेल शिस्त
तुझ्या उन्मादक उत्पातात
हरवले जातील
जगण्याच्या रकान्यांतले
अग्रक्रमी असणारे आकडेही

हे नुसते तुझी वाट पाहणे नाही
तुझ्या आठवणीत जगणेही आहे
जणू न समजणाऱ्या भाषेत
कुणी गाते आहे
तुझ्या सर्व अवयवांचे
तारसप्तक

तुझ्या कटाक्षांचे पोषाख
तुझ्या हालचालींची वलये
तुझ्या ओठांतून आलेले
किंचित ओले अनवधानी
प्रतिसादांचे थवे

आपटतात आता मऊ
पडलेल्या माझ्या भूतकाळावर
जे असते माझे जगणेच

मला यातून सुटायचे नाहीय
माझा अंतिम श्वासही संपू दे यातच
मलाही नकळत
पेटू दे माझी चिता – मृत्यूपूर्वीच
--- ००० ---

मी तुला विसरणार नाही
याचा अर्थच मी गुंतून राहीन
मन केंद्रित करत आणि त्याचे
दुःख भोगत आनंदाने

मी विकृत राहीन
तुला तसे आवडते मी तुझ्या
स्पर्शाने मनमुराद जखमी होणे
म्हणून – मी तुझा आदर करेन

तुला आणखी काय आवडेल
ते तू सांगच – मीही
त्याच विचारात राहीन
उन्हापावसात

तुलाच खाईन तुलाच पिईन
तुला नष्ट करून
तुझे स्मारक बांधून
मग पश्चात्तापात दग्ध होत राहीन

माझ्या स्मृतीतून उकरून काढेन
तुला बाहेर पुन्हा सदेह जिवंत
तू मरूही नाही शकणार
माझ्या तीव्रतेने नष्ट होऊनही

माझ्या मनात – हवी तशी राहा
सतत बंदिस्त पण आपोआप उमलत
आसुसून स्वागत करत
माझ्या सर्वच कृतींचे जणू प्रथमच     --- ००० ---

प्रारंभिक जगण्यात मी
असण्याबद्दल मला खात्री होती
आकाशाचा आकार पाहून पाहून
मी खिशातले सगळे टाकून दिले

हे मी तुम्हाला का सांगतोय
तर तुमचीही माझ्या लेखी
तीच अवस्था आहे जरी चिडून
तुम्ही माझे तुकडे करू शकता

तुम्हाला माझ्याबद्दल
असेच वाटत असेल तर ठीकच आहे
पण माझ्याकडून झालेल्या एखाद्या वर्चस्वाने
तुम्ही कायमचे डूख धराल तर ते खोटे आहे

आपण एकमेकांना
परीटघडीचे दिखाऊ
खोटेच धरून चालायला हवे
खरे तर

मीच फक्त खोटा आणि बाकी
सगळे खरे असे तर नाही होऊ शकत
हजारो वस्तू साठवत तुम्ही श्रीमंत
म्हणवून घेऊ इच्छिता

एवढाच त्याचा अर्थ
म्हणूनच हे सांगितले
हे चुकून आणि शेवटचे समजा
तुम्ही असा वा नसा – तुमची मर्जी --- ००० ---

पाय तुटका घोडा

आणि डोळे फुटका वाघ

ही बदलु या बोधचिन्हे

आपल्या जागेपणाची आणि झोपेची

हा विचारही ऐकायला

कुणी तयार नाही

आता आहे हीच समर्थनांची सवय

आणि गुरगुरीचे भजन

चालु ठेवू म्हणाला समाज

जरा हळूच चालु म्हणाला

एवढे काही अधीर

व्हायचेच नाहीय म्हणाला

थोड्या जुन्या गप्पा काढू

अपार कष्टांचे भोगचित्र दाखवू

पोरांना आणि सांगू निवांत राहायचे

आणि मजेत माजात राहायचे

हे फक्त आपल्यांत तसे तर नाला

रेडी ठेवायच्या आणि डोळ्यांसाठी गोट्याही

एका वा दहा पिढ्यांत

हाडीमासीची सवय थोडीच मोडते

घोड्याचे पाय तोडणाऱ्यांवर

वाघाच्या डोळ्यांनी जरब ठेवू

-- व्हिलनना व्हिलन म्हटले तरी

भूतकाळ चालुच राहणार ना – कशाला उगीच

--- ००० ---

विचारासाठी मी सँडविच वापरतो
ज्यातून माझे श्वास ऐकतात
माझे बालपण
जेव्हा विचारासाठी
मी सायकल चालवत असे फास्ट

माझे बदलते मूडस कळावेत
म्हणून मी उपास करतो
पाऊस पडत असला तरी
मी झोप काढतो

इतरांचे विचार
अव्हेरण्यासाठी
मी आधी बॅटिंग घेतो
माझी पूर्ण टीम
देशोधडीला लावतो
निव्वळ प्रतिकार म्हणून

हिरव्या बागा
नाही करत मला आकर्षित
कारण फुले हुंगत अटळपणे
आठवणीतल्या दुःखाचा चहा
पिताना माझी दृष्टी भाजते

मला शांतता हवी असते
कुणालाही इजा न करता
मला वीजबिल भरायचे असते
सुखाची तजवीज म्हणून
--- ००० ---

जगाबाहेर पाऊल टाकायला
जगातले पाय नाही चालणार
घोरपडीसारख्या चिकटलेल्या मनाने
पारतंत्र्याचे बंद नाक
खुले कसे होईल

प्रेमावर अवलंबून राहिलो
तेव्हा दुबळा बनलो
कोवळे ऊन आणि नदीनाले
यांचेच गोडवे गात राहिलो
अंधारून आल्यावर भयभीत झालो

कुणी काय करायला हवे
हे सांगण्यात मन
वाकबगार होत गेले
जगातले अन्याय नष्ट करण्याचे
मास्टरमार्ग मेंदूत फिट होत गेले
चेंज म्हणून मधे मधे सूर्यास्त
पाहण्याचा परिपाठ ठेवला

जगातल्या मोठ्या सत्ताच
घोळ करतात आक्रमकपणे
घडवतात अतिरेकी मला धोका
निर्माण करणारे ज्वालामुखी

मला माझा निष्पापपणा
विजयी व्हायलाच हवाय
ॲट एनी कॉस्ट
--- ००० ---

एखाद्या टोकेरी राहिलेल्या
काट्याकडे लक्ष न दिल्याने
पसरत राहते अस्वस्थता
हवेत पाण्यात अन्नात

वाटते आपले कपडे आहेत
खूपच घट्ट वा ढगळ
आपले बोलणेही अस्ताव्यस्त
आपले विचार हाताबाहेर
आणि आपला चेहराही
आपल्या मापाचा नसलेला

हे आवरणार कसे
या विचाराने आपलीच बँक
आपल्या डोळ्यांसमोर
लुटली जात राहते

एवढी वर्षे आपण तोल संभाळला
प्रत्येक संबंधात अपेक्षेप्रमाणे
भिऊन वागलो आणि हसलो
बरोब्बर मापात वेळोवेळी

परीक्षा दिल्या नोकरी केली
संसार केला देशाचे सर्व
कायदे पाळत
तरीही हे असे का घडावे

नेमके कारणच पाहायला हवे
--- ००० ---

गावे आणि घरे खूप बदलली
बसचालकवाहक ओळखत
माझ्या भोवतीच्या भिंती
आणि रूटीन माणसे
बदलत राहिली
झाडे रस्ते दुकानेही

सगळेच तात्पुरते
आपले मानले गळ्याशी
आल्याप्रमाणे
काळ प्रत्येक वेळी

हलकल्लोळ दिसू नाही दिला
ढेकूण चावले म्हणून
त्रागा नाही केला
हे झाले की मग
ते संपले की मग
शेवटी एकच वर्ष उरेल

म्हणजे जगायचेय
ते नंतरच

या हास्यास्पद जगण्याला
पावसाची धार लावत राहिलो
आणि पुन्हा बदलीच्या ऑर्डरची
वाट पाहात बसून राहिलो

अनंत काळ एका दगडावर उगीचच
--- ००० ---

संघर्षमय मनाने
शांतता आणायच्या प्रयत्नात असतो
माझ्या मनातला एक डास

मच्छर म्हटलेले नाही आवडत त्याला
त्याच्या जगात त्याला पुरेसा
मान मिळतो आणि नेतृत्वही

तो सभा घेतो
आझाद मैदानावर
रात्री अंगार फुलेपर्यंत

कशाला आणि कुणाला स्मृतीतून
गाडायला हवे कायमचे भूतकाळात
हे त्याला निर्घृणपणे माहीत असते

फक्त कर्तव्य म्हणून तो
दोन घास खातो संबंध करतो
पोरांना शाळेत घालतो

सगळे धगधगत्या मनानेच
करण्यावर त्याचा कटाक्ष असतो
शांततेचे विसरायचेच नसते

डोळे लाल बीपी आणि मूळव्याध
यांसह तो शांततेचे स्वप्न बघतो
प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने
--- ००० ---

तुम्हाला फक्त बाहेरून दिसत असतील या वायर्स
तशाच त्या आतूनही आहेत किंवा आतूनच बाहेर
ज्यांत मी गुरफटलोय त्या सवयीच्या असल्या तरी
काही आता सोयीच्या नसलेल्या माझा चेहरा
तुम्हाला सतत आक्रसलेला दिसतो तो त्यामुळेच

माझ्याकडे उपाय नाहीय आजूबाजूचे जग
नाही का मी स्वीकारून चालत मी
पूर्वग्रहयुक्त जगतो असे आरोप होतात माझ्यावर पण
कोणते ना कोणते पेय असतेच ना प्रत्येकाच्या मनात

तरीही मी रस्ते गॉगल्स मॉल्स तलाव
सगळे बदलायला तयार असतो
सामोपचारासाठी मी सर्वांसाठी
भेळही मागवतो हवाबदलासाठी
सुरू करतो अनेक ब्रँडचे मसाले विकणेही

इतके गुंताड्याचे पूर्णच कुणाला पसंत पडेल
हे शक्यच नसते त्यामुळे मी अनेकदा दाखवत
राहतो की मी काही तुमचा शत्रू नाहीय

जगातल्या कशावरच नाहीय माझा कंट्रोल
तरीही मी अहिंसेची बाजू घेतो
काहींना हा माझा आपमतलबीपणा वाटतो
अशा वेळी गर्दीच्या लोकल्स मी सोडून देतो

हॉटेल अमुकच स्टार्सचे असावे यापेक्षा
तिथे मिसळ-पाव मिळणे हेच मला महत्त्वाचे असते
--- ००० ---

आदर्श काही कुठाय परफेक्ट
माझ्या आयुष्यात या विचाराने
मी राजकीय बातम्या वाचणे बंद्च केले
खोल विहिरीतच मी थांबून राहायचो
बराच काळ तेव्हा फक्त पंतप्रधान
कोण आहेत एवढेच मला माहीत असायचे

नकाशाच्या सूचनांप्रमाणे मी
गंतव्याला पोचलो तरी
तिथे प्यायचे पाणीच नसायचे किंवा वाऱ्याने
धूळ फार उडायची ज्यामुळे माझी सगळीच
स्वप्ने धोक्यात यायची

माझे शिक्षणच चुकलेले होते
एकच अर्थ निघेल असे छान
मांजर पाळता येते याच
निष्ठायुक्त खात्रीने मी दुधाची
बशी घेऊन प्स प्स करत
त्याला बोलवत राहायचो

माझी प्रेयसी हसायची फक्त
सुरुवातीला नंतर ती भेटेनाशीच झाली
त्यापेक्षा ती शॉपिंगमध्ये
गढून गेली असे मला नंतर समजले

थोडे दिसताहेत बदल
या आधारावर मी मात्र कपडे झटकत
आशावादी राहात आलोय अविरत स्वप्नमय
--- ००० ---

नकोच तेढ म्हणून
एखाद्या वासराने
देवाची करुणा भाकावी
तसे माझे मन
भास-आभास सीमेवर

उड्डाण पुलावरून
पलिकडे घरंगळताना
माझ्या आठवणी
मला घाबरवतात
उंचावरून खाली
पाहिल्याप्रमाणे

एकूण जगातच
बरोबरता यावी
म्हणून प्रयत्न
करणारा मी कोण

आता अधिक जखमा
होऊ नयेत आठवणी
यासाठी मला नम्रपणे
चेक आऊट करणे मान्य

मी माझी पाळीव भावना
देतो सोडून – पण त्यामुळे
समोरच्याला वाटते आता
त्याच्याही आयुष्याची दोरी तुटेल --
तो घाबरून हिंसक होतो
--- ००० ---

नाही तरी फुकटच मिळालीयत तिकिटे
म्हणून हल्ला कोण घेईल ओढवून
त्यापेक्षा ओकाऱ्या थांबवून
हो ला हो करणेच
कधीही शहाणपणाचे होईल

उद्दिष्ट म्हणून सडका
कचरा पेटवला तरी त्याच्यातही काही
त्यांच्या घामाच्या भावना
गुंतवलेल्या असणारच
ते म्हणणारच की खूप मोठे
काही नकोच आहे
त्यापेक्षा नष्टच करू आम्ही उगीचच
तुम्ही उभारलेले भ्रम

साबणाचे वेष्टन काढताना
सुचलेली कविता
ही काही माझी जाहिरात नसते
माझी माझ्याअविरत प्रयत्नांतून
सुटका करणारी ती असते फक्त
एक निव्वळ निःशस्त्र प्रेमिका

ते म्हणतायत जगायला
लागतात किती अशा भावना
कशाला ते मिसळींचे उत्सव

खरे तर लिंगभावनाही
नष्ट व्हाव्यात सगळ्यांच्या
--- ००० ---

दाहिनीच्या रांगेत

आपले प्रेत लावून

प्रतीक्षेत आपल्या नंबराच्या

असल्याप्रमाणे कोण राहणार हो जगत

इतके मतभेद बाळगत

मी पडतो

माझ्यातून बाहेर

आणि सहज फेरफटका

मारतो रोमँटिक गाण्यांतून

कोणत्याही नायिकेच्या

नादी न लागता

जरी एरवी होऊ शकले असते

हवे ते न घडण्याचे संघर्ष

हे मन मुलायम --

बसू देत बोंबलत तिकडे

ते मतभेद जोपासणारे

प्रेतांना हार घालुन

परंपरागत फुशारकीत

विचार फेकून देता येतात

हे माहीत असल्याने

मी मनसोक्त विचार करतो

माझे कंगवे जेव्हा विंचरत

असतात माझी भाषा

आपण प्रेत नसणे म्हणजे जिवंत असणेच की

--- ००० ---

हा एक नेहमीच दिसणारा कावळा आहे
त्याच्याही बाबतीत असे बरेच आहे
जे घडायला हवे होते
पण ते त्याला काहीच कळत नाही

आमच्या घराचा पाया खणताना
सापडलेला एक गुंतागुंतीचा दगड
मी बाळगलाय एक नैसर्गिक
कलाकृती म्हणून
पण तिला आपल्या बुद्धीने अर्थ द्यावा
की न द्यावा त्याचे मूळ स्वरूप न बिघडवता
या विचारात मी असतानाच
तो कावळा म्हणतो
तो तुला सापडलाय तर दे अर्थ
अन्यथा तो नुसता दगडच तर आहे

म्हणजे कावळ्यालाही
काही ना काही कळते हे नक्की
कदाचित माझ्याहून खूप थोडा काळ
आणि खूप थोडी स्मृती
यांवर चालत असतील त्याचे विचार

त्यामुळे
मला काय हवे होते ते मागे पडते
आणि आश्चर्य -- मन मानेल तेव्हा मी
वैफल्यातून बाहेर पडतो
आणि त्या कावळ्याप्रमाणेच स्वतःला
बाहेर पाहू लागतो – माझ्याशिवाय
--- ००० ---

खोटे असणे आणि नसणेच
यांत निवड कशी करणार
खोटे निदान असते तरी
जे नाहीच ते खरे असले तरी
असण्याबरोबर स्पर्धा कशी करणार

खोट्याचे असणे खोट्याला
धरून बसता येते
त्याने त्याला सतत
असण्याचा दिलासा मिळतो
समाधान आणि खात्री मिळते

खोटे दुःख भोगते
त्याचे ताण शरीरात
पसरतात कॅन्सरसारखे
जरी त्याला ते सर्व नकोसे असते
आणि हवी असते त्याला सतत
त्यातून सुटका ( पण असण्यातच ! )

तरीही खोटे स्वतःला नॉर्मल समजते
तशाच एकमेकांच्या ताणतणावांनी
प्रेमाद्वेषांनी त्याला मिळते
शिक्कामोर्तब त्याच्या खरेपणाचे

त्या तीव्र सातत्यातून खोटे ( वाह ! )
आयुष्य सुंदर आहे म्हणते
तडफडत मरत राहते इतर अनेक
खोट्यांबरोबर हसतखेळतरडत
--- ००० ---

खूप आजारपणानंतर
अनेक महिन्यांनी ट्रॅफिकमध्ये यावे
तसे पुस्तक प्रदर्शन
पण आता न्यूनगंड नाहीय
पुस्तकांची हजारो नावे पाहून येणारा
उलट त्याच्या चेहऱ्यावर एक
किंचितसे स्मित

पूर्ण मानवजातीचा एकच मेंदू असून
त्याचा काही भाग माझ्याकडे आहे
या विचाराने तो शांत आहे --
कुठे ना कुठे पाहिले जातेच आहे
ना हे सगळे --
आता तो सही सलामत
विना अपघात
जगेल सहज

तो घेतो फक्त एक
अष्टावक्रगीता --
तू विचार करून काय
साधणार आहेस --
तू कोणत्याही वर्णाचा वा आश्रमाचा
नसल्याने हिंसा करणे
वा कुणावर दया करण्यासाठी
हपापलेले असणे
हे आता घडणार नाही

हे वाचून त्याचा मेंदु सर्व मेंदूंना स्पर्शतो
--- ००० ---

पन्नास वर्षांची प्रथा बदलुन
अचानक नारळांऐवजी कंपासपेट्या
येऊ लागल्या काळाचा महिमा म्हणून
त्या स्वीकारल्याही जाऊ लागल्या

त्याचे एक गुरू म्हणत
संघर्षाशिवाय काहीच मिळत नसते
नुसताच न्याय देणारे न्यायी
कुणी नसते – त्याच वेळी
इकडे विठाई हसे
तुकाई माथा काठी हाणे आणि माउली
मूक राही

आपण निरमाऐवजी डबलबी
कधी सुरू केला ते तो आठवत राही
आपले बालपण इस्लामपूरऐवजी
परभणीत अधिक चांगले
जाऊ शकले असते का
हा विचार त्याला सतावे
आणि तसे झाले असते तर
इतके असे मानसिक
गोंधळच नसते झाले
या विचाराने तो खट्टू होई

क्रांती झटकन होते आणि विकास
हळूहळू होतो या विचाराने त्रस्त
असताना तो अनवाणी वारीला जाई
वारकऱ्यांमध्ये येत्या निवडणुकांच्या चर्चा होत
--- ००० ---

आपली डोकी फुटताहेत आतून
बाहेरून फुटताहेत आपले सर्व समूह
जाती, पक्ष, संस्था, देश, धर्म
आपल्या डायनिंग टेबलचे
तुटताहेत पाय
आपल्या मित्रपरिवारांत
फुटताहेत गैरसमजांची वारुळे
आपल्या ऑफिसांत होताहेत भूकंप
आपल्या चारित्र्यांचे वाजताहेत बारा
भर बाजारात
आपल्या करियर्सचे भरंवसे डळमळताहेत
आपली मुले राहतील का नीट की
त्यांचीही फुटतील भविष्ये

यांतल्या प्रत्येक प्रश्नावर
घेतोय आपण वेगवेगळ्या गोळ्या
प्रत्येक प्रश्नाचे गाठतोय आपण
वेगवेगळे तज्ञ
असंख्य आश्वासने देणाऱ्यांचे फुटलेय पेव

दिङ्मूढ होणे, बधीर होणे,
तोल जाणे, भरकटणे,
छिन्नमनस्क होणे, हिंसक होणे

हे सगळे घडतेय धावाधाव
चालु आहे – हे सगळे एकत्र --
एक कसे होईल --
हा प्रश्न तरी अखंड राहो
--- ००० ---

कल्पनेने ऐकले मी तुझे घर
येऊ दिले तुझे बालपण
माझ्या किनाऱ्यावर
जेव्हा कळायच्या आधीच
तुझे भविष्य अंधारणार होते

मी काहीच विचारले नव्हते
आणि या क्षणातली तू होतीस
आत्ताच अचानक जन्मलेली ताजी
माझे दिखाऊ संरक्षक कवच भेदणारी
नुसत्या साध्या अनलंकृत नजरेने

दोघांचा एकत्र वर्तमान
गेला हव्याशा भविष्यात
काठाकाठाने अबोल तीव्रतेत

तुझ्या विस्तीर्ण सावलीत
तुला मी करायला लावली
माझी छाननी निःशेष
हवी होतीस तू अनिर्बंध

आपण झालो वर्तमानप्रेमी
तुझे सर्वच कपडे मला दिसेनासे झाले
अशा अद्वैताने आकर्षणच
नष्ट झाले तर

आपली सर्व दारे सताड उघडी
आणि भन्नाट आकाश
--- ००० ---

सर्व माणसांचा सारांश म्हणून दगडांतून
रक्त पाझरू लागले – दगडांच्या वेदना
ही प्रमुख समस्या म्हणून मान्य झाली
सर्वांनाच पटत होते की नद्या नाले पर्वत
कुणालाच वेदना नकोत – वेदनाहीनच हवे
सगळे जगणे

सिगरेट पिणारी माणसे याच कामात
व्यग्र झाली – सगळे बदलल्याशिवाय
पृथ्वी फिरत राहते याने ते संतापून जात
नद्या नाले म्हणत सारांश असाच
असत आला आहे – थोटकांचा कचरा
कमीजास्त होत

दुकानदार रोज नाइलाजाने शटर्स उघडत
खेळाडूंना अंडी खावीच लागत
चित्रकार बुडून जात उत्तुंग आणि सखोल
आशयात

दगडांच्या मनांत येई उठावे हल्ले करावेत
ते किंचाळत रस्ते उखडतही इमारतींना
आगीही लावत – नद्या म्हणत वेडे आहात
सारांश बदलत नाही आणि हे समजत असूनही
तुम्हाला मस्त चैन हवीय तुमच्यापुरती सिगरेटी
पिण्याची रक्त तर सर्वच मनांतून पाझरतेय

शेवटचा माणूस जेवेपर्यंत राजा जेवत नाही असे शक्यच नाही
या पृथ्वीवर सूर्याची समदृष्टी आदर्श मानणाऱ्या मानभावीपणे

--- ००० ---

खरे तर एकाच कवितेने
व्हायला हवेय निराकरण
आत्मस्तुतीने फाटके कपडे
का शिवता येत नाहीत याचे
का होत नाही मानसिक
मूडसची मालिका
विलीन वर्षानुवर्षे असलेल्या
अत्यावश्यक विश्रांतीत

उभे पीक जळून गेल्याप्रमाणे
भकास झालेल्या वाऱ्याने
गारवा कसला मिळणार
अतिरेकी हल्ल्यात व्हावा विध्वंस
तशा घटना अटळ आणि हेकट
आणखी किती वर्षे
भरत राहणार स्मृतींचे कप्पे

समोर उद्दिष्ट होते
म्हणून तरलेय थोडे तरी अवसान
शेजारीपाजारी राहिलेत
विसंबून की आणेल
कोणते ना कोणते कबूतर
निर्वाणीचा निरोप

रोज चैनबाजी करावी
इतका उत्साहच नाहीय
एका फटक्यात कवटीच्या
आतबाहेर बदल हवाय
--- ००० ---

घरापाठीमागे तोच आहे
डोंगराचा खडक
निरनिराळ्या वयांत
कोणकोणत्या गावांत मी काय काय केले
हे सांगणारा जो आज मला
परिपक्व समजतो

वेश्येचे आकर्षण असणे
आणि त्याच वेळी
दया वाटणे तिच्या नाइलाजाची
ही अवस्था आज बावळटही वाटते
आणि ढोंगीही नुसतेच तिला
काही पैसे देऊन निघून जाणे
अंधारात नीतीमान होत

मी मतदान केले वर्षानुवर्षे
फक्त देशहितासाठी
तरीही कोट्यवधी लोक
न्यायाविना तडफडत राहिले
जसा मीही एक तुलनेने
कमी अन्यायानेही
अतिविद्ध होणारा

सदोतीस वर्षांपूर्वी माझा एक वाद
गेला होता शारीरिक हिंसेपर्यंत
ते आठवत त्या खडकावर पडतेय ऊन
मऊ होतोय तो क्षणभर कारण आता
तो स्वतःला खूपच समजुतदार समजतोय
--- ००० ---

अशांत असणे म्हणजेच हिंसक असणे
असे मी म्हणालो तेव्हा नुक्तेच
तुझे नहाणे झाले होते आणि तू तुझ्या
संगणकाला पाणी घालायला
निघाली होतीस सजूनधजून --
तू माझ्याकडे लक्ष न देता तुझे ओठ
सूर्याच्या दिशेने वळवलेस ते
माझा अपमान करण्यासाठीच जणू

तुझ्या खिडकीखालुन वाहणारे साप
माझ्या स्वप्नातही आले होते आणि नेमका
तेव्हाच मी शोधत होतो मुतारी --
सत्वर मोकळे व्हायचे होते मला
माझ्या प्रिय कंडक्टरच्या उपकारातून
मला विनातिकीट आणणाऱ्या
या पदापर्यंत बिनबोभाट

मार्केटात तुझी खूप प्रसिद्धी होती --
गोडी लावून नकळत संमोहित
करण्याच्या तुझ्या कसबावर खुश होते
सगळे चराचर अविरत

माझ्या अशांततेतून पडणारे
माझ्या हिंसेचे माझ्या मानसिक
रक्ताचे थेंब जात होते
वाहत्या सापांच्या तोंडांत
आणि प्रचंड धावपळ करूनही
सापडतच नव्हती मला मुतारी
--- ००० ---

मी पितो माझ्याबरोबर

कधीकधी माझी कोल्ड कॉफी

जिच्याबरोबर माझा

चॉकलेटी भूतकाळ

सौम्य मध्यमवर्गीय

जी मी एंजॉय करतो

काही मित्रांसोबत

ज्यांची मैत्री

गेली काही वर्षे सौम्य

माझ्या कॉफीसोबत

माझे हॉटेल सौम्य वाऱ्याचे

आतल्या आत एक मस्त

खाजगी आठवण जपणाऱ्या

माझ्या कॉफीचा सुगंध

अर्धोन्मीलित संध्याकाळी

माझे अनेक संघर्ष

सौम्य करणारा

माझ्या छान फ्रेश चेहऱ्यामागे

माझ्या कॉफीला माहीत आहे

तिचे क्षणिक थंड अस्तित्व आणि

सांध्यरंगात लुप्त होणारा तिचा शेवटचा सौम्य थेंब

हे आता संपण्याच्या भीतीचा चरा

देऊन जाणारी माझी सौम्य प्रिय कोल्ड

--- ००० ---

ना एखादा मूड ना रागलोभप्रेम
अशी निखळ अस्तित्वाची कविता लिहायची तरी
वस्तू लागणारच जन्मल्यानंतर
डोळे उघडण्या आधीच्या अमर अंधारातून येणाऱ्या
असंख्य आवाजांतून नेमके विचार शोधणाऱ्या

नुसतीच सुरुवात आलेली असते समोर
हजारो बातम्यांसारखी विस्कळित
दगडावर सतत आपटत राहणाऱ्या
पाण्यापेक्षा दगडच अधिक स्वच्छ
असे म्हणत लिहिता लिहिताच
पूर्ण होत जाणारी तणावपूर्ण

विरोधी पक्षनेते येतात तलवारी घेऊन
म्हणतात की ही निराशा होतेय
असे केले तर कोणतीच कुत्री
रक्षण नाही करू शकणार
येणाऱ्या पिढ्यांच्या सुखसंभारांचे
स्वतःच्याच मुलांसाठी स्वतःचे
जगणे त्यागायला तुम्ही नकार देताय

हळूहळू झालेली मेंदूची प्रगती
मान्यच असते हजारोंचे ऋण
ज्योतिष आणि रत्ने यांचा प्रचंड बोर्ड
दिसतो तीस दिवसांत वांच्छित न घडल्यास
सर्व पैसे परतीची खात्री देणारा
तरीही मन धजत नाही
सक्तीचे मुखवटे पांघरून
अज्ञातवासात जायला

एस्टी स्टँडवर दुरून दिसावा
झिंगून पडत आलेला मित्र
तसा जिवंत राहण्याचा विचार
वाटतो बाहेरच्या बाहेर अविचारी
कळकट गाडीवर चहा पिणाऱ्या
माझ्या या उपलब्ध मनाला न शोभणारा

तरीही मी आत्महत्या नाही करत
किंवा समोरचा क्षण टाळण्यासाठी
झोपेची गोळीही नाही घेत
मधेच कुणीतरी माझ्या खिशावर लावलेला
गुलाब संभाळत मी शांतपणे
पितो मीठा लस्सी अविचल असल्याप्रमाणे

डोळे उघडले तेव्हा सर्व वेद पाठ होते
तरीही अंधार नष्ट झाला नाही
तेव्हापासून उडाला माझा विश्वास शब्दांवरचा
आणि तरीही जडले व्यसन कविता लिहिण्याचे
होऊ दे आयुष्याची नासाडी असे म्हणत

शेवट येण्यापूर्वीच उलगडायलाच हवेय
या मानसिक कोंडीचे कोडे

निखळ अस्तित्व ही नुसतीच
एक कल्पनाच तर नसेल
आपला आपला झेंडा म्हणून फडकणारी
कार्यरत असण्याची एक समजूत म्हणून
--- ००० ---

तसे घडले काहीच नाही
ना विचारांचे कपचे उडाले
ना भावनांचे टवके
नुसतेच एक सनातन आकर्षण
आयोडीनच्या वासाप्रमाणे
वर्षानुवर्षे पसरत राहिले

ती होती एक
नृत्यातली पोझ
स्टेशनच्या जिन्यावरून
पळतानाही आठवणारी

हाच का म्हणू नये
आयुष्याचा पाया
नग्न आठवणींचा
उत्तेजित रंध्रांचा

डोळ्यांतून ओसंडणारे
लाखो रेशीमधागे
माझ्या मनाच्या
सुखलोलुप तुकड्यांना
जायबंदी करणारे धर्मबंध

त्या क्षणीचा तो चेहरा
त्या आधीचे ते वादळ

हजारो वर्षांची ही प्रेमकविता
या क्षणी मनाच्याही मर्यादा न --
--- ००० ---

दगडावर बसलेले फुलपाखरू
ही एक घटना पाहून
प्रश्न निघतो दगडाच्या आणि मग विश्वाच्या
उत्पत्तीचा – मनच मनाला
नेमते डिटेक्टिव्ह

ते असंख्य गोष्टी शोधत राहते
पण त्याचबरोबर
फुलपाखराचे डिझाईन
कुठे कुणाला कसे सापडले असावे
अशा घटनांचेही विचार करत राहते

स्वतःचे असणे ही एक घटना
आणि दगड हे एक मूलभूत सत्य
आणि उगवत्या प्रत्येक दिवसामुळे
वाढणाऱ्या वयाची पृथ्वी
असे चालु राहते
घटनेने घटनांना जोखणे

मनाची घटना पाहतेय विश्वाच्या घटनेकडे
असा मूळ गुन्ह्याचा शोध चालुच राहतो
आणि सापडणारे सर्व तपशील
उपयोगी पडत असल्याने
मन होते भूतकाळाचे संग्रहालय

पण गुन्हेगार सापडण्याचे काही
नावही दिसत नाही
-- आपण तर नाही बाबा तो --
--- ००० ---

नजरानजर झाली तेव्हाच
उघडल्या गेलेल्या पुस्तकांतून
अंधार बाहेर पडले अनाहूतपणे
याचा अर्थ ढगांत निराशा होती
असा नाही
सेक्सच्या ऐवजी
मॅरॅथॉन रेस आठवली जात होती
इतकेच

परंतु होती ती रात्रच
पाने सगळी काळीच दिसत होती
तिथेच कुठे कुठे पक्षीही असणारच
विनास्वप्न झोपी गेलेले

म्हटले तर शांतता होती
म्हटले तर थकवा होता
आणि म्हटले तर
घडेल ते घडेल
या विचारात मन स्तब्ध होते

एकानंतर दुसरा क्षण
असे पाहिले तर
ते संधीची वाट पाहणेही ठरू शकले असते

रोजच्या रोज कोण गाणार भजन
म्हणून विस्कटलेल्या मातीतही
पावसाची वाट पाहणे होते
एक प्रकारचा आशावादच नाही तर काय
--- ००० ---

प्रत्येक वर्षी कमीजास्त
पक्षी मरतच असतात
नेमका पाऊस किती पडावा
हेही निश्चित नसल्यावर
एखाद्या व्यक्तीला अपमान
किती सहन व्हावे हे कसे सांगणार

हवेचाच प्रश्न असल्याचे पाहून
कुणी तिला धार लावू लागतात
त्यातच एकजण म्हणतो
या विश्वातच श्वासापेक्षा
उच्छ्वासच अधिक महत्त्वाचा आहे

आणि मग येतो पेच लक्षात
काम तर बुद्धीनेच चालवावे लागणार
आणि ती तर हवा फक्त
बाहेरून आतच घेऊ शकते

यावर जरा वाहत्या रस्त्यावर
शांत राहाणेच ठीक
अशा विचाराने
सर्व वादावादी थांबवून
विसावा म्हणून पक्ष्यांना
दाणे टाकणे चालु राहते

काहीतरी केले तर पाहिजे
या विचाराने मग आधी अपमानाचा
बदलाच घ्यायचे ठरते
--- ००० ---

माझी एक थियरी आहे

आपण मेंदू कुठे मुडपतो

त्यावर आपला स्वभाव ठरतो

खालच्या बाजूला इहवादी

वाणि वर श्रद्धावान

पण असते सगळे

शारीरिकच

( यावरून विचार करा

नीतीबीती सगळे खोटे असते )

घराच्या खिडकीतून

बाहेर पाहताना किंवा

एखादे गाणे ऐकताना

मी ठरवून वेगवेगळ्या ठिकाणी

माझा मेंदू मुडपतो

खाली व्यवहारी

वर कलानुभव

पण असते सगळे

शारीरीकच

वर जरा ( तात्पुरता )

स्वभाव मऊ पडतो

इतकेच

मुडपलाच नाही तर

म्हणजे स्वभावहीनताच की

तिला शब्द नसतो

बिनशारीरिक

ओळखणार कसे

--- ००० ---

बोलणे व्हायचे
त्या ओघात एकदा
अगदी आतलेही बोलले गेले होते
तिने होकारही दिला होता
पण तिच्या ओढणीवर त्या वेळी
तिच्या ऑफीसकामांची यादी होती

ते आता फिट आहे
तिचेही असावे
पुन्हा तो विषय नाही
तरीही सतत आहेच
एकटी असताना एखाद्या क्षणी
तिचेही डोळे एकाग्र होत असतील
( मला प्रचंड लुभावणारे )
-- या जगात समानाधिकार असून
लोक तो वापरत नाहीत
हे फार वाईट आहे

की मीच पुन्हा तेच म्हणू
जणू ती वाटच पाहात असल्याप्रमाणे
-- मी न म्हटल्याने तिचे वाट पाहाणे
वाया तर नाही जाणार

या अंधुक क्षणी ही कविता
सोडतोय मी या विश्वात
ही नक्कीच लक्ष्य गाठेल
तत्क्षणी असेल तिथून तिने
सिग्नल द्यावा
--- ००० ---

सगळीकडे रस्ते खणून ठेवलेले
वायर्स पाईप्स पेव्हर ब्लॉक्स खड्डे दगड धोंडे माती
कुठेही चालत गेलो आयुष्यात तरी हेच
न ठेचकाळण्याची काळजी घेत
आम्ही मार्गस्थ हसतो
एकमेकांकडे पाहून
समान त्रास भोगण्याची मजा म्हणून
चिडून आणखी आतलेही उरलेले सगळे
दुरुस्तीला काढायची आमची तयारी नसते

काहीच नीट नाही असा हाच एक देश आहे
की जगभर असेच आहे घुसमटलेले
वाताहातीवर पडलेले
विकृत नैसर्गिक ऊन

अत्तरे तर किती आहेत बाजारात
आणि मोरपिसांचे पंखे

घटनेचे सामूहिक पारायण ठेवायचेय
यंदाच्या गणेशोत्सवात
नाही नाही नुसते स्त्रियांचे नाही
सर्व समान या न्यायाने
सर्व जात धर्म भाषा वाले

सीरिया नामक देशातही रस्ते असेच
उखडलेयत म्हणे
काय काय साठवणार या छोट्याशा मेंदूत
जो मर्त्य आहे हाच दिलासा
--- ००० ---

मी स्थिर असतो तेव्हा जगही स्थिर असते
स्थिरपणे बदलणारे पण निश्चित
असतो सतत आमच्यातला युद्धाचा प्रसंग
जिवंतपणे जखमी करत राहणारा

मी प्रवाही झालो की जगही होते प्रवाही
म्हणजे युद्ध संपून आम्ही
सहज साजरी करत राहतो मैत्री
स्थिरता वाहून गेल्यामुळे

माझे रामभरोसे आयुष्य
आणि माझे हुशार निर्णय
जगाला मार्गदर्शन करू इच्छित असले
तरी सगळ्यांनाच असते आपापल्या स्वप्नांची घाई

यालाच जग आणि मी म्हणतो व्यवस्था
जीत राहूनच ती बदलायची आहे अशी
विद्रोही क्रांतिकारक जग आणि मीही
यातूनच येणाऱ्या एका नव्या व्यवस्थेकडे कूच करणारे

आमच्या प्रणयरम्य आठवणी आणि अपमान
एकत्रच संघर्षरत असतात आमच्यात सतत
रणकंदन माजवत तेच तेच तसेच प्रसंग
अर्थ लावत जे जे घडून गेले त्याचे निश्चित

वर्चस्वाची आणि सुखाची आणि संघर्षाची भूमी
असणारी आमची स्थिर व्यवस्था अबाधित ठेवून
तीमधले काही नेमकेच तपशील फक्त
बदलण्याचे आमचे ऐतिहासिक उदात्त प्रयत्न रामभरोसे --- ००० ---

गोंधळ आणि बिनगोंधळ
दोन्हींना वाव ठेवून
मी कवितेत
गोंधळाचे प्राबल्य वाढवतो
कारण मला माझी
संरक्षणयंत्रणाही
संभाळायची असते
मी कशाचे संरक्षण करतोय
हे माहीत नसले तरीही

मला विविधता उत्तेजक
वाटत असली तरीही
सर्वांचे स्वभाव आणि मते
एकसारखीच असावीत
असेही वाटते अपरंपार

कुणाचाच कुणालाही त्रास नाही
अशा जगाची कल्पना मला आवडते
फक्त स्त्री-पुरुषांत मात्र माफक
घर्षण आणि आकर्षण असावे
हा मात्र मला सुखाचा नाइलाज वाटतो

निश्चित सांगायचेच नाहीय काही
माझ्या कवितेतून गोंधळ
आणि मुख्य म्हणजे अनिश्चितता
यांच्याकडेच लक्ष जायला हवेय
कारण दोन्हीही पूर्णपणे निरर्थक
आणि वेगळेपणासह समान
--- ००० ---

या जगातल्या कोट्यवधी गोष्टी
मी पाहिलेल्याच नाहीत
ताजमहालही नाही
आणि जे मी पाहतो
ते फक्त माझ्या विचारांनी
आणि विचार बदलले की सगळे
मला वेगळेच दिसते
हे मला कायमच्या विचाराने
माहीत आहे माझ्या विश्वासार्ह

तसेच सगळ्यांचे असणार
संकट येईल तेव्हा कळेल गधड्याला
किंवा वाटू शकते आणूयाच मुद्दाम
साल्यावर एक टेस्टिंग फाशी

हिरिरीने कवटाळावे
असे जर काहीच नाही वाटत
तर का म्हणून मी शत्रू समजून
कुणाचेही कपडे फाडत फिरू

कधी कधी वाटते
सगळ्यांचा शत्रू होण्यापेक्षा
थोड्यांचा व्हावे सशक्त बाजू निवडून
आपल्याला पौष्टिक असणारी

विचारांची झेप ही एवढीच
कोणतेच विचार देत नाहीत
योग्य उत्तर हे मला माहीतच आहे कायमचे
--- ००० ---

वारा येतो-जातो
काही पाने म्हणतात
त्याचा हेतू चांगला नाही
काही म्हणतात
हा तर जुनाच आहे

माझे लक्ष असते
मनाने -- मन कुठले नवे असणार
त्याची बरीच पाने
वाळलेली आहेत

पण वाऱ्याला
काही चिकटत नाही
सगळे चिकटते ते
माझ्याच भूतकाळाला

मी मनाला थांबवतो
कारण शक्यच नाही
इतक्या सगळ्या पानांशी संवाद --
जे लागायचे ते लागू देत अर्थ
प्रत्येक पानाला पटणाऱ्या
अर्थाने कसे जगणार
नवे आणि सदहेतूपूर्ण

निर्मनुष्य वारा हेच
मी माझे जगणे करतो --
जाईल तिथे जसातसा जाऊ दे म्हणत
समूळ जातो मी वाऱ्यावर कुठेही
--- ००० ---

उपटसुंभ म्हणाव्यात अशा
फारशा वापरल्या न गेलेल्या
वस्तू तरी कोणत्या वापराव्यात कवितेत
ज्या करतील काही नव्या अर्थांचा वर्षाव
-- कुकरची शिट्टी शेवटी
स्थिरच असणार अर्थापूर्वी वा नंतरही
-- तसेच असणार हायवेवरचे
उत्तान मल्टिप्लेक्स --
ज्याच्या मर्यादा स्थिरच असणार मनात

अपघातात फरफटत गेलेल्या दुचाकीची
मनातली स्थिर भयानकता
ही हळहळ चीड पराभूतता
यांहून काय वेगळे देणार

माझ्या मनाच्या सवयींतच आहे
सर्व वस्तूंचा आणि घटनांचा मृत्यू
मी जन्मलो तेव्हापासून
रोज त्या मृत्यू पावत आहेत
माझ्या शिक्षणाची
परतफेड म्हणून

आता मला कंटाळा आला आहे
मी एकेक वस्तू दहन करत नाही बसणार
माझ्या मनाच्या यंत्रणेच्या मुळाशीच
बॉंब ठेवावा लागेल
इंटरेस्टिंग जगण्याच्या माझ्या स्वप्नाचा --
त्या स्थिर स्वप्नालाही उडवेल असा
--- ००० ---

सत्य हे फक्त असू शकते
ते ‘ असू देता ‘ नाही येत
ते वापरताही नाही येत
कोणत्याही समस्येवर
जरी त्याच्या असण्यात
सर्वच समस्या होतात नष्ट

आपली समस्या तरी काय आहे
हे दिसण्यातच ते उदय पावते
त्याच्या जवळपास वा कुठेही
आपण थांबूच नाही शकत

एक कणही हवेपण नाही चालत
नकोच ते वापरणे असे मनाने म्हणताच
आपोआप लागते ठेच हृदयाचा ठोका चुकवणारी

भयानक म्हणजे काय ते इथे कळते
आणि आता परतीचे दोर कापलेले
आता परतणे म्हणजे खंगून मरणे

याची चुंबकीय शक्ती प्रचंड असते
जगता जगता खरे तर
तिकडे वळणे होतेच टाळणे न जमल्यास
आणि मग सुरू होतो हा खेळ
त्याच्या प्रखर निर्मम असण्याचा

सत्याला काहीच नाही करावे लागत
स्वयंचलित नियम सगळे आपल्याच मृत्यूचे असतात
--- ००० ---

सरकारी कागदपत्रांवर
सह्या करताना उठलेले
मधमशांचे मोहोळ
प्रत्येक विचाराला डसत गेले
मग तो विचार बागेत
झालेल्या विध्वंसाच्या
सहानुभूतीचा असो की
प्रतिकूल परिस्थितीमुळे
करपून गेलेल्या भविष्याचा

नाही तरी आयुष्य
ठेचकाळतच चाललेले होते
स्वर्गातल्या सुखोपभोगांच्या
कल्पनांवरून
खेळवत आकाशाची
गोजिरवाणी पिल्ले
प्रेमळ खडकाळ खळग्यांतून

निर्वाणीचे हवेच काही उत्तर
म्हणून उलथलेला सूर्यास्त
कपडे धुवावे तसे धूत गेला
भूतकाळातले इच्छाबळ निर्घृणपणे

किंचित प्रसिद्धी असूनही
आता अत्युच्च शक्य नव्हते
प्रयत्नही टिकेनासे झाले
म्हणून मग मरणाला मानहानी
मानण्याचे भविष्य बळावत चालले
--- ००० ---

हवाही जगच
डोळ्यांना कानांना नाकाला
चिकटलेले खोलवर
मधल्या अंतरामुळे
वाटते जे बाहेर

अंतरही भरलेले जगाने
डोळ्यांकडे पाहणाऱ्या

मी जगाच्या सावलीत
कधी तिला कुरवाळणारा
कधी तिच्यामुळे भयभीत

सर्व माणसे जगाने
एकमेकांना घट्ट चिकटलेली
आतल्या आत
खाऊ पाहणारी एकमेकांना
त्वचेच्या रंध्रारंध्रातून
कधी दूर जात रागाने
तर कधी उकळत सुखाने

जगाच्या या
पडद्याबाहेरचे
काही दिसत नाही

जगाबाहेरचे जग
असेलच तर असे
चिकटणारे नसेल
--- ००० ---

जे आहे ते
अशी कविता दिली की
सगळे फोन बिझी होतात
काही नव्हतेच जणू
त्यांच्या आधी
असे दाखवत
त्यांना तहान तरी लागते
प्रामाणिक किंवा
ते अंघोळीला तरी
निघून जातात मग्नपणे

समस्या वा त्यांचा गुच्छ
देऊन केलेले कडवट
स्वागत त्यांना आवडते
ते हसून आभार मानतात
‘ आपले ‘ जग एकच
असल्याच्या खात्रीने

समस्येशिवाय जग
जाणवणार कसे
या विचारात ते
दारू एंजॉय करत
अनुभवातून विश्वास
मिळाल्याप्रमाणे
गूढ हसतात

आता बदल नको असतो
शेवटपर्यंत
--- ००० ---

संध्याकाळी लागताच दिव्यांतून
अमृत पाझरते म्हणून
मी काही हुरळून जात नाही
तरीही त्याला वाटले की
तिच्यामाझ्यात जवळीक वाढते आहे
म्हणून त्याने मला काही
तिच्याबद्दल विचारले
थियेटरच्या पायऱ्या उतरताना

मी बोललो काही साधेसेच पण
त्याने काही वेगळेच सांगितले
( असावे ) तिला जणू मी
एक रुक्ष बेफिकीर तिच्याबद्दल
फारसे बागकाम नसलेला

तरीही तिच्यात काहीच फरक नव्हता
तिचे हास्य तेच तसेच होते ढगांपलिकडचे पण पूर्ण विश्वासाचे

तो याने हवालदिल झाला
( असावा ) असे मला वाटले
पण मी ते दिसू दिले नाही
निष्कारणच मनात मुद्दाम
तिचे प्रेम बाळगत

तिने ते खरेच समजून प्रतिसाद
दिला समजा तरी चालेल किंवा बेहत्तर
पण जरा आलाच आहे एक विचार मनात की
तिच्यात खरेच काहीतरी जागे होतेय बागेसारखे
--- ००० ---

काही गोळ्यांनी संसर्ग जातो
पण मूड असा होतो त्रासिक
की संबंध बिघडतात

आता या प्रश्नावर गोळी नसते
म्हणून आपण पिकनिकचे ठरवतो
जुन्या आठवणींच्या गप्पा मारत
सरळ आपण निसर्गात घुसतो

कार पार्क करून आपण
सर्वांच्या आवडीनिवडी
लक्षात घेत वेळ वापरतो

ताज्या वाऱ्याच्या वनभोजनात
पुन्हा तो मूड आठवतो
पण आपण सर्वांना
रंगीत पक्षी दाखवतो

हेच तर हवेय -- सगळे हसतात
मग मुलांची भांडणे होतात
रडेपर्यंत ताणली जातात

तरीही फिरणे होते
सूर्यास्त पाहत पाहत
वापसी सुरू होते

आता संसर्ग नको आणि तो मूडही नको
जे झाले ते झाले – असा थकवा येतो
--- ००० ---

वर्षानुवर्षे एकच टोपी घालणारा माणूस
पडू शकतो धाडकन दहाव्या मजल्यावरून खाली
आणि तेव्हाच कळू शकते की
त्याच्या टोपीला मुंग्या लागलेल्या असून
त्याचे पूर्ण रक्त आधीच वाळून गेलेले आहे

तो स्वतःला प्रतिनिधी म्हणवत असू शकतो
सर्व गांजलेल्या आणि गंजलेल्या मनांचा
कुठाय मन असे विचारले तर तो
छाती फाडून दाखवत असू शकतो
त्याच्या पूज्य दैवताचा फोटो

तसा तो नास्तिक म्हणवत असू शकतो स्वतःला
जरी त्याची एकमेव प्रेयसी जाणून असू शकते
त्याच्या पायांत ठोकलेले खिळे
आणि त्याच्या आईने त्याला आशीर्वाद देऊन लावलेली तीट

ती टोपी त्याला अंतिम वाटत असू शकते स्फोटक
आणि सर्व असत्ये उडवून लावणारी
तो जेवतानाही उपरोधिक हसू शकत असू शकतो अन्नातली भेसळ ओळखून

तो पडला नसून त्याने उडीच मारली असेही असू शकते
आणि त्याने चिठ्ठीही लिहून ठेवलेली असू शकते
त्याच्या प्रिय कुत्र्याच्या पाठीवर
“ ज्यांना ज्यांना आपण स्वतः बरोबरच आहोत
अशी खात्री असू शकेल मुठी वळलेली
त्या सर्वांचा शेवट असाच असू शकेल – ‘ तो खरेच खरे
समजत असावा सगळे ‘ असे मुंग्यांनी म्हणावे असा – “
--- ००० ---

मनांसह असणारा एकपणा
म्हणजे रस्त्यावर सांडलेल्या डिझेलवरून
घसरणारी वाहने आणि त्या वाहनांचे
रक्त बधीर पुढील रस्त्याचा परवाना होणे

प्रेमाच्या नावाखाली आपण असंख्य
तारे ओलांडले आणि लक्षही नाही दिले
केकाटत्या जखमांकडे आपल्याच
घोषणांच्या घर्षणातून झालेल्या

अवयव सगळे पाठ पण
विसरत राहिलो आपण
आपापल्या पाळीव छंदांचे एकटेपण
आणि तरीही नेहमीच उमलले आपले चेहरे
आलबेल म्हणत प्रत्येक वेळी

पण हे खरे असू शकते का
आपल्याच जिभा एकमेकींना स्पर्शताना
घेऊ शकतात का सर्व बातम्यांचा आवाका
किंवा करू शकतात का
या शहरातली रहदारी आवाजहीन
वाहनांचे दरवाजे उघडे ठेवून

आपण समजून राहिलेले बरे
इथली प्रत्येक गोष्ट एकटीच असणार
त्याची फिकीर न करता सुखात बुडत
समजूनउमजून व्हायला हवे आपण एक
न घसरता आणि पुरेशा खोटेपणासह सहज
--- ००० ---

दुकानदाराने दिलेल्या खुर्चीवर
मी बाहेर बसून असतो रहदारीच्याही बाहेर
माझ्या कामाला वेळ असल्याने
मला माहीत असते की आता
कोणतीही अस्वले चाल करून येतील माझ्या मनात
मी कितीही टाळले तरी

जगातल्या सर्व गुन्हेगारीचा उगम
माझ्यातच आहे माझ्या गुप्त काळोखात
हे मला मान्यच असते – असे कोणतेच नसतात
गलिच्छ विचार जे

लाज आणून करू शकणार नाहीत
माझे अनैतिक हिंसक मन
कोमेजून टाकत मृतवत

माझे प्रचंड प्रयत्न चालतात कधीही उद्भवू शकणाऱ्या
माझ्या आजाराची भीती मनात येऊ न देण्याचे
कारण ती भीती फोफावणे हाच एक आजार होऊन बसतो

आनंदात राहा आणि चांगले विचार करा
हे माहीत असूनही माझा अंधार
उजेडाला भोके पाडून आत घुसतच राहतो

मला कळून चुकले आहे
अमुक विचार येणे वा न येणे
हे नाहीच माझ्या ताब्यात – कोणताच विचार
न येणे ही फक्त एकच असणार वेगळी शक्यता
--- ००० ---

उगीचच बंदूक घेऊन
एकेक पक्षी मारत बसायची गरजच राहणार नाही
जनुकीय अभियांत्रिकीने दुःखाची जनुके
काढूनच टाकायची नाळ कापण्याआधीच
मग
प्रेम मिळो न मिळो आनंदात असाल
यश मिळो न मिळो आनंदात असाल
तुमची मते हेल होत राहिली तरी आनंदात असाल
तुमचा पक्ष हरला तरी आनंदात असाल
फर्स्ट डे फर्स्ट शो चुकला तरी आनंदात असाल
तुमच्या ऐवजी तुमच्या मित्राला ज्ञानपीठ मिळाले तरी आनंदात असाल
तुमचा प्रदेश वापरत ते आनंदात आणि इकडे तुम्हीही आनंदात
तुम्हाला तुमच्या आणि त्यांना त्यांच्या धर्माची गरजच न राहिल्याने
तेही आनंदात आणि तुम्हीही आनंदात
स्त्री-पुरुष एकमेकांना सोडून गेले दुसऱ्या आकर्षणाने
तरी दोघेही आनंदात
युद्धच नाही धोका नाही भीती नाही
म्हणून सगळेच आनंदात

पण यातून काहीच बदल होणार नाही असे नाही
मेंदूचा आकार वाढत गेल्याने कवटी मोठी होईल
पायांचे तळवे मोठे होतील बुबुळे तिप्पट कान दुप्पट होतील
ढेरपोटे होतील सगळेच
पण अर्थात आनंदीच असतील

आनंदी असण्यासाठी काहीच करावे लागणार नाही
मग अधोगती होत जाईल पुन्हा ते जुने जनुक हवेसे होतील
की काय कोण जाणे ---
--- ००० ---

खरे तर मी कल्पनाही नव्हती केली
की या धूर ओकणाऱ्या जगात
ही असेल एक मोकळी पोकळी
शांत आणि तरीही उत्तेजक
असेल हलकेच अनावृत होणारे
एक प्रेक्षागृह ज्याच्या पायऱ्या
पाहूनच आपला भूतकाळ नष्ट व्हावा

रस्त्याने चालताना जागोजागी दिसत
सोलुन पडलेली रक्तबंबाळ मने
आणि दिसत आशावादी मोरांचे
झडलेले दिवे दुर्गंधीत
यात कसे शक्य होते
माझ्या अस्तित्वात
माझीच अंत्ययात्रा साजरी होणे

माझी अविरत धडपड
आणि प्रचंड घामट तहान
तुला नव्हतीच शोधत
उलट तुला शिव्या देत
समरूप होत होती
माझ्या भाषेच्या अस्मितेशी

मी न अपेक्षिलेले तुझे आगमन
सौम्य आणि सर्वच देणारे असे अकल्पित
ठरले कारण माझ्या स्मृतिभ्रंशाचे
त्यामुळे राहिलो नाही मी तुझा भागही
इच्छा नाही आणि काहीच नाही अशा या समाप्त जगात
--- ००० ---

ढगाने कोणता आकार घ्यावा
हा माझा प्रांत नाही
मी कशाला अधीर होऊ
किंवा माझ्या डोळ्यांतून
अमुकच अर्थ पोचण्यासाठी
सारखे खूप काही मनात
ठरवत घडवत राहू

पहाटेच्या पक्ष्याच्या पहिल्या
आवाजानंतरच्या शांततेत
असते कविता वाट पाहात
तिच्या समूळ कृतीसाठी

दूधवाला येऊन जातो
मग पेपरवाला
यांबरोबरच अचानक
दार निखळून पडू शकते
कवितेचे स्वागत म्हणून

ते एका कवितेनेही घडू शकते
कोणत्याही मनाच्या माध्यमातून
यासाठीच तर कवितांचे येत राहणे

कवितेचे खरे तर या क्षणाशिवाय
बाकी काही कामच नाही असू शकत
-- हे घडले तर घडेल कुठेही
मी न ठरवता
मला माहीतही न होता
--- ००० ---

शक्यतो आहे तेच पाहणार मी
टेकवायच्या काठ्यांचे जंगल
अडखळत धडपडत राहात माझ्या
या जगातून बाहेर पडायचा
प्रयत्नही न करता

मी शब्दांच्या बाहेर जाणार नाही
मी कोणत्या ना कोणत्या
मूडमध्ये राहीन माझ्या वाढत्या
आठवणीच असतील
मला सापडलेले सगळे अर्थ

रेल्वेमार्गाचे माझे मूडी अप्रूप
पोसत राहीन मी सांगत
राहीन सर्वांना जगण्यातले
त्याचे सारसर्वस्व

हे एवढ्याचसाठी करेन
की तुमच्या लक्षात यावे की
तुमच्या जगण्यात हे
येऊच नाही शकत तुम्ही
कितीही संवेदनशील
असलात तुमच्या एखाद्या अटळ
मूडसह अर्थ शोधणारे तरी

माझ्या या शब्दांना या अर्थाने अर्थ नाहीत
ते कुठे काही पोचवूही नाही शकत
माझ्यातच जन्मून माझ्यातच जगणारे
--- ००० ---

उगवलेल्या दिवसाचे बारा सारखे काप
मांडून ठेवले मानवी मुंडक्यांच्या प्रदर्शनात
विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानासाठी
-- त्यांच्या उजेडात पळालेले सर्व ससे
शेवटी फुरंगटून बसले इतकी यातायात
करून काहीच मान न मिळाल्याने

असेच असते बाबा – सर्व सायकलींची
सर्व टायर्स अनुभवाने देऊ शकतात सल्ले
की बाबा कुठे प्रत्येकाला
विरोध करत बसणार घशाला
कोरड पडलेली असताना
साध्या स्त्रीप्रेमाची

उलट खोटेच बोला आणि वागा
शेवटी कपडे बदलत बदलत
कसेबसे का असे ना मुक्कामाला
पोचून आयुष्याला टांग हाच आहे हेतू

आशावादानेही हेच करावे लागते
हेयरकटिंग सलुनमध्ये दयामाया
नसते वा नसतो कल्लोळाचा आवाजही
कारण तुमच्या अपेक्षांचा फेस आणि चुना
असलेली बिंदी असते तिथे टांगलेली
लिंबूमिरचीजवळ सदिच्छा म्हणून

तुमचे व्यापताप संभाळा आणि हळूच
करा पोबारा
--- ००० ---

मी अनेकांशी बोलत आलो
सगळे हेच म्हणतात की दगड
गोड आहे असे दिसले
तर मुंग्या लागणारच
तोच दगड आपल्या डोक्यांत वेदना
देत असला काठोकाठ
तरीही नाकारणार कसे
सर्व भांडणांचे मूळ
असलेले काल्पनिक फूल
ज्याच्या मालकीचा वाद
खूप गुंतागुंतीचा आहे

बलात्काराची इच्छा दबवाल पण
ती उद्भवूच नये
यासाठी मेंदूवर कोणत्या
रेघोट्या ओढणार

हिंसाच न होण्याचे सूत्र
कोणत्याच पुस्तकात नाही
मग ते शोधायचेच कशाला
त्यापेक्षा कोर्टाच्या पायऱ्या चढत
आव्हान दिल्याच्या भ्रमात राहावे
बळी तो कान पिळी या सूत्राला

हे असे होणारच आणि तेही
आणि हेही आणि तेही
हे सगळे वेदनामय गोड आहेच
अन्यथा जीवच द्यावा लागेल
--- ००० ---

मला माहीत झालेले असल्याने
मी ताणतो विश्वाला
विश्वातून बाहेर पडण्यासाठी
माझे ताणणे विश्वातलेच असल्याने
माझ्या मनाबरोबरच
मुरगळतात इमारती
झाडे होतात वेडीवाकडी
पृथ्वीतून बाहेर पडू लागतो रक्ताचा लाव्हा

आणि यातले कुणालाच काहीच
दिसत नाही हा माझा एकटेपणा असल्याने

माझे शब्द आणि विचार
अति-प्रयत्नशील असेपर्यंत
शोषली जात राहते माझ्या भोवतीची
माझ्या वाट्याची हवा आणि अंधारात
आकाशातले तारे भोसकत राहतात मला
त्यांचे हजारो वर्षे जुने असलेले भाले

मी माझ्या देहाबाहेर जाण्याचा
प्रयत्न करतो आटोकाट पण देह
अधिकच घट्ट होत सुकत राहतो
या सनातन द्वंद्वाने सुरकुतत

इथे अचानक पडू शकते ती ठिणगी
माझ्या इच्छेने मुळीच न येणारी
पण आठवणारी मला नंतर कधीही
मला स्वातंत्र्याचा अति-तीव्र भुकेला करत
--- ००० ---

धर्म हा शब्दही नको
त्या ऐवजी मी उलट्यापालट्या करून पाहीन
जगातल्या सर्व वस्तू पूजीन फुले वाहून
दगडांखालचे विंचूही

स्वछळाचे मूळ मिटले की झाले
आहे काय नाही तर ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या
जखमी कावळ्याचे रहस्य वा अर्थ
कोणत्याही कारणाने एकमेकांच्या
उरांवर बसणाऱ्या मनांचा

यासाठी कुठेही एकत्र
जमायचे कारणच नाही फक्त
आहे तिथे जागी व्हावी लागेल
मनातली समूळ कल्पनाशक्ती
जी सहज उद्भवत राहील
या निष्कर्षहीन कवितेतून

मी नाकारतो सगळे ग्रंथ आणि तज्ञ
शंख फुंकणारे सदोदित धोक्यांचे

कविता हाच होईल धर्म
जिथे ना कुणी कवी ना कुणी वाचक
कारण उसवून गेलेला भूतकाळ
व्यक्तिमत्वे नाकारेल

या नरकातून बाहेर पाय टाकायची
इच्छा तर होणारच आहे तेवढ्या कल्पनाशक्तीनेही
--- ००० ---

आकाशातून तारा थेट
येतो माझ्या उजव्या पायाच्या अंगठ्यात
ज्याच्या थरथरीमुळे मला वाटते
भूकंप तरी होत असेल वा
रक्तपुरवठ्यात अडथळा तरी

मी असतो एका एकाकी खोलीत
जिचे नेपथ्य फक्त एक खुर्ची
एक टेबल आणि एक वर्तमानपत्र

इथे काहीच आवाज नाही वा कोणतेच
स्वप्नही नाही बाहेरच्या जगाचा
स्वर्ग करण्याचे

या खोलीच्या खिडकीबाहेर एक उंच भिंत
सुधारणा तर हजारो लागतील
मूळचे काहीच शोधत न बसता

रंग निळा -- एका बाजूच्या भिंतीचे
पोपडे निघालेले जखमी आठवणींसारखे
आणि विस्मृतीसारखा कुठे कुठे रंग
उडून पांढरा पडलेला

निराश होऊन संपायचे नाहीय
खूप मोठ्या लोकांची वाळत घातलेली उदाहरणे
मलाही प्रसिद्ध करू शकतील
भूकंपातून चमत्काराने वाचलेला माणूस म्हणून
-- मी तारा उचकटून परत आकाशात फेकतो
--- ००० ---

तो समुद्राकडे पाय करून झोपला
तेव्हा त्याच्या स्वप्नाला एक स्वप्नातलेच
मांजर आडवे गेले
तो जागा झाला तेव्हा तो
समुद्राच्या आत होता
जिथे अनेक पूर्वीच बुडालेली जहाजे
इतस्ततः पडून होती – विशेष म्हणजे
त्यांचे श्वास चालु होते

श्वासाऐवजी मानसिक
मंत्रोच्चारांवर तो जिवंत होता
त्याच्याबरोबर आता फक्त
काही त्याची आवडती गाणी आणि
रुतून बसलेले काही अपमान होते

एरवी त्याने काळजीच नसती केली
पाण्याला येणाऱ्या गोजिरवाण्या
अक्षरओळखीच्या वासाची
कारण त्याच्या प्रत्येक बोटावर
उगवलेली होती एकेक कविता
पण आस्तेकदम जाणवणाऱ्या
लांब पल्ल्याच्या नात्यांची त्याला
भीती वाटू लागली होती

तो काही मुद्दाम हरवलेला नव्हता
आधी साधा त्याचा रुमाल हरवला होता
आणि तो शोधतानाच अचानक
त्याला झोप आली होती
--- ००० ---

तिने गाणे म्हणायचे
खरे तर काहीच कारण नव्हते
मी मुळीच विनयभंगाचा प्रयत्न केला नव्हता
-- ती असेच करते – पाण्यातून
माशांचा थवा गेलेला दिसला की खट्टू होत
सगळा दोष ती मलाच देते –

ती माझे असे खोटेच अपमान करते
हे माहीत असल्याने सगळ्या नटनट्या
हसून प्रयोगाला लागतात – हजारो
प्रेक्षकांसमोर जरा वेळ हेच असते त्यांच्या डोक्यांत
नंतर मीही कंटाळून निघून जातो

पण हे असे किती दिवस चालणार
सारखे जमवत राहणे तडजोडींचे नकाशे
दोघांचीही मने कमकुवतच आहेत
पण हवेय तर सगळे मनांसारखेच

सकाळी टेरेसमधल्या कबूतरांना ती पाणी घालते
खरे तर त्याचाही मला राग येतो – मी बोलत नाही
कारण शेवटी ती मला हवीच असल्याने
मी नोकरी सोडायचीही तयारी ठेवलेली असते

बोलणे नको, संपर्क नको, आठवण वा इच्छाही नको
हे सगळेच मान्य करून
मी काय देशोधडीला लागू की काय

डोळ्यांसमोर नको एखाद्या कबूतराचे नकळत तुटून पडलेले पीस
--- ००० ---

प्रत्येकाचे काही मत होते सूर्य
नेमका कधी कुठून उगवला पाहिजे यावर
खात्रिशीर गणिताप्रमाणे
काळकामवेगाचे रस्ते प्रत्येकाच्या डोक्यातून सुटत
निसटलेल्या गुंडाळीप्रमाणे --
भेळेच्या डोशांच्या गाड्या निघून गेल्यावर पडलेल्या अन्नावर
पहाटे कावळ्यांच्या पार्ट्या चालु झाल्यात जणू
इतर सवंगड्यांनाही बोलवत
आपापल्या मतांच्या

पोलीस हाकलुन लावत फूटपाथवरून
जरीकाठाच्या टोप्या घातलेल्या एडस झालेल्यांना
बाजारात लोक म्हणत की योग्य नाहीय हे
आधीच वेड्या असलेल्यांना झोडपून काढणे

कुणीच कुणाचे ऐकत नसल्याने जग
आहे तसे राही – खरे तर प्रत्येक उपाय
समान स्थितीत वापरून पाहून
मग ठरवता यायला हवे
जगाचे भले म्हणजे काय ते

सोल्जरकट केलेली टापटीप माणसे
जी अत्तरे लावतात ती इथल्या
पिंजारलेल्या मनांकडे नसतात

इथले स्त्री-पुरुष तर फक्त सेक्स टॉईज

प्रजा वाढत राहते विशेषज्ञ होत आणि स्वप्ने पाहात जगज्जेते होण्याची

--- ००० ---

बिनघोर घोरत पडलेली माणसे
झोपेतही रागावलेली दिसत
किंवा काळजीत ‘ आई ‘ म्हणत
किंवा आपण स्वतःला पूर्णच
विसरणार तर नाही ना
या विचारात रंधा मारत राहात
आपोआप चाललेल्या रात्रीवर

यात बदल न होऊ देता
ते एरवी संवेदनशील असत
मानवाधिकारांचे नाव काढताच
ते मऊ पडत आणि सर्वांसमोर
स्वतःचे उदाहरण ठेवत

आपल्या मातीतले हाल
आधी संपावेत मग जगाचे पाहू
असे म्हणताना त्यांचा गळा दाटून येई

शेवटी जेवढे शक्य आहे
तेवढेच तास सोडावे पाणी
हे त्यांना मान्यच असे

हुबेहूब त्यांच्यासारखे न जगणाऱ्यांना
ते शत्रू समजत त्यांना रोज नव्या शिव्या देत
त्यांचे फोटो फाडत

इतर लोक त्यांचे सर्व पटल्याचे दाखवत
पण बिनघोर घोरत पडून राहात
--- ००० ---

गूढ काही नाहीच
असे कोण म्हणाले
पाण्यात पडलेल्या
सूर्याकडे पाहून

असूच कसा शकेल
शर्टावरचा डाग
मानवी मनातून
वैश्विक अर्थ नाकारणारा

मानवी बुद्धी हेच
एक थोतांड असेल
जर पाऊस वाटत असेल
तिला फक्त एक विदूषक

हवेच्या आवरणाखाली
मृत्यूचा हात हजर असतो
हे जाणवूनही विचार
गढून राहतात बालपणात

जे असू किंवा नसू शकते
डोळ्यांदेखत पेटवू शकते
आठवणींचे छुपे संसार
सूज न ओसरणारे

आता एकच शक्य आहे
परीटघडीचा सूर्य अंथरणे
या सत्य जगावर अगूढ
विचारांचे लगाम टाईट करत --- ००० ---

ड्रेनेजचे पाणी, रेल्वे, आग, फास
असे सगळे होऊन गेले कल्पनेत
आसमानमे तारा देखो मेरे नाम का
म्हणत बसलेले चटके पचवत
ऐकल्या अनेक व्याख्यानमाला

प्रत्येक वेळी भीतीने कल्पनेला
चालना मिळत गेली शेयर बाजारात
प्रत्येक वेळी भीतीमुळे फायदे हुकले

उसने घेतलेले सर्व आनंद स्वतःचेच
समजून पालनपोषण केले त्यांचे
भारद्वाज हा एक शुभशकून मानून

गेल्या वर्षीचे पाणी पुरवत हिरवी
राहिलेली झाडे आता निर्धास्त
ढगांच्या गडगडाटाने कारण
कल्पनेमुळेच आता माणूस
नम्र होण्याची शक्यता दिसतेय

माणसाचे एक बरे असते
वर्षभर उत्तेजक भावना
कधीही कडेलोटाने जन्माचे
रहस्य उलगडणाऱ्या

दो बूंद पानी दो किसी पंछीको बस
तुम्हारी जिंदगी सुधर जायेगी
आसानीसे कल्पना करते हुए –
--- ००० ---

अकरा शनिवार तेल घाल मारुतीला
आणि मोकळा हो
गाड्यांच्या दिरंगाईतून
-- यावरून एकच सिद्ध होते
की शब्द मनाबाहेरचे
कधीच नसतात
त्यांना फक्त
स्वातंत्र्याचा फील असू शकतो

अर्थ व्यक्त करण्या ऐवजी
स्वातंत्र्य व्यक्त होण्याने
शब्द अभ्यासण्याचा
त्रास वाचू शकतो

ज्यांना दगडफेक हेच शब्दांचे
विहितकार्य वाटते अटळपणे
त्यांचे शब्द नेहमीच फाटलेले
विखुरलेले तुकडे झालेले
आणि जखमी असतात --
प्रश्न समजण्यापेक्षा
त्यांना सूड महत्त्वाचा असतो

श्वासासाठी पाण्यातून डोके
बाहेर काढण्याचे अटीतटीचे
प्रयत्न तर होणारच -- नाइलाजाने
तेच फक्त शब्दांचे काम समजल्याने
एकमेकांच्या मनांनी सारखे
भाजून घेणे होत राहते
--- ००० ---

ती म्हणे ती कधी कधी
विचार नाही करत मी म्हणे
त्याच वेळी मीही नाही
नाही करणार विचार
मग आपला दोघांचा
एकच पाऊस एकत्र पडेल

तिच्या मनाची हालचाल
मला आणि माझ्या तिला
कण न कण जाणवे
सतत चालत सादप्रतिसाद
निर्वस्त्र

कित्येक वर्षे आम्हीच आहोत
या जगात बाकीच्या फक्त कल्पना
इतक्या टोकाच्या सत्यात होई
सतत भेट

दोघेही पूर्ण कफल्लक
द्यायघ्यायला काहीच नसलेले
बेफिकीर होत नष्ट होणारे
ओठांतून आरपार

ती आश्वस्त असते
मी निवांत असतो
दोघांच्याही मनांत
दोघांच्याही
असण्यानसण्यामुळे
--- ००० ---

प्रेयसी ऐवजी चिंचेचे झाड आणि
औद्योगिक प्रदर्शना ऐवजी पाणी
असा गोंधळ होऊ नये मनात म्हणजे झाले
माझ्या सुखासीन आयुष्याची
ही किमान अटच असणार

प्रत्येक वस्तूला आणि सजीवाला
द्यावेच लागेल स्वतंत्र अस्तित्व
हे माहीत असूनही एखाद्या संध्याकाळी
दृष्टी अंधुक होताना
सगळेच एकमेकांत मिसळल्याचा
भास होतो आणि मी
प्रचंड भयग्रस्त होतो

मला डावलायचे नसते
आकाशाचेही अस्तित्व
माझ्या जेवणात मला हवे असतात
तारे हत्ती मीठ आणि फूल

मला जाणीव असते की ही व्यवस्था
मी घडवलेली नाही एक पानही
मला घडवता नाही येणार

पण यातले काहीच
न बिघडू देण्याची जबाबदारी मी घेतो
माझे सुखासीन जगणे जणू या व्यवस्थेचाच
भाग असल्याप्रमाणे जगण्यासाठी
शक्य तो मी भ्रम आणि स्वप्ने टाळत राहतो
--- ००० ---

एकच उत्कट आठवण
वर्तमानात आणून
पुन्हा पुन्हा जगणे
वा फक्त शब्दांनी
पूर्ण सहवासाचा सुगंध
फैलावणे वा नुसत्या
क्षणभराच्या किंचितशा
स्पर्शातून पूर्ण अनुभव घडवणे

यासाठी समोरचे वास्तव
ढकलावे लागते
नसण्याच्या आभासात

उन्हाने भेगाळलेल्या
जमिनीचे चित्र आणि मनात
वेगळीच आस असून
बाहेर वेगळ्याच कामाचा
प्रचंड बोजा
यांना असत्य समजून
स्वीकारावा लागतो
भौतिक सत्याचा धोका

त्या नेमक्या वेळी
काय करत असेल
मनात ती व्यक्ती
हे माहीत नसणे रद्द करून
सुपीक करून पूर्ण निर्विघ्न
पणे घ्यावा लागतो हंगाम
--- ००० ---

हा एक संपावा आता पावसाळा
तर त्याने कोणती क्रांती होणार आहे
मीच फेकून दिलेली जुनी बिले
आता कशी काय घडवतील
ढगांचे नवे डिझाईन

खरे तर आता काहीच नाही केले
तरी काय बिघडेल
जन्मापसून गृहीत धरून मी
कोणतीच मोडतोड केली नाही
याचा अर्थ हे सगळे
माझ्या कर्तव्यांसाठी थोडेच थांबलेय

जे कळतच नाहीय त्यात नको बदल
असे म्हणून मी व्यक्त होत राहतो
जरी ते जिवंत निरर्थकतायुक्त
असले तरी आणि असले तरी
साठणारे बरेच अधिक शिल्लक

या कोलाहलात थांबून कोण
पाहणार आहे माझ्या आवाजांची कृती
जी हा कोलाहल नष्ट करणारी आहे

कशाला हवीय जिद्द
वेगळ्या शैलीतल्या कपड्यांतले
आपले फोटो सर्वांवर ठसवण्याची
त्यापेक्षा साधे वाटल्यास व्हावे व्यकत
नाही तर नाही
--- ००० ---

आमची आम्हीच ठरवलेली
आमची रात्रपाळी संपल्यावर
पहाटे आम्ही झोपतो टेंपो ट्रक, बस पाहून
त्यांच्या खाली आम्ही विसरतो ( ते स्टार्ट होईस्तोवर )
भांडणे ओरडणे आणि सगळे पाठलाग

स्टेशनकडचे हंबीरराव
निष्कारणच आमच्या गल्लीत शिरले होते
चुकूनही असेल निव्वळ
एक विहारस्वातंत्र्य म्हणून

अनिलनेही खरे तर विषय नको होता काढायला
की आपण आर्य की द्रविड की नागवंशीय
की मूलनिवासी वेगळेच कुणी
कारण खरे तर आम्हाला ते कळतही नाही
आणि गरजही नाहीय आता
कोणते महायुद्ध कुणाकुणात
आणि का झाले होते हे समजायची
आपोआप लक्षात राहणारे
सहज मिळणारे अन्न बास आहे

काहीजण अनावश्यक किंवा रोगामुळे
चावतात इकडेतिकडे यांनात्यांना त्यामुळे
माणसे आमच्यावर पिसाळतात
मारायला परवानगी नाही तर निदान
नसबंदी तरी व्हायलाच हवी भोसडीच्यांची म्हणतात
आम्ही काय प्रजा वाढवण्यासाठी थोडेच चिकटतो
एक मजा  मजेत जगायचे बास
--- ००० ---

उदाहरणादाखल घेतली समजा एक खार
आणि तिच्या पायावरून गेली समजा
एक सायकल एका निव्वळ पोकळीत
जिथे काही ऐकूच नाही येत
आणि पाऊस पडला तरी
सरकारी ऑफिसेस सुटतच नाहीत कधी
कायमची गुलाम असल्याप्रमाणे तर काय उपाय

उगीचच कोण विमा पॉलिसी उकिरड्यावर
टाकून सिनेमाला जाईल
तेही ब्लॅकची तिकिटे काढून
असे साधे प्रश्नही ज्यांना सुचत नाहीत
त्यांना ठेवावेच का तपासणीच्या कामावर

न वाचता सह्या केल्या असतील
तर पोरेबाळे विसरा आणि जा पंढरपूरला
जिथल्या वेश्या देतात दर्शन
अनेक चित्रपटांतून माणुसकी दाखवत

नुसती निमित्ते सांगत निवडणूक
टाळता नाही येणार
तुमच्याविना काही अडणारही नाही
तुम्हीच खरे तर लुटलेत
लोकांचे सगळे नैतिक अभिमान

आता शांत राहा येईल ती खारच
लंगडत तुम्हाला वाचवायला
एक माणुसकी म्हणून पंढरपूरहून
--- ००० ---

माझे दुःख म्हटले तर
प्रतीक आहे एका ओंडक्याचे
ज्यावर बसला आहे एक पक्षी
जो म्हटले तर प्रतीक आहे
या जगाच्या अर्थाचे

विचार हेच जेव्हा उपाय होतात
प्रतीकात्मक निराकरणे होत
प्रत्यक्ष रस्त्यांवर घडणाऱ्या
अपघातांची तेव्हा ते होतात
प्रतीक लांबलचक काळाचेही
( ज्यात हवेचे बुडबुडे भावनांचे
कंटाळा आणतात )
निरर्थकतेच्या भीतीचे
प्रतीक असणाऱ्या

यातूनच कालांतराने
वेळ येते रक्त किती
कुणाकुणाचे सांडलेय याचा शोध
घेण्याची अटळ स्वीकाराचे
प्रतीक म्हणून

मुले वाढत राहतात
शिकवलेल्या भीतीत
प्रतीकात्मक खेळतबागडत
सुरळीतपणे पडणाऱ्या
पावसाचे प्रतीक म्हणून
अर्थपूर्ण पंख पसरत
--- ००० ---

निरनिराळ्या पक्षांचे निष्ठावान
मानवी हिताचे पाईक वर्चस्वाच्या
राजकारणात काढतात आठवणी
बिचाऱ्या तत्त्वशीलांच्या
राजकारण न जमल्याने
मातीत गेलेल्या

नव्याने उघडलेल्या नॉन-व्हेज
हॉटेलातली तंदूरचिकन खाताना
एकजण मनात वागवतो त्याच्या
शत्रू नालायकाची वाट लावणे
तळागाळातले सगळे
आपलेच असल्याच्या खात्रीत
एकजण जातो मैत्रिणीसह
शैक्षणिक पिकनिकला

असे सगळे ईमानदार
जाणून असतात
वर्चस्वाची गणिते
रक्तलांच्छित कबड्डीवर ठरणारी

राजकारणातून यश मिळवून
सर्वहिताचे साम्राज्य
उभे करण्यासाठी काहीजण
जागतिकिकरणाच्या बाजारात
बाजी लावतात गरिबांच्या कपड्यांची
त्यांच्याच हितासाठी जिंकण्यासाठी
तात्पुरती तडजोड म्हणून
--- ००० ---

पूर्वेला असलेल्या
कोर्टाच्या मागून उगवे सूर्य
नावेतून लोकांची ने-आण करणारे
म्हणत खड्ड्यात जाऊ दे --
आम्ही काळे का झालो
आणि आमच्यावर आयुष्यभर
अंधारच का

या प्रश्नामुळे ते सतत
कोंडाळ्यात राहात
आणि गमावून बसत
एकट्याने पाण्याला स्पर्श करणे

सर्वच मने या प्रश्नावर
मात करण्याच्या प्रयत्नात
चालुच ठेवत
संधीची वाट पाहणे
एकमेकांची वाट लावण्याच्या

वकील फी खूप मागत
खोटे साक्षीदार रचून ते घेऊ शकत
सूर्यालाच वळवून त्यांच्या बाजूला

काहीजणांना कळे की
हे चक्र भेदावेच लागेल --
नावाड्यांना वाटे ते आपापले पाहताहेत
आमच्याबद्दल बेफिकीर राहून
स्वतः सुटू पाहताहेत भोसडीचे
--- ००० ---

अर्थ पोचणारच नसल्याने
काम सोपे होते
मला दिसणारी निरर्थकताच
मांडायची होती

पण ती निरर्थकता तरी
जशीच्या तशी
पोचेल का
हा प्रश्नच होता

त्यासाठी शक्यतो
शब्दांना कोणतेच अर्थ
राहूच नयेत असा त्यांचा वापर
करत मन शून्य ठेवले

पण वाचणाऱ्याला शब्द
दिसणारच होते
त्यांना अदृश्य करून
कशी लिहिणार कविता

तुमचे तुम्ही
मन शून्य करा
आणि तेच समजा
माझ्या कवितेचे वाचन

एवढेच फक्त लिहून थांबलो
तर एका वाचकाने
मला पेढे आणून दिले
--- ००० ---

थोडा पाऊस असूनही संध्याकाळी
पक्षी परतताहेत त्यांच्या मुक्कामाकडे

मग पाऊस थाबतो – आता वाराही नाही
पानही नाही हलत झाडांचे आणि डोंगरही शांत

याला शांतता का म्हणावे खरे तर जे आहे ते आहे
वारा तरी सोसाट्याचा कधी कुठे असतो असला तरी

जे असायचे तसे ते असत असते आणि मी
वेगळेच विचार करत असतो

मीही असतो त्याच दृश्यात तर शांतता
कोण म्हणाले असते अशांततेहून वेगळे म्हणून

डोंगराची समजा जिवंत असण्याची
पद्धत वेगळी आहे तरी त्याला काय वाटेल

माझ्याकडे पाहून पक्ष्यांना झाडांना
आणि या नसलेल्या वाऱ्याला काय वाटेल

माझे विचार करणारे मन कसे दिसत असेल त्यांना
की मन त्यांना माहीतच नसल्याने ते म्हणतील

काहीच नाही काहीच नाही काहीच नाही
किंवा खरे तर काहीच म्हणणार नाहीत

--- ००० ---

एक माणूस भेटला मोठ्या पोस्टवरचा
मनमोकळा आणि खरा म्हणाला
मला फक्त दोनचार पक्षी माहीत आहेत
पाचसहा फुले ओळखता येतात
काही भाज्या आणि काही फळे
रिकाम्या शेतात गेलो तर सध्या तिथे
काही पेरले असेल की पीक काढून झाले असेल
ते मला कळत नाही

शहरातले कामापुरते रस्ते मला माहीत आहेत
मी काश्मीर वा ताजमहाल वा अजिंठा काहीच पाहिलेले नाही
मी जात नाही कोणत्याही यात्रेला वा तीर्थक्षेत्राला वा उत्सवाला

मला न समजणाऱ्या शास्त्रांत मी डोके घालत नाही
विवाहकायदे लिव्हइन कायदे वारसकायदे
मला माहीत नसतात पतिपत्नी हे नाते कसे संभाळावे
यावर मी काही वाचत नाही गरजच नाही पडलेली
बरी आहे पत्नी आणि हो राजकारणातले मला काहीच कळत नाही
आपले परराष्ट्र धोरण बरोबर आहे का ते मला माहीत नाही

पूर्वी मला क्रिकेट आवडत असे अजूनही काही आठवते
एकदोन मालिका पाहतो पण अंदाजपत्रक
वा निवडणुकांचे निकाल यांवरच्या चर्चा मला बोअर होतात
दोन मुलगे आहेत त्यांचे शिक्षण नोकऱ्या लग्ने सर्व मार्गी लागलेय
सगळ्यांनाच चांगले जगता यावे असेच मला वाटते
काही वाद भांडणे वा ताणही असतातच मीही माणूसच तर आहे

पुढल्या वर्षी निवृत्त होईन आपलेही सगळ्यांबरोबर जे होईल ते होईल
--- ००० ---

कुंद हवेचा प्रभाव स्वीकारून

आळसात राहणे हा आळसच नाही तर काय आहे

मानसिक आधारासाठी

कविता लिहिणे काय किंवा

एकूणच न्यायासाठी जान न्योछावर करणे काय

एकट्याने घडो की समूहाने

असणार तो सगळा एकाकीपणाच

खरे तर काही घडवायचेच असेल तर ते या क्षणातच

कोट्यवधींची मने बदलुन जायला हवीत

अन्यथा कुचमत कुचमत होत राहणार ते

क्रांतीचे स्वप्न सर्वांनाच स्वप्नात ओढू पाहणारे

तसे तर आता हेही कळलेय की नुसते

बाहेरून कलप केलेले विचार

आता भुलवू नाही शकत

स्वप्नातल्या कोणत्याच नायिकेला

आणि या कुंद हवेत आता

रागही नाही येत अंगार होऊन धगधगता

आता तर जग बदलायचे तर

सुरुवात कुठून करायची हेच नाही कळत

कारण बाकी इतर सगळी माणसे

हवी तशी सकारात्मक नाही दिसत

बहुधा खच्चीकरण झाल्याने

मग किरकोळ काही शिव्यागाळी करत ठेवावा लागतो

हेतू जागा इतरांनाही जमेल तेवढे जागे ठेवत

--- ००० ---

संगीत ऐकले म्हणून काही
डोळ्यांपुढचा अंधुकपणा कमी होणार नाही
संपत आलेले नाटक
काय देतेय विधान
याचे दगडी उत्तर
अजूनही न सापडताच मी चाललो आहे

जणू काही सगळे माझ्या
असण्यानसण्याचे आणि माझ्याच
अर्थपूर्ण अंताचे प्रश्न असल्याप्रमाणे
मी बघत असतानाव होतेय आकाशवाणी
स्वतःपुरते जगलास तर मेलास

कोणत्याही नाटकाशिवायही
माझा विश्वासच नाहीय सुभाषितांवर
माझ्या तुटपुंजा अक्कलेने
काहीही करणे मला संशयास्पदच वाटते

कदाचित आजच असू शकेल माझा शेवट
माझे गुप्त खजिने सापडू देत
दोन हजार वर्षांनंतरच्या उत्खननात
कुणालाही अभिमान, शरम वा क्रोध न वाटता

या क्षणी इतक्या वर्षांनंतरही
मी अजून गोंधळलेलाच आहे
त्यापेक्षा क्रांतीत सहभागी झाला असता
तर काय मेला असता
हेच बहुतेक शेवटचे वाक्य ऐकू येईल मला
--- ०0० ---

रोज सूर्योदय अपूर्ण
सूर्यास्त अस्वस्थ

किती काय काय
हवेय अजून पूर्णतेला

कोट्यवधी मने
त्यांतलेच तर एक

माझे नसेल
एकूण मनांचा एक

अपूर्ण भाग
हजारो वर्षांचा

सगळी मने माझी नाहीत
तर माझेच का माझे

सगळी मने माझी होवोत
असे म्हटल्याने

सगळेच पाहिले
तर काहीच नाहीय

काहीच नसण्याचा सूर्योदय
झाला समस्त सूर्यास्त
--- ००० ---

डास दगड संकटे आली
चाल करून पण पाण्यासारखी
इकडेतिकडे वाहून गेली
स्पर्शही न करता
माझ्या विचारांना

हे कसे घडले
कोण जाणे मी फक्त
लॉटऱ्यांचे निकाल
असा जाणवत राहिलो

कुणी म्हणाले जनुकांमुळे
तर कुणी माझा
लकी शर्ट म्हणाले

माझ्यासमोर हत्या
घडू लागली तर
मध्ये पडणेच मी करेन
बहुतेक मारला जाईन

ऑपरेशनच्या वेळी
भूल दिली जाताना
काही कमीजास्त होऊ शकते
हे समजून मी आधीच सगळ्या
सह्या करून टाकल्या होत्या

मी आपोआप जिवंत राहतोय
असेच मला वाटत राहते
--- ००० ---

झोपेत घशाला कोरड पडल्यास
मनात फुले आणावीत अशी नेणीवेला
सूचना देऊन मी झोपलो पण एस्टी निघून गेलीच
माझी सूटकेस तीत राहिली होती

स्थानक व्यवस्थापक एकटेच बसलेले होते
ते मला पाणी देत असतानाच एका वाहकाने
नेमकी माझीच सूटकेस तिथे आणून ठेवली
माझे डोळे चमकले मग तर तीच
एस्टीही पकडता येईल की काय
पटकन लघवीला जाऊन येणे गरजेचे होते
आल्यावर ओळख पटवावी असे ठरवले
पण रात्र खूप झालीय आता ऑफीस
बंद होईल ते म्हणाले तेव्हा मला जाग आली

जागेपणी माझे विचार सलग चालत
त्यांना तर्कसंगती असे
आणि माझ्या श्रद्धांचा पक्का पाया असे
माझ्या श्रद्धेय प्रतिमेला वंदन करणे
आणि विरोधकांचा द्वेष करणे
यांत कधीच गोंधळ होत नसे

माझी ती सूटकेस खूप जुनी आहे
तीत माझे प्रेमाचे तुकडे आणि माझ्या
जखमांचे तुकडेही आहेत

त्या सूटकेसमुळेच मी योग्य एस्टीत असतो
नेहमीच न चुकता जाणीवपूर्वक
--- ००० ---